रा. रा. जयराम केशव असनारे
बी. ए., बी. एल.,
हाय कोर्ट वकील–उमरावती
यांनीं भाषांतर केलेलें

मुद्राराक्षस नाटक.

हें पुस्तक
रा. रा. रामचंद्र पांडूरंग रोडी
यांनीं
उमरावती येथें
अश्विन छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १[illegible].

किंमत बारा आणे.

प्रसिद्ध संस्कृत कवी **विशाखदत्त** यांनी केलेल्या

मुद्राराक्षस

नाटकाचें मराठी भाषांतर.

रा. रा. जयराम केशव असनारे
बी. ए., बी. एल.,
हायकोर्ट वकील उमरावती.
यांनीं केलें तें

रा. रा. रामचंद्र पांडुरंग रोडी
यांनीं
उमरावती येथें
अलिबयन छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

आवृत्ती पहिली–प्रती १,०००.

सन १९००

किंमत १२ आणे.

हें पुस्तक

भाषांतर कर्त्यांनें

कै॰ तीर्थरूप

रा. रा. केशव लक्ष्मण असनारे

वकील-उमरावती.

यांच्या

स्मरणार्थ

पितृभक्तिपुरःसर लिहिलें आहे.

भाषांतरकर्ता.

प्रस्तावना.

प्रसिद्ध संस्कृत कवि **विशाखदत्त** यांनीं **मुद्राराक्षस** नांवाचें वीररसप्रधान एक नाटक केलें आहे. या नाटकांत लोकप्रिय शृंगाररसाचा लवलेशहि नसल्यामुळें, हें आजपर्यंत प्रसिद्धीला आलें नाहीं. पण आतां त्याच शृंगाररसाचा अतिरेक होऊन लोकांस अगदी वीट आल्यामुळें अशा या राजनीतिचतुर पुरुषांच्या अद्भुत कृतीकडे लोकांची गोडी लागावी या हेतूनें या नाटकाचें मराठींत भाषांतर केलें आहे.

हें भाषांतर बहुतेक मूळास धरूनच केलें आहे. मूळांतील शद्बालंकार वगैरे जेथें जेथें साधतील तेथें साधलें आहेत. क्वचित् प्रसंगीं तें सोडूनहि द्यावें लागलें आहेत. मूळांत ज्याठिकाणीं श्लेषघटित श्लोक आहेत त्यांचे भाषांतरांत श्लेषार्थ व स्पष्टार्थ दोन्ही साध्या भाषेंत स्पष्ट करून दाखविले आहेत. क्वचित् ठिकाणीं जेथें श्लेषार्थ केवळ शास्त्रीयविषयपर आहे तेथें तो सोडून देऊन केवळ स्पष्टार्थच भाषांतरांत घेतला आहे. एकंदरींत मू-

ळ नाटककृतींची मनोहरता न जाऊं देतां तिला महाराष्ट्र भाषेंत सजविण्याचा यथाशक्ति प्रयत्न केला आहे. तो प्रयत्न कितपत साधला आहे, हें पाहण्याचें काम रसिकवाचकवृंदाचें आहे.

आजपर्यंत पुष्कळ संकृत नाटकांचीं मराठींत भाषांतरें झालीं आहेत. त्यांत व प्रस्तुतच्या भाषांतरांत फरक हाच कीं तीं भाषांतरें गद्यपद्यरूप (संगीत) आहेत, व हें भाषांतर केवळ गद्यरूपच आहे. ही जी प्रसिद्ध किर्लोसकर, देवल प्रभृति भाषांतरकारांच्या सरणीहून निराळी सरणी प्रस्तुतच्या भाषांतरकारानें उचलली आहे याचें मुख्य कारण हेंच कीं या सरणींत प्रयोग करतांनां व वाचतांनां रसभंग फार क्वचित् होतो. हा रसभंग होऊं नये ह्मणून मूळांतील पद्यांचें महाराष्ट्रगद्य उतरण्याकरितां जरीं क्वचित् तें बदलावें लागलें, तरी पद्याचें पद्यच केलें असतांनां प्रयोगाचें वेळेस सामान्यनटांकरवीं जे रसप्रमाद होतात ते यांत होत नाहींत.

हें भाषांतर तयार होत असतांना श्री. रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी. ए. एल. एल. बी. ग. रा.

गोविंद कृष्ण पर्वते बी. ए. एल. एल. बी., रा. रा. श्रीनिवास रामचंद्र हरिदास हेड मास्तर प्रायव्हेट हायस्कूल. व रा. रा. लक्ष्मण रेणको डोळे वकील यांनीं वेळोवेळीं महत्वाच्या सूचना करून व उत्तेजन देऊन भाषांतरकर्त्यास अमूल्य मदत केली त्याबद्दल भाषांतरकर्ता त्यांचा फार अभारी आहे.

शेवटीं, या भाषांतररूप नाटककृतीस इतर बाह्यालंकरणांनीं सुशोभित करून सर्व लोकांपुढें दृश्यत्वरूपानें मांडल्याबद्दल शाहूनगरवासी मंडळींचें, व श्रव्यत्वरूपानें मांडल्याबद्दल रा. रा. रामचंद्र पांडुरंग रोडी म्यानेजर अल्बियन प्रेस उमरावती, यांचें आभार मानून ही प्रस्तावना संपवितो.

भाषांतरकर्ता.

नाटकांतील कथेचा उपोद्घात.

विशाखदत्त कवीनें **मुद्राराक्षस** नाटकाचें संविधानक ऐतिहासिक घेतलें आहे. तेव्हां हें संविधानक लक्षांत येण्यास या पूर्वीचा थोडासा इतिहास देणें जरूर आहे.

कलियुगाच्या आरंभीं नंदनांवांचे कांहीं राजे होऊन गेले. त्यांच्यामध्यें सर्वार्थसिद्धी नांवाचा राजा फार प्रख्यात व शूर असा झाला. त्याच्याजवळ नव अब्ज संपत्ती होती, ह्मणून त्याला नवकोटिशतेश्वर ह्मणत. त्यानें बरेच दिवस पृथ्वीचें पालन केलें. त्याचे वक्रनासप्रभृति ब्राह्मण कुलामात्य होते. त्या अमात्यामध्यें राक्षस नांवाचा एक प्रख्यात अमात्य होता. तो दंडनीतींत प्रवीण, षड्गुण नीती उत्तम तऱ्हेनें जाणणारा, शूर, व शुद्धाचरणी असा असल्यामुळें, नंदांनां तो मान्य होता. ह्मणून त्यांनीं त्याच्या हातीं सर्व राज्यकारभार सोंपविला. त्या सर्वार्थसिद्धी राजाला दोन बायका होत्या. एक सुनंदा व दुसरी मुरा. मुरा ही शूद्रकन्या होती, तरी स्वभावानें

सालस, व सौंदर्यानें उत्तम, असल्यामुळें राजाची तिच्यावर फार मर्जी होती. एकदां त्या राजाच्या घरीं एक तपोनिष्ट अतिथी आला. त्याची, पत्नीसमवेत त्या राजानें अर्घ्यपाद्यादिकांनीं पूजा केली, व त्याचें तें पादोदक घेऊन बायकांच्या मस्तकांवर शिंपडलें. तेव्हां सुनंदेच्या मस्तकावर त्या पादोदकाचे नव बिंदु पडले, व मुरेच्या मस्तकावर एक बिंदु पडला. मुरेच्या मस्तकावरील बिंदु तिनें मोठ्या आदरानें ग्रहण केला. तिचा तो विनय पाहून अतिथी तिच्यावर फार संतुष्ट झाला. त्या अतिथींच्या प्रसादानें त्या दोन्ही पत्नीस गर्भ राहिले. मुरेला मौर्य नांवाचा एक गुणवान् पुत्र उत्पन्न झाला. व सुनंदेच्या उदरांतून एक मांसाची थैली उत्पन्न झाली. त्या थैलींत नव गर्भ होते. त्याचें, राक्षसानें तेलाच्या भांड्यात घालून फार प्रयत्नानें जतन केलें. त्यांतून नव पुत्र उत्पन्न झाले. त्या सर्वांस बापानें नंद हें नांव ठेविलें, व ते वयांत आल्यावर त्यांच्यावर राज्यकारभार सोंपवून व बुद्धिवान् मौर्याला त्याचें सेनापत्य देऊन आपण मोक्षसाधनेच्या मागें लागला. मौर्याला चंद्रगुप्तादिक शंभर मुलें झालीं. तीं मुलें चंद्रगुप्ताप्रमाणेंच उत्तम व शूर निघालीं.

त्यांच्या योगानें मौर्याचें तेज नंदाहून जास्त पडूं लागलें. ह्या मुळें मौर्याविषयीं नंदांनां मत्सर उत्पन्न झाला. व त्यांनीं त्याला मुलांसुद्धां कपटानें एका लादणींत कोंडून टाकिलें. त्या ठिकाणीं चंद्रगुप्ताखेरीज ९९ पुत्र व मौर्य हे सर्व मरण पावले. चंद्रगुप्तहि मृत्यूच्या पंथाला लागला होता, इतक्यांत सिंहलदेशच्या राजानें एक मेणाचा हुबेहुब सिंह करून त्याला लोखंडाच्या पिंजऱ्यांत घातलें व नंदाकडें पाठवून दिलें, व निरोप पाठविला कीं जर तुमच्यांपैकीं कोणी बुद्धिमान असेल तर त्यानें पिंजरा न उघडतां आंतील सिंहाचें पाणी करावें. हें कूट मंदबुद्धी नंदांच्या ध्यानांत आलें नाहीं. तेव्हां त्यांनीं थट्टाकरण्याकरितां ह्मणून त्या लादणींतून, कंठाशीं प्राण आलेल्या चंद्रगुप्ताला काढून त्याला हें कूट उगवावयाला सांगितलें. चंद्रगुप्त महाबुद्धिमान् होता. त्याच्या लक्षांत तें कूट तेव्हांच आलें. व त्यानें लागलींच तापलेल्या लोखंडाच्या सळईनें त्या सिंहाचें पाणी केलें. त्या वेळेस सर्व लोकांनां फार आश्चर्य वाटलें, व चंद्रगुप्ताची सर्व लोक वाहवा करूं लागले. याप्रमाणें, मारण्याच्या हेतूनें दुष्ट बुद्धि नंदांनीं लादणींत कोंडिलें असूनहि दैव बलवत्तर

असल्यामुळें चंद्रगुप्त अशा रीतीनें वांचला. चंद्रगुप्ताचे ठिकाणीं आजानुबाहुत्वादि सर्व राजचिन्हें होतीं; व शौर्य, औदार्य, गांभीर्य, व विनय यांचा तर केवळ तो निधीच होता. अशा प्रकारचा असूनाहि तो त्या दुष्ट नंदांच्या डोळ्यांत खुपत असे. ह्मणून त्यांनीं त्याचा नाश करण्यास्तव पुष्कळ प्रयत्न केलें. अखेरीस त्यांनीं त्याला अन्नछत्रावर देखरेख करण्याकडे नेमिलें. त्या ठिकाणीं दुष्ट नंदांचा नाश करण्याची संधी बघत चंद्रगुप्त राहिला. एके दिवशीं एक अति रागीट ब्राह्मण त्याच्या दृष्टीस पडला. त्या ब्राह्मणाच्या पायाला एकदां दर्भाचें खुंट लागलें, तेव्हां संतापून जाऊन त्यानें मुळापाळासुद्धां तो दर्भ उपटण्याचा महा खटाटोप केला. हा त्याचा अति रागीटपणा पाहून चंद्रगुप्ताला असें वाटलें, कीं हा ब्राह्मण नंदांचा समूळ नाश करण्यास योग्य आहे. या ब्राह्मणाचें नांव विष्णुगुप्त. हा लहान असतांना शुक्राचार्यांच्या दंडनीतींत व ज्योतिःशास्त्रांत फार प्रवीण झाला. नीतिशास्त्र रचणारा जो चणक, त्याचा हा मुलगा ह्मणून याला चाणक्य ह्मणत. ह्याला सर्व शास्त्र व वेद चांगलें अवगत होतें. गुणवान् चंद्रगुप्तावर याचें प्रेम फार बसलें. तेव्हां चंद्रगुप्तानें त्याला

आपलें सर्व दुःख सांगितलें, तें ऐकून त्या ब्राह्मणानें लागलींच नंदराज्य त्याला मिळवून देण्याचें वचन दिलें. नंतर एकदां तो ब्राह्मण क्षुधार्त होऊन नंदांच्या भोजनशाळेंत जाऊन तेथें मुख्य आसनावर बसला. त्याला तेथें बसलेला पाहून काळानें घेरलेल्या नंदानां राग आला, व ते त्याला 'ऊठ भटुर्ड्या' ह्मणून उटवूं लागले. तो उठेना, तेव्हां अधीकच संतापून त्याला त्यांनीं आसनावरून खालीं ओढिलें. तेव्हां सर्व प्रधान मंडळ हां, हां, ह्मणूं लागलें. पण नंदांनीं त्यानां कांहीं जुमानिलें नाहीं. त्या अपमानामुळें संतापून जाऊन चाणक्यानें सर्व समाजांत उभें राहून हातानें शेंडी सोडली, व प्रतिज्ञा केली कीं ज्या अर्थी दर्पांध दुर्मती नंदांनीं माझा अपमान केला, त्या अर्थीं यांचा समूळ नाश केल्यावांचून मी ही शेंडी बांधणार नाहीं. अशी ती घोर प्रतिज्ञा ऐकितांच नंदांच्या तोंडचें पाणीच पळालें, व ते त्या क्षुब्ध ब्राह्मणाचें समाधान करूं शकले नाहींत. चाणक्यहि अशी घोर प्रतिज्ञा करून तावडतोब नगराबाहेर निघून गेला. चंद्रगुप्तहि आपण पकडलें जाऊं या भीतीनें चाणक्याच्या मागोमाग चालता झाला, व त्याला मिळाला. नंतर चाणक्यानें चंद्रगुप्ताचा पक्ष धरून कुटिल नीतीनें नंदांचा वध करण्याची खटपट चालविली. त्याचा इंदुशर्मा नांवाचा एक मित्र होता, त्याला त्यानें क्षपणकाचा वेष देऊन कपटानें राक्षसादिकांनां फसविलें.

नंदांचें अर्धें राज्य तुला देईन असें वचन देऊन महाबलवान् पर्वतेश्वराला युद्धास उद्युक्त करून त्याच्या प्रबल म्लेच्छ सैन्यांनीं कुसुमपुराला वेढा दिला. तो प्रबल वेढा एकदम पडलेला पाहून नंदांना फार विस्मय उत्पन्न झाला. पण राक्षसाच्या शौर्यामुळें त्या वेढ्यास न डगमगतां ते शत्रूंशीं युद्ध करण्याकरितां निघाले. तथापि त्या घोर रणकंदनांत, पर्वतेश्वराच्या सैन्यरूप वायूनें प्रज्वलित केलेल्या चाणक्याच्या क्रोधरूपी दावाग्नींत सर्व नंद शलभाप्रमाणें बळी पडले. त्यामुळें राक्षसास अतिशय वाईट वाटलें. पण जवळची लढाईची सामुग्री संपल्यामुळें शत्रूंशीं लढून त्यांचा पाडाव करण्याची सोय नव्हती. ह्मणून त्यानें प्रथमतः त्या शत्रूंनीं वेढलेल्या नगरांतून सुरंगद्वारानें वृद्ध नंद सर्वार्थसिद्धि याला नगराबाहेर काढून दिलें, व आपण कपटानें शत्रूंचा नाश करावा या हेतूनें चंद्रगुप्ताशीं स्नेह दाखवून कुसुमपुर त्याच्या स्वाधीन केलें. व नंतर चंद्रगुप्ताकडे आदरपूर्वक नजराणा ह्मणून एक *विषकन्या पाठविली. पण त्याचें तें कपट चाणक्यानें ओळखलें व

* पूर्वी कांहीं लोक कन्येला अगदिं बालपणापासून अतिशय जालीम विष खाण्याची सवय लावीत असत. त्या सवयींमुळें तिचें शरीरच अगदीं विषमय होत असें. व त्यामुळें पुढें तारुण्यांत तिच्याशीं कोणीहि संभोग केला कीं त्याच्या शरीरांत विषसंचार होऊन तो तावडतोब मरत असे.

त्यानें युक्तीनें त्या विषकन्येच्या योगानें पर्वतेश्वर मारला, व आपलें कपट त्याच्या मुलांला आपल्या गुप्त हेरांच्या द्वारें कळवून त्याला भीती उत्पन्न करविली व कुसुमपुराहून पळवून लावलें. याप्रमाणें अराजक कुसुमपूर झालें तेव्हा त्यानें तें हस्तगत करून घेतलें; पण नंदाचे पक्षपाती लोक पुष्कळ लोक असल्यामुळें त्यानें एकाएकीं त्या नगरांत प्रवेश केला नाहीं. कारण राक्षसानें चंद्रगुप्त नगरांत आल्यावर त्यास कपटानें मारण्याकरितां दारुवर्मादिकांच्या हातानें कूटयंत्र वगैरे योजविलें होतेंच. पण चाणक्यानें त्या त्यांच्या सर्व युक्त्या युक्तीनें फसविल्या, व शिवाय आमचा पक्षपाती पर्वतेश्वर राक्षसानेंच विषकन्या पाठवून मारला अशी लोकांत कंडी पिकविली. पर्वतेश्वराचा भाऊ वैरोचक याला, त्याच्या भावाला वचन दिलेलें अर्धें राज्य देण्याचें कबूल केलें व पर्वतेश्वराच्या वधापासून येणारा आपणावरचा दोष टाळला व पुढें त्या वैरोचकाला, पहिल्यानें नगरांत धाडून राक्षसानें योजलेल्या युक्त्यास त्याला बळी पाडलें. सर्वार्थसिद्धी सुरंगानें जो गेला होता तो वनांत तपश्चर्या करीत होता. त्याचा हेराच्या द्वारें पत्ता लाऊन चाणक्यानें त्याला मारलें.

सर्वार्थसिद्धी मेला असें ऐकून राक्षसास फार वाईट वाटलें. तथापि त्या महात्म्यानें आपले प्रयत्न शिथिल न करितां स्वामीच्या ऋणांतून मुक्त होण्याकरितां मलयकेतूचा आश्रय केला, व त्याला सर्व नंदराज्य देण्याचें वचन देऊन लढाईस सिद्ध केलें. मलयकेतूनेंही राक्षसाच्या सल्ल्यानें चालण्याचें कबूल करून प्रबल म्लेंछसैन्य जमवून, कुसुमपुरावर चाल करण्याची जय्यत तयारी चालविली. ही बातमी कुसुमपुरांत सर्वत्र प्रसिद्ध झाली. तेव्हां, मलयकेतूशीं प्रत्यक्ष लढावयाचा प्रसंग आल्यास सर्व कुसुमपूर नंदाचें पक्षपाती असल्यामुळें आपल्याविरूद्ध उलटेल, हें जाणून बुद्धिमान चाणक्यानें प्रत्यक्ष लढाईचा प्रसंग न येऊं देतां मलयकेतूच्या सैन्याचा पार फडशा उडवून, चंद्रगुप्ताच्या नाशाविषयीं ज्याचा दृढ संकल्प, अशा राक्षसाला उलट मंत्रिपद कोणकोणत्या युक्तीनें घ्यावयास लाविलें, हा कथा प्रसंग कवीनें नाटकांत गोंविला आहे.

नाटकांतील पात्रें.

चंद्रगुप्त..............................नंदवंशातील राजा.
चाणक्य..............................त्याचा गुरु व मंत्री.
मलयकेतु....................म्लेच्छराज पर्वतक याचा मु-
मुलगा.
राक्षस....................नंदराजाचा ब्राह्मण कुलामात्य.
चंदनदास.......................... कुसुमपुरांतील जोहरी
राक्षसाचा मित्र.
विराधगुप्त..............................राक्षसाचा गुप्तहेर.
शकटदास..............................राक्षसाचा स्नेही.
भागुरायण..........................चाणक्याचा गुप्तहेर.
सिद्धार्थक }
समिद्धार्थक } ....चाणक्याचे हेर.
क्षपणक........चाणक्याकडील राक्षसाकडे मिळालेला हेर.
कंचुकी, प्रतीहारी, चंदनदासाचा मुलगा व बायको इत्यादि.

मुद्राराक्षस नाटक.

अंक १ ला.

श्लोक–स्रग्धरावृत्त.

सूत्रधार—

'धन्या ही कोण नारी विभुशिरिं बसली,' शंकरातें विचारी॥ अंबा; तीतें विनोदें, वदत 'शशिकला' पंकजाक्ष स्मरारी;॥ 'आहे कां नाम हेंची' वदत हर तदा 'हेंचि तन्नाम पाही॥ देवी सांगे तुला हें परिचित असुनी ठाउकें केविं नाहीं;'॥ 'स्त्रीलागीं मी विचारी, शशिस नच पुसें' पार्वती भाव दावी;॥ 'इंदू हा मान्य नाहीं तरि सखि विजया सत्य सांगेल देवी;'॥ देवी पासूनि गंगेप्रति पशुपति तो गुप्त ठेवायातें॥ योजी जें शाठ्य यत्नें, अवनपर जगीं नित्य होऊं तुह्मातें॥

आणखी

पादांच्या स्वैरपातें अवनति अवनीलागिं होई ह्मणूनी॥ टाकी जो मंदपादें अभिनयसमयीं धूर्जटी शूलपाणी॥ स्वच्छंदें दीर्घबाहु-प्रसरण करितां व्यापितीं

लोक तीन्हीं ॥ संकोचानें ह्मणूनी पसरि पशुपती नर्तनीं बाहु दोन्ही ॥ दृष्टी ठेवी न उग्रा तृतिय नयनिंचा पेट घेईल वन्ही ॥ अग्नि स्फुल्लिंग योगें नयन उघडितां दग्ध होतील प्राणी ॥ या आधारानुधेया त्रिपुरविजयि जो चित्तिं ठेवीत नित्य ॥ रक्षो तुह्मा प्रती तें त्रिभुवनपतिचें भूतलीं दुःखनृत्य ॥

(नांदी झाल्यावर) पुरे; अतिप्रसंग कशाला! आज मला सर्व सभासदांची अशी आज्ञा झाली आहे कीं, "सांप्रत वटेश्वर-दत्त यांचे नातू, व महाराज पृथु यांचे पुत्र विशाखदत्त नांवाचे कवी यांनीं नवीन रचलेल्या मुद्राराक्षस नांवाच्या नाटकाचा प्रयोग करून दाखवावा." खरेंच, उत्तम काव्याचे मर्म-जाणणाऱ्या अशा या सभेपुढें हा प्रयोग करण्याला माझ्याहि मनांत मोठा उत्साह उत्पन्न होतो. कारण उत्तम शेतांत बीज पेरणारा जरी मूर्ख असला तरी तें शेत उत्तम पिकावयाचेंच. साळी चांगल्या उगवण्याला पेरणारा उत्तम असण्याची कांहीं जरूरी नाहीं. तर आतां घरीं जावें आणि प्रियेला हाक मारून प्रयोगाला सुरवात करावी. (जरा फिरून) हेंच आमचें घर. तर आतां आंत जावें. (प्रवेश करून

पाहून) अरे आज माझ्या घरीं हा काय महोत्सव आहे ? ही पहा पाणी आणते ! गंध उगाळण्यांत ही अगदीं गर्क झाली आहे ! विचित्र माळा गुंफतांना तर इची दृष्टी कोणींकडेच जात नाहीं ! आणि मुसळाचा शद्ब झाला कीं इचा हुं शद्ब अगदीं रेखिलेलाच ! हें आज काय असेल बरें ? असो, प्रियेला बोलावून विचारलें पाहिजे. (पडद्याकडे पाहून) प्रिये, जरा इकडे ये बरें.

नटी—(प्रवेश करून) प्रिया ही मी आलें. काय आज्ञा आहे ?

सू०—प्रिये, आज्ञेचें काम राहूं दे क्षणभर. पहिल्यानें मला हें सांग कीं आज हा आपल्या घरीं थाट कशाचा ? आज आपल्या गृहीं श्रेष्ठ ब्राह्मण भोजनास बोलाविले आहेत, किंवा सत्पात्र अतिथींनीं आपलें घर पवित्र केलें आहे ?

न०—प्रिया, आज श्रेष्ठ ब्राह्मण बोलाविले आहेत.

सू०—आज काय आहे ?

न०—आज चंद्रग्रहण आहे ह्मणतात.

सू०—कोण ह्मणतात ?

न०—लोक ह्मणतात.

सू०—प्रिये, मी चौसष्ट अंगांसहित ज्योतिष शास्त्रांत परिश्रम केला आहे, तेव्हां—ब्राह्मणाच्या उद्देशानें चालविलेला पाक चालूं दे,—पण चंद्रग्रहणासंबंधानें मात्र तुला कोणी तरी फसविलें. हें पहा, हा क्रूरग्रह केतू पूर्ण—मंडल जो चंद्र त्यावर झडप घालू पाहतो—(इतक्यांत पडद्यांत " कोणरे हा, मी जीवंत असतांना चंद्रावर झडप घालूं पाहतो " असा शद्ब होतो.)

सू०—(पडद्यांत झालेला शद्ब न ऐकिलासें दाखवून) पण बुधाचा योग त्याचें रक्षण करीत आहे.

न०—(पडद्यांतील शद्ब ऐकिलासें दाखवून) प्रिया, हा कोण बरं, पृथ्वीवर येऊन चंद्राला ग्रहणांतून सोडवीन ह्मणतो ?

सू०—खरेंच, माझें लक्षच नव्हतें. पुन्हां मी त्याच आवाजानें तेच शद्ब उच्चारतो ह्मणजे त्याला तो पुन्हा तेंच उत्तर देईल व मग त्याच्या आवाजावरून ओळ-

खतां येईल हा कोण आहे तें. (पुन्हा क्रूर ग्रह इत्यादि शब्द उच्चारतो व पडद्यांतून पुन्हा कोणरे इत्यादि शब्द येतात ते ऐकून) हां, समजलों. हा कुटिलमति चाणक्य. यानेंच आपल्या क्रोधाग्नींत नंदवंश समूळ जाळून टाकिला. चंद्रावर झडप याचा त्याला चंद्रगुप्तावर झडप असा अर्थ वाटला. हा पहा तो इकडेच येत आहे तर चल आपण येथून निघून जाऊं. (जातात)

(नंतर मोकळी शेंडी गोंजारीत चाणक्य येतो)

चाणक्य—कोणरे हा, मी जीवंत असतां चंद्रगुप्तावर झडप घालूं पहातो ? मत्त-हत्तीचें रक्त पिऊन लाल झालेली अशी सिंहाची दाढ त्याच्या जबड्यांतून कोण बाहेर ओढण्याची इच्छा करितो ? अरे, नंदकुलाला कालसर्पीण अशी ही माझी शेंडी मी अद्यापि बांधूं नये अशी कोणाला वासना झाली आहे ? नंदकुल-काननाला भस्म करणाऱ्या अशा या माझ्या क्रोधाग्नींत पतंगाप्रमाणें जळण्याची कोण इच्छा करितो ? (इकडे तिकडे फिरून) शार्ङ्गरवा, अरे शार्ङ्गरवा !

शिष्य०—(घाबरत घाबरत येऊन) काय आज्ञा गुरुजी?

चा०—वत्सा, बसावयाचें आहे.

शि०—गुरुजी, हें आसन, यावर बसावें.

चा०—(शिष्यास) वत्सा भिऊं नकोस, मी तुझ्यावर रागावलों नाहीं. कामामुळें मी अतिशय त्रासलों आहें. (बसून आपल्याशीं) काय चमत्कार आहे पहा! नंदराजांचा अमात्य राक्षस हा आपल्या प्रभूच्या नाशामुळें संतापून जाऊन, पर्वतकाच्या मृत्यूमुळें खवळलेल्या आणि नंदाचें सर्व राज्य मिळेल या आशेनें उत्साह पावलेल्या पर्वतकपुत्र मलयकेतूबरोबर संधी करून, त्याच्या सर्वसैन्यासह चंद्रगुप्तावर स्वारी करण्याच्या खटपटींत आहे, ही गोष्ट आतां प्रसिद्धच झाली आं! (विचार करून) अं:, पण त्याची काय पर्वा आहे! ज्यानें सर्व लोकांसमक्ष नंदवंशाच्या वधाची प्रतिज्ञा केली आणि ती शेवटास नेली, त्याला ही फुटत चाललेली गोष्ट छपविणें काय कठीण आहे! अहो, माझा क्रोधाग्नि खेदामुळें शांत झाला असें नाहीं; तर त्याला इंधन नाहीं ह्मणून तो शांत झाला आहे. माझा

क्रोधाग्नि पेटल्याबरोबर त्यानें शोकरूपी धूम्र उत्पन्न करून शत्रूंच्या स्त्रियांचीं तोंडें काळीं केलीं; मोहरूपी भस्मानें मोठमोठे राजकार्यधुरंधर मंत्री अंध केले; भय पावलेल्या नागरिकांचें रक्षण करून फक्त नंद वंशाचे अंकुर तेवढे जाळले ; आणि आतां जाळायला कांहीं उरलें नाहीं ह्मणून माझा क्रोधाग्नी शांत झाला आहे; थकल्यामुळें नव्हे. अहो, मला नंदानें मुख्यासनावरून ओढलेलें पाहून ज्यांना वाईट वाटलें, पण राजाच्या भयामुळें जे बोलूं शकले नाहींत, त्यांनीं आतां मी त्याच नंदाला वंशासुद्धां सिंहासनावरून खालीं पाडलेलें पाहून खुशाल आनंद मानावा. अशी मी ती दुर्धर प्रतिज्ञा शेवटास नेली. आतां प्रतिज्ञा पूर्ण झाली तरी केवळ या दासीपुत्र चंद्रगुप्ताकरितां ह्मणून शस्त्र धारण करितों. माझ्या संतापाचा परिणाम नंदांनीं अनुभविला आणि ते समूळ नष्ट झाले; आणि माझ्या प्रीतीचा परिणाम दासीपुत्र चंद्रगुप्त अनुभवीत आहे, आणि राज्यलक्ष्मी त्याचे ठिकाणीं स्थिर झाली आहे. (विचार करून) अरे, पण जो पर्यंत राक्षस धरला गेला नाहीं, तों पर्यंत नंद

वंश नष्ट झाला असें कसें ह्मणतां येईल ? आणि राज्यलक्ष्मी चंद्रगुप्ताचे ठिकाणीं स्थिर तरी कशी होईल? राक्षसाची नंद वंशाचे ठिकाणीं अप्रतिम भक्ति आहे. नंदवंशांतील कोणीहि पुरुष जोंपर्यंत जिवंत आहे तोंपर्यंत चंद्रगुप्ताची प्रधानकीचीं वस्त्रें त्याच्याकडून घेवविणें अति दुष्कर आहे. या संबंधानें आपण स्वस्थ बसणें श्रेयस्कर नाहीं, असें जाणूनच मी नंदवंशांतला सर्वार्थसिद्धि, बिचारा तपोवनांत जाऊन तपश्चर्या करीत होता, पण त्यालाहि मारविलें. आतां या राक्षसानें मलयकेतूचा आश्रय धरून आमचा उच्छेद करण्याचा प्रयत्न चालविला आहे. (वर पाहून) शाबास, अमात्य राक्षसा शाबास, मंत्रि बृहस्पते शाबास, जोंपर्यंत जवळ पैसा आहे तोंपर्यंत सेवा करणारे लोक सर्वच. आणि पैसा जाऊन धन्याला विपत्ती आल्यावरहि जे लोक त्याची सेवा करितात, ते केवळ त्याची विपत्ती जाऊन त्याला संपन्न दशा येईल या आशेनेंच. पण धन्याचा समूळ नाश झाल्यानंतरहि केवळ त्याचे पूर्वोपकार आठवून, निःसीमभक्तीनें त्याच्या कार्याकरितां झटणारे तुझ्यासारखे धन्य पुरुष

कार दुर्लभ. अशाप्रकारचा तूं आहेस ह्मणून तर तुझ्याहातून चंद्रगुप्ताची प्रधानकीचीं वस्त्रें घेवविण्याचा आमचा एवढा प्रयत्न. कारण, सेवक इमानी आहे, पण मूर्ख आहे आणि भित्रा आहे, तर काय कामाचा? तसेंच शाहणा आहे, शूर आहे, पण बेमान आहे, तर त्याचा काय उपयोग? पण जे शूर, शाहणे आणि इमानी आहेत, ते राजाचे खरे सेवक; बाकीचे आपले स्त्रियासारखे शोभेखातरच. ह्मणून मीहि कांहीं स्वस्थ बसलों नाहीं. यथाशक्ति राक्षसाला धरण्याविषयीं प्रयत्न चालविलाच आहे. कोणता ह्मणाल तर, चंद्रगुप्त किंवा पर्वतक या दोघांपैकीं कोणीहि मेला, तरी त्यांत चाणक्याचें नुकसानच आहे, या हेतूनें राक्षसानें विषकन्या पाठवून आमचा परमस्नेही पर्वतक मारविला अशी मी लोकांत कंडी पिटविली आहे. आणि ती खरी वाटावी, ह्मणून भागुरायणाकडून पर्वतकपुत्र मलयकेतूला तुझा बाप चाणक्यानें मारविला अशी भीति घालवून येथून पळवून लावलें. तसेंच अनुकूल, व प्रतिकूल कोण आहेत, हें जाणण्याकरितां अनेकभाषा जाणणारे असे हेर मीं नेमिले आहेत.

कुसुमपुरांत राहणाऱ्या नंदांच्या अमात्याच्या स्नेह्याच्या वागणुकीवर बारीक नजर ठेविली आहेच. चंद्रगुप्ता बरोबरच उदयास आलेले भद्रभटादिक प्रधान यांनां निरनिराळ्या कारणांवरून खूष ठेविलें आहेच. शत्रूनें योजलेल्या तीक्ष्णरसावर कडक उपाय जाणणारे, व हुषार व आळस न करणारे असे पुरुष राजाजवळ ठेविले आहेत. आमचा विष्णुशर्मा नांवाचा सहाध्यायी स्नेही आहे. तो राजनीतींत आणि चौसष्ट अंगांसहित ज्योतिषशास्त्रांत प्रवीण आहे. त्याला नंदवधाची प्रतिज्ञा केली तेव्हांच क्षपणकाचा वेष देऊन कुसुमपुरास आणलें होतें, व त्याला नंदाशीं स्नेह करण्यास लाविलें होतें. विशेषतः राक्षसाचा त्याच्यावर फार विश्वास जडला होता. त्यांच्याकडून आतां महत्वाचें काम होणार आहे. या प्रमाणें आमचीहि तयारी कांहीं कमी नाहीं. चंद्रगुप्त मात्र आमच्यावर सर्वभार टाकून स्वस्थ बसला आहे. बरोबरच आहे; कांहींच श्रम न करतांनां जें राज्य मिळतें तेंच सुखदायक वाटतें. राजे आणि हत्ती बलवान जरी आहेत, तरी त्यांनां स्वतःच्या उपजीविकेकरितां मेहनत

करावी लागली ह्मणजे दुःख होतें.

(यमपट धारण करणारा एक हेर प्रवेश करितो.)

गाणें

हेर—

यमराजाला नमस्कार। करा त्यो द्यव हाय लइ थ्वोर। दुसऱ्याच करितां पुंजन। लवकर करित्यो परानहरन। जरि हाय त्यो द्यव लइ क्रूर। त्येची करितां भक्ती फार। जीवन देतुया तुह्माला। आमचं त्योच हाय द्यव काळा॥

आतां या घरामंदी जाव, आन् यमपट दाखवाव. (आंत जाऊं लागतो)

शिष्य—अरे आंत जाऊं नकोस.

हेर—कायर बामना, कुनाच हाय ह्य घर ?

शि०—आमच्या गुरुजींचें. त्यांचें नांव आर्यचाणक्य आहे.

हेर—तर मंग, बामना, आमच्या धरमाच्या भावाचंच घर हाय ह्य. तर जाउ दे कीं आंतमंधी. तुझ्या गुरुस्नी मी धरम सांगन.

शि०—चल मूर्खा, आमच्या गुरूपेक्षां तूं धर्म जाणणारा आहेस काय?

हेर—आर बामना, रागावूं नग. समद्यास्नी संमदच न्हाइ येत बग. वाइच तुझ गु॰ जानतुया, वाइच मीत्री जानतुया.

शि०—मूर्खा, आमच्या गुरूजीची सर्वज्ञता चोरतोस काय?

हेर—आर बामना, तुझ्या गुरूस्नी संमद येतया व्हय?

शि०—हो हो.

हेर—तर सांग म्हनाव चांद कोनास्नी आवडत न्हाइ त्य.

शि०—मूर्खा आमच्या गुरूला काय करावयाचें हें जाणून ?

हेर—तुझ्या गुरूस्नीच ठाव हाय बघ ह्य जानुनशान काय काम हाय त्य. तू भोळा सांब हायस. तुला एवढच ठाव की कमळाला चांद आवडत न्हाइ ह्मून. पन कंच्या कमळाला चांद आवडत न्हाइ ह्य कुठ तुला ठाव हाय ?

चा०—(हेराचें भाषण ऐकून आपल्याशीं) चंद्रगुप्ताच्या विरुद्ध कोण कोण आहेत हें मला माहीत आहे असें यानें दर्शविलें.

शि—मूर्खा, काय भलतेंच बडबडतोस हें ?

हेर—अर बामना, सोयतच व्हइल कीं ह्य.

शि०—केव्हां.

हेर—ऐकनार आन् जाननार कुनी मिळल तव्हां.

चा०—(पाहून हेरास) बाबा, खुशाल आंत ये. ऐकणारा आणि जाणणारा तुला मिळेल.

हेर—(आंत येऊन) ह्मराजांचा जयजयकार असो.

चा०—(विचार करून आपल्याशीं) कामें पुष्कळ असल्यामुळें याची कोणत्या कामाकडे नेमणूक केली होती तें आठवत नाहीं. हां आठवलें. नगरवासी लोकांचीं मनें ओळखण्याकरितां याची नेमणूक केली होती. (उघड) गड्या आलास ? बरें झालें. खालीं बैस.

हेर—आज्ञा (खालीं बसतो).

चा०—गड्या, सांग काय कामगिरी बजाविलीस तें. चंद्रगुप्तावर मंत्रिमंडळीचें प्रेम आहेना ?

हेर—या मंदी काय संशेय ? ह्मराजांनीं संमद्यांची अप्रीतीची कारनंच न्हाइशी केल्याती. मंग ह्मराज चंद्रगुप्ताचे ठिकानीं सर्वांच प्रेम असनारच. पन या

नगरामंदी अमात्य राखुसाशी ज्येचं स्नेह व्हता असं तीन पुरुस हायती. त्येसनी मातर म्हाराज चंदरगुप्ताचं वैभव बघवत न्हाइ बघा.

चा०—मग त्यांना आपलें जीवितही पाहवत नाहीं असें म्हण. त्यांचीं नांवें माहीत आहेत ?

हेर—नांव ठाव करून घेतल्याबिगर म्हाराजांच्या पायापाशीं येईन कसा ?

चा०—तर मग सांग मला ?

हेर—ऐकाव. म्हाराजांनीं पहिल्यानं आपल्या सत्रूकडचा पक्स धरनार खपनक.

चा०—(आनंदानें आपल्याशीं) आमच्या शत्रूकडचा पक्ष धरणारा क्षपणक ! (उघड) त्याचें नांव काय ?

हेर—त्येचं नांव जीवसिद्धी.

चा०—बरें, आपल्या शत्रूकडचा पक्ष धरणारा तो आहे हें तूं कसें जाणलेंस ?

हेर—त्येनच तर अमात्यराखुसानें पाठविलेली इसकन्या म्हाराज पर्वतेश्वराकड पाठविली.

चा०— (आपल्याशीं) जीवसिद्धी तर आमचाच गुप्तहेर

आहे; (उघड) बरें, दुसरा कोण ?

हेर---दुसरं अमात्यराखुसाचं प्रियमितर शेकुटदास नांवा-च कायत.

चा०-- (आपल्याशीं) कायस्थ ह्मणजे क:पदार्थ. तथापि क्षुल्लक शत्रूकडे सुद्धां दुर्लक्ष करणें रास्त नाहीं, ह्मणून मी त्याच्यावर मैत्रीच्या मिषानें सिद्धार्थकाची योजना केली आहे. (उघड) बरें, तिसरा कोण तें सांग पाहूं ?

हेर---तिसरं, अमात्यराखुसाच दुसरा जीवच अस कुसुमपूच राहनार, जेव्हराचा बेपारी चंदनदास. त्यच्या घरीच अमात्यराखुस आपल्या बायकापोरास्नी ठेऊनशान नगराभाहिर गेलाय.

चा०-- (आपल्याशीं) खरोखरच प्रियतम मित्र ह्मटला पाहिजे तो. नाहींतर भलत्याचेच येथें राक्षस आपल्या कुटुंबाला कधीं ठेवणार नाहीं. (उघड) बरें, चंदनदासाचे येथें राक्षसानें आपलें कुटुंब ठेविलें हें तुला कसें समजलें ?

हेर--- (हातांतून आंगठी काढून) ह्य अंगुठी पाहाव

ह्मारा राजानीं, ह्य सांगल, ह्माराजास्नीं मला त्य कस कळलं से.

चा०— (पाहून) राक्षसाचें नांव हें ! (आनंदानें) वाहवा, आतां राक्षसच आमच्या हातीं आला. (उघड) गड्या ही अंगठी तुला कोठें व कशी सांपडली सांग पांहू. ?

हेर—ऐकाव ह्माराजांनीं. ह्माराजांनीं माझी नगरातल्या लोकांचीं मनं बघण्याकड योजना केली. तव्हां मी ह्यो यमपट घेउनशान् हिंडूं लागलो. त्येच्यामुळें माझ्याविशी कुनालाबी संशय येइना, आन मला कुठबी जायास्नी अडथळा व्हायला न्हाइ. तव्हां मग मी एकदा, या चंदनदासाच्या घरी गेलो, आन् तथ ह्यो यमपट दाउनशान् गाणीं ह्मणूं लागलो.

चा०—बरें पुढें ?

हेर—तव्हां तथ एका पडद्यामधूनशान् योक पाच वरसाच एक सुंदर देखन मुलग खेळत खेळत भाहिर निघूं लागलं. तव्हां 'गेलं गेलं' असा एकच त्या पडद्यापलिकड कल्ला झाला. आन् त्ये सरसा, त्य

पडद्यामधूनशान् एका येलीसारख्या हातान त्या प्वो-राला आंत वढून घेतलया. तव्हां त्ये गडबडीमंदी त्य हाताच्या बोटामधूनशान् यक पुरुसाच्या बोटाची अंगुठी पडलीया. त्य कांहीं कुन्हाच्या ध्येनांत आलं न्हाइ बगा. त्य अंगुठी वरंगळत वरंगळत माझ्यं पायापाशीं येऊनशान् थबकलीया. मी बी अमात्यराखुसाच्या नांवाची हाय असं पाहूनशान् म्हाराजाच्या पायापाशीं आनलीया. असा ह्यो आंगुठीचा इतिहास हाय बगा.

चा०—समजलें सारें. तूं जा आतां. तुझ्या श्रमाचें फळ तुला लौकरच मिळेल. (हेर 'आज्ञा' ह्मणून जातो) शार्ङ्गरवा, शार्ङ्गरवा! वत्सा, कलमदान आण पाहूं.

शि०—आज्ञा (जाऊन येऊन) गुरुजी हें कलपदान.

चा०—(कलमदान सोडून कागद घेऊन) काय लिहावें बरें? या पत्रानें राक्षस जिंकला गेला पाहिजे.

प्रतिहारी—(प्रवेश करून) आर्यांचा जयजयकार असो.

चा०—(आनंदानें आपल्याशीं) काय जयजयकार असो? स्वीकारला जयजयकार. (उघड) शोणोत्तरे, कां आलीस?

प्र०—आर्या, हस्तकमलें मस्तकावर ठेऊन महाराज चंद्रगुप्त विनवितात कीं आपली आज्ञा असल्यास महाराज पर्वतेश्वरांची उत्तरक्रिया करून, त्यांचीं भूषणें उत्तम सत्पात्र ब्राह्मणाला दान करावीत अशी इच्छा आहे.

चा०—(आपल्याशीं) शाबास चंद्रगुप्ता, शाबास. जसें काय माझ्या मनानेंच तुला प्रेरणा केली. (उघड) शोणोत्तरे, आमचा निरोप सांग चंद्रगुप्ताला कीं, वत्सा शाबास, लोकव्यवहार तुला चांगले माहीत आहेत. तर तुझी जी इच्छा आहे त्याप्रमाणें तूं कर. पण पर्वतेश्वराचीं जीं भूषणें आहेत, तीं मौल्यवान असल्यामुळें गुणवान ब्राह्मणालाच दिलीं पाहिजेत. करितां मी इकडून परीक्षा करून ब्राह्मण पाठवितों.

प्र०—जशी आर्यांची आज्ञा (जाते)

चा०—शार्ङ्गरवा, विश्वावसू प्रभृति तिघा भाग्वांनां माझा निरोप सांग कीं चंद्रगुप्ताकडे जाऊन पर्वतेश्वराचीं आभरणें दान घ्यावींत व मला भेटावें.

शि०—आज्ञा (जातो).

चा०--पत्रांतला पुढला मजकूर तर जुळला. पूर्वींचा कसा जुळवावा बरें ? हां. ठीक. हेरापासून मला समजलेंच आहे कीं म्लेंच्छ राजांच्या सैन्यांत मुख्य पांच राजे राक्षसाच्या पूर्ण सल्यानें चालतात. एक कुलूत देशाचा राजा चित्रवर्मा; दुसरा मलयदेशचा राजा सिंहनाद; तिसरा काश्मीर देशाचा राजा पुष्कराक्ष; चौथा सिंधुदेशचा राजा सिंधुषेण; आणि पांचवा पारसीकांचा राजा मेघाक्ष. या पांचांचीं नांवें लिहितों. यमराजाला ह्मणावें पुसा हीं आतां (विचारकरून) अथवा नको. गुप्तच असूं द्यावींत. [उघड] शार्ङ्गरवा !

शि०—काय आज्ञा गुरुजी ?

चा०—वत्सा, ब्राह्मणाचीं अक्षरें ह्मणजे कशींतरी ओबडधोबड आणि दुर्वाच्य अशीं असतात, ह्मणून सिद्धार्थकाला माझा असा निरोप सांग कीं (कानांत सांगून) असा, कोणाचा तरी, कोणाला तरी कांहीं तरी निरोप आहे असें लिही; आणि वरच्या पत्त्या शिवाय बाकीचें सारें पत्र शकटदासाकडून लिहवून मला भेट. आणखी ह्मणावें कीं त्याला कळूं देऊं नकोस चाणक्य हें पत्र लिहवितो ह्मणून.

शि०—आज्ञेप्रमाणें करितों [जातो].

चा०—बस, मलयकेतू जिंकलाच.

सिद्धार्थक— [प्रवेशकरून] जयजयकार असो म्हाराजां-चा. म्हाराज, ह्य पत्तर म्यां लेहविलें शेकुटदासाच्या हातूनशान्.

चा०— [पत्रपाहून] काय सुंदर अक्षर आहे हो! [वाचून] गड्या, या अंगठीनें याच्यावर शिक्का कर.

सि०—आज्ञा [तसेंकरून] केला म्हाराज ह्यो शिक्का. आनखी काय आज्ञा हाय.

चा०—वत्सा जें काम मी स्वतः करावयाचें अशा कामीं मला तुझी योजना करावयाची आहे.

सि०—ह्यो तर मोठाच परसाद म्हाराजांचा. तर सांगाव म्हाराज कंच काम करायच हाय त्ये.

चा०—पहिल्यानें तूं सुळी देण्याच्या जागीं जा, आणि तेथें रागावल्यासारखें दाखीव व मारेकऱ्यांना उजव्या डोळ्यानें खूण कर. तुझी खूण पाहिल्याबरोबर ते भ्यालेसें दाखवून इकडे तिकडे पळत सुटतील. आणि

मग तूं शकटदासाला पळवून राक्षसाकडे पोंचीव; व प्राणप्रिय मित्र वाचविल्याबद्दलचें बक्षीस त्याजपासून उपट; आणि मग कांहीं दिवस त्याच्याच तैनातींत राहा. मग पुढें सर्व सैन्यासह जेव्हां शत्रू इकडे येतील तेव्हां मग असें कर [कानांत सांगतो]

सि०—आज्ञेपरमान करतुया.

चा०—शार्ङ्गरवा.

शि०—आज्ञा.

चा०—वत्सा, कालपाशिक आणि दंडपाशिक यांनां जाऊन सांग कीं जो हा क्षपणक जीवसिद्धी आहे, यानें राक्षसानें पाठविलेल्या विषकन्येच्या योगानें पर्वतेश्वरांचा प्राण घेतला अशी दवंडी पिटवून, त्याची धिंड काढून त्याला नगरांतून हांकून द्या, अशी चंद्रगुप्ताची आज्ञा आहे ह्मणून.

शि०—आज्ञा [जाऊं लागतो]

चा०—वत्सा, थांब. आणखी हा जो दुसरा कायस्थ शकटदास नांवाचा आहे, तो राक्षसाच्या चिथावणीनें नेहमीं आमचा द्वेष करितो; त्याच्या या अपराधाची दवंडी

पिटवून त्याला सुळावर चढवा, व त्याच्या बायकापोरांनां बंदिशाळेंत टाका

शिष्य—आज्ञा [निघून जातो]

चा०— [सचिंत] हा दुरात्मा राक्षस घेतला जाईल ?

सिद्धार्थक—घेतलया.

चा०— [आपल्याशीं] वाहवा ! घेतला राक्षस. [उघड] अरे कोण घेतला ?

सि०—महाराजांचा निरूप घेतलया.

चा०—जा, वत्सा, तुझी कार्यसिद्धि होवो.

सि०—आज्ञा (जातो ;

शि० (येऊन) गुरुजी कालपाशिक आणि दंडपाशीक यांची अशी विनंती आहे कीं महाराज चंद्रगुप्तांच्या आज्ञेप्रमाणें सर्व करितों.

चा०—ठीक आहे. वत्सा, मणिकारश्रेष्ठी चंदनदासाला भेटण्याची इच्छा आहे.

शि०—आज्ञा [जातो व चंदनदासासह येऊन] असें यावें शेटजी.

चंदनदास— [आपल्याशीं] दुष्ट चाणक्याचें बोलावणें आलें कीं एखाद्या निर्दोष मनुष्याचें मनांत सुद्धां शंका उत्पन्न होते, मग माझ्या सारख्या सदोष मनुष्याच्या तर येणारच. ह्मणून मी धनसेन वगैरे तिघां शेटजींला सांगितलेंच आहे कीं दुष्ट चाणक्य जर माझें घर शोधावयास आला तर तुह्मीं अमात्यराक्षसाच्या मंडळींला तेथून गुप्तरीतीनें पळवा. मग माझें कांहीं होवो.

शि०—शेटजी या असें या.

चंद०—हा मी आलों.

शि०—गुरुजी हे चंदनदास आले.

चंद०— [येऊन] महाराजांचा जयजयकार असो.

चा०—या शेटजी, असें आसनावर बसा. [आपल्या आसनावर बसावयास सांगतों]

चंद०—महाराजांना अवगत आहेच कीं अनुचित सत्कार झाला ह्मणजे मरणापेक्षांही जास्त दुःख होतें. ह्मणून ह्मणतों आह्मीं आपले योग्य आसनावरच बसावें. [जमिनीवर बसूं लागतो]

चा०—छे छे शेटजी, तुह्मी आमच्याबरोबर आसनावर

बसावें हेंच तुह्माला योग्य अहे. ह्मणून ह्मणतों या असें इकडे या.

चंद०—[आपल्याशीं] कुत्सितपणाला आरंभ झाला (उघड) जशी महाराजांची मर्जी (जमिनीवरच बसतो).

चा०—कसें काय शेटजी, व्यापारांत फायदा वगैरे ठीक होतोनां?

चंद०—महाराजाच्या कृपेनें सर्व ठीक चाललें आहे. [स्वगत] हा अत्यादर भीति उत्पन्न करतो.

चा०—कायहो शेटजी, चंद्रगुप्ताच्या दोषामुळें मागील राजाचे गुण लोकांनांआठवत असतील नाहींत्ररें?

चंद०—[कानावर हात ठेऊन] छे छे महाराज, असें कसें होईल? शरदृतूंतल्या पूर्णचंद्राप्रमाणें महाराज चंद्रगुप्ताला पाहून लोक अगदीं आनंदित आहेत.

चा०—तुह्मीं ह्मणतां असें जर आहे तर आनंदित प्रजेनें राजाचे उतराई झालें पाहिजे, नाहीं बरें?

चंद०—महाराजांनीं आज्ञा करावी या दासापासून

किती धनाची इच्छा आहे.

चा०—(हांसून) शेटजी हें चंद्रगुप्ताचें राज्य आहे. नंदाचें राज्य नाहीं. नंद लोभी असल्यामुळें त्याला पैशानें संतोष होत असे. पण चंद्रगुप्ताला तुह्मी सुखी असलां ह्मणजेच संतोष आहे.

चंद०—हा महाराजांचा आमच्यावर मोठाच अनुग्रह.

चा०—तर मग शेटजी प्रजेनें आपला आनंद कसा प्रदर्शित करावा हें नाहीं तुह्मी विचारलें?

चंद०—सांगावें महाराजांनीं.

चा०—थोडक्यांत सांगतों. राजाच्या विरुद्ध न गेल्यानें.

चंद०—महाराज, असा कोण फुटक्या नशीबाचा आपणाला दिसला कीं जो राजाच्या विरुद्ध वागतो?

चा०—पहिल्या प्रथम तुह्मीच.

चंद०—(कानावर हात ठेऊन) हर हर! गवतानें अग्नीशीं कसा विरोध करावा?

चा०—विरोध असा कीं तुह्मी अद्यापि राजाचा शत्रू जो अमात्यराक्षस याचें कुटुंब घरीं छपवून ठेविलें आहे.

चंद०—महाराज, अगदीं खोटी गोष्ट ही. कोणीतरी दुष्टानें आपले कान भरविले.

चा०—शेटजी, यांत कांहीं नवल नाहीं. माजीराजांचे नौकर देशांतराला जातांना, नगरवाशी लोकांच्या येथें, त्यांच्या मर्जी विरुद्ध आपली मंडळी ठेवितातच. पण तें छपविणें हाच कायतो गुन्हा.

चंद०—ही गोष्ट खरी कीं त्यावेळेस आमचे येथें अमात्य-राक्षसाचें कुटुंब होतें.

चा०—(हांसून) पहिल्यानें अगदींच नाहीं ह्मणालां आणि आतां होतें असें ह्मणतां ? हीं दोन्हीं उत्तरें परस्पर विरुद्ध आहेत !

चंद०—ही केवळ जिभेची फसवणूक.

चा०—शेटजी चंद्रगुप्ताच्या राज्यांत फसवणूक बिलकुल नाहीं. तर राक्षसाचें कुटुंब आमच्या स्वाधीन करा आणि या फसवणुकींतून मोकळे व्हां.

चंद—महाराज, मीं पूर्वींच आपणाला विनविलें कीं त्या-वेळेस माझ्या येथें अमात्यराक्षसाचें कुटुंब होतें.

चा०—मग आतां कोठें आहे ?

चंद०—आतां कुठें आहे तें मला माहीत नाहीं.

चा०—काय ? माहीत नाहीं ? शेटजी भय डोकीवर आहे आणि त्याचा उपाय फार दूर आहे बरें ! आणि नंदाला ज्याप्रमाणें विष्णुगुप्तानें–(अर्धेच बोलून लाजतो तोंच)

चंद०—(आपल्याशीं) खरेंच, सर्पाचें वेटोळें गळ्यांत, आणि सर्पदंश बाधा दूर करणाऱ्या औषधी हिमालयावर.

चा०—अमात्यराक्षस चंद्रगुप्ताला राज्यभ्रष्ट करील असें समजूं नका. पहा, वक्रनासासारखे शूर व कारस्थानी सचिव असतांना आणि नंदासारखा राजा जिवंत असूनही जी राजलक्ष्मी अतिचंचलत्वामुळें त्याच्या ठिकाणीं स्थीर झाली नाहीं तीच आतां चंद्रगुप्ताच्या ठिकाणीं एकवटून स्थीर झाली आहे. तेव्हां चंद्रापासून जशी चंद्रकांती तशीच चंद्रगुप्तापासून राजलक्ष्मी दूर करण्याची कोणाची छाती आहे ? ("मत्तहत्तीचे" एथून तों "जळण्याची कोण इच्छा करतो" एथवर पान ९ यांतील भाषण पुन्हां ह्मणतो).

चंद०—(आपल्याशीं) करून दाखविशील तेव्हां तुझें ह्मणणें खरें. नाहींतर बडबडच नुसती!

(पडद्यांत दूर व्हा, दूर व्हा अशी गडबड होते.)

चा०—शार्ङ्गरवा, कशाची गडबड आहेरे ही?

शि०—(आज्ञा ह्मणून जातो व पुन्हां येऊन) गुरुजी, चंद्रगुप्ताच्या आज्ञेनें राजद्रोह करणाऱ्या जीवसिद्धीला धिंड काढून नगरांतून काढून देत आहेत.

चा०—कोण क्षपणक? अरेरे!! अथवा भोगो बिचारा राजद्रोहाचें फळ. शेटजी, राजद्रोहाला पहा कशी कडक शिक्षा होते ती. ह्मणून ह्मणतों माझें ह्मणणें ऐका. राक्षसाचें कुटुंब देऊन टाका, आणि मग राजाची प्रीति संपादन करून तुह्मी आनंदांत असा. (पुन्हा पडद्यांत गडबड)

चा०—शार्ङ्गरवा, पहारे हें पुन्हा काय आलें तें?

शि०—(आज्ञा ह्मणून जाऊन पुन्हा येऊन) गुरुजी, राजाज्ञेनें हा दुसरा राजद्रोही कायस्थ शकटदास सुळावर जात आहे.

चा०—भोग आपलें कर्म आतां. शेटजी, पाहिलेंतना,

राजा कशी राजद्रोहाला कडक शिक्षा करतो ती! तर तुह्मीं राक्षसाचें कुटुंब छपविलें आहे तें त्याला खपणार नाहीं. ह्मणून ह्मणतों त्याचें कुटुंब देऊन आपलें कुटुंब रक्षण करा.

चंद०—महाराज, मला भय दाखवितां काय! अमात्य राक्षसाचें कुटुंब घरीं असतें तरी दिलें नसतें, मग नाहीं तर देणार नाहींच.

चा०—चंदनदास, हा तुमचा पक्का निश्चय?

चंद०—हो हो! हा माझा पक्का निश्चय.

चा०—(आपल्याशीं) शाबास, चंदनदास शाबास. पैसा मिळत असला ह्मणजे दुसऱ्याकरितां झीज सोसणारे पुष्कळ. पण तुझ्यासारखा निवळ परोपकारी मात्र शिबी शिवाय दुसरा सांपडणें कठीण. (उघड) चंदनदास, निश्चय पक्का नां?

चंद०—हो हो! निश्चय पक्का.

चा०—(रागानें) दुष्टा वाणगटा, भोग तर राजद्रोहाचें फळ.

चंद—हा मी तयार आहें. गाजवा तुह्मी आपला अधिकार वाटेल तितका.

चा०—शार्ङ्गरवा, कालपाशिक आणि दंडपाशिक यांना माझा निरोप सांग कीं या दुष्ट वाणगटाला कैद करा. अथवा थांब. दुर्गपाल आणि विजयपाल यांना सांग कीं याच्या घरदाराची जप्ती करून याला बायकापोरांसुद्धां बंदींत टाका. तोंपर्यंत मी चंद्रगुप्ताकडे जाऊन त्याला हा सर्व वृत्तांत कळवितों ह्मणजे तो स्वतःच याचें सर्वस्व हरण करून याचा प्राणहरण करण्याची शिक्षा सुनावील.

शि०—आज्ञा. शेटजी, चला असें.

चंद०—(उठून) महाराज घेतों आपली आज्ञा. (आपल्याशीं) मित्राकरितां नाश होत आहे, माझा कांहीं दोष नाहीं ह्मणून मला आनंद होत आहे. (शिष्या बरोबर निघून जातो.)

चा०—(आनंदानें) आतां राक्षस खास हातीं आला. त्याच्याकरितां ज्याप्रमाणें हा प्राण द्यावयास तयार झाला, त्याप्रमाणेंच तोही याच्याकरितां प्राण द्यावयास तयार होईल. (पडद्यांत गलबला होतो) शार्ङ्गरवा!

शि०—आज्ञा.

चा०—वत्सा, कशाचीरे गडबड ही?

शि०—(जाऊन परत येऊन) गुरुजी, शकटदासाला वध्यस्थानापासून सिद्धार्थक घेऊन पळून गेला!

चा०—(आपल्याशीं) शाबास सिद्धार्थका, शाबास! तूं आपल्या कार्याला तर आरंभ केलास. (उघड) काय? घेऊन पळून गेला? वत्सा, भागुरायणाला सांग कीं त्याला जलदी पकडा.

शि०—(आज्ञा ह्मणून जाऊन येऊन) गुरुजी, भागु-रायणही गेला!

चा०—(आपल्याशीं) जाऊन कार्यसिद्धी करो. (उघ-ड रागानें) वत्सा हरकत नाहीं. भद्रभट, पुरुषदत्त, हिंगुरात, बलगुप्त, राजसेन, रोहिताक्ष, आणि विजय-वर्मा, यांना माझा निरोप सांग कीं तुम्ही पाठलाग करून दुष्ट भागुरायणाला पकडून आणा.

शि०—(पुन्हा जाऊन व परत येऊन) गुरुजी, फारच दुःखाची गोष्ट. सगळेंच तंत्र बिघडलें, तेहि भद्र-भटादिक सगळे, दिवस उजाडण्यापूर्वींच पळून गेले!

चा०— (आपल्याशीं) सगळ्यांना मार्ग सुखकर होवो. (उघड) वत्सा, कांहीं हरकत नाहीं. भिऊं नकोस. अरे जे लोक पूर्वीं कांहीं मनांत कावा धरून गेले ते गेलेच. त्यांच्या मागून ज्यांना जावयाचें असेल त्यांनीं-ही खुशाल जावें. पण जिनें नंदाला समूळ उपडून काढून, आपला प्रभाव गाजविला, अशी, कार्यधुरंधर, व सेनाशताहूनही अधिक अशी ही माझी बुद्धि न गेली ह्मणजे झालें. (उठून त्वेषानें) हा पहा दुष्ट भद्रभट प्रभृतींना ओढून आणतो (आपल्याशीं) दुरात्म्या राक्षसा ! आतां कोठें जाशील ? सांप्रत तूं वनांतल्या मदोन्मत्त हत्तीप्रमाणें एकटा, आणि स्वच्छंद असा हिंडतोस. पण मी तुला आपल्या बुद्धि सामर्थ्यानें पकडून या चंद्रगुप्ताच्या येथें बांधून टाकतों पहा.

सर्व जातात.

अंक पहिला समाप्त.

अंक २ रा.

एक गारुडी प्रवेश करितो.

गा०—

पद.

तंतरजुगत जाणे तो। मनुक्क्ष जो मंडल लिहितो।
मंतर रक्केशन करनारा। सरप नराधिप त्योच खरा॥

(पडद्याकडे पाहून) काय ह्मनतुस? तू कोन हायस ह्मून? आर मी गारुडी हाय. माझं नांव जीरनइख. काय ह्मनतुस? पेठक्यांत कोन हाय ह्मून? आर एच्या मंदी सरप हायती. काय ह्मनतुस? सरपाच काय करतुस ह्मून? आर मी खेळतुया त्येंच्या सव. आनखी काय ह्मनतुस? मला बी सरपाशी खेळायचं हाय ह्मून? आर तू कोन हायस? काय? राजाचा चाकुर? तर मग तू सरपाशचि खेळतुयास. कसा ह्मून? ऐक तर आर, मंतर आन् वखद जेला ठाव न्हाइ असा गारुडी, अंकुस न घेतां माजलेल्या हत्तीवर बसनार, आन् मोठी राजाची चाकुरी मिळूनशान् ताठलेला चाकुर,

पेटाऱ्यांत

या तिघांचा जरूर नास होतुया. काय नुस्त पाहुन-शान् गेला ह्यो दादा? आन् ह्यो दादा काय ह्मन-तुया? पेटक्यांत काय हाय म्हून? आर, माझ प्वाट भरायच साधन हायती सरप येच्या मंदी. काय ह्मन-तुस? बघू दे म्हून? नग दादा. ह्यो लाड नग. तुला पाहनच असल तर चाल ह्या घरामंदी. तिथें दाखुता तुला. काय ह्मनतुस? ह्य राकुसाच घर हाय तथ आमास्नी वाव न्हाइ म्हून? तर जा तूं दादा. प्वोट भरन्याकरितां मला कुठभी अडथळा न्हाइ. काय ह्यो बी दादा गेला? (चोहोंकडे पाहून) अहो, काय आश्चर्य आहे! चाणक्याच्या बुद्धिकौशल्याकडे पाहिलें ह्मणजे असें वाटतें कीं चंद्रगुप्तावर जे राक्षसाचे प्रयोग चालू आहेत ते व्यर्थ होणार. राक्षसाच्या बुद्धिकौशल्याकडे पाहिलें ह्मणजे असें वाटतें कीं चंद्रगुप्त राज्यभ्रष्ट झालाच. एकदां असें वाटतें कीं चाणक्याच्या बुद्धिरूप सांखळदंडानें चंद्रगुप्ताची राज्यलक्ष्मी पक्की बांधली गेली आहे. पण या राक्षसाकडे पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं तो तिला आपल्या उपायरूप दोन्ही हातांनीं फरफर ओढीत आहे. अशा

रीतीनें या दोघा राजकारस्थानी सचिवांच्या तडाक्यांत ही राज्यलक्ष्मी सांपडली आहे, त्यामुळें रानांत दोन महागजांच्या मध्यें एक हत्तीण सांपडली म्हणजे जशी तिची तारांबळ उडते तशी या राजलक्ष्मीची तारांबळ झाली आहे असें दिसतें. आतां अमात्य राक्षसाची भेट घ्यावी. (जातो)

प्रवेश–राक्षस आसनावर बसला आहे एक नौकर जवळ आहे.

रा०—(वर पाहून दीर्घ श्वास सोडून) कठिण हो कठीण! आपल्या शौर्यानें आणि नीतीनें ज्यांनीं सर्व शत्रू नाहींसे केले त्या यादवांच्या कुलाप्रमाणें नंदाचें किती विपुल कुल! पण तेंहि दुष्ट दैवानें समूळ लयाला नेलें! आणि आतां मी त्यांच्याकरितां रात्रंदिवस जागून अनेक प्रयत्न करावयाचे म्हणजे भिंतीवांचून चित्र काढण्यासारखेंच आहे! अथवा, मी जें हें परदास्य स्वीकारून रात्रंदिवस कारस्थानांत मन घालून बसलों आहें, तें केवळ स्वतःच्या प्राणरक्षणाकरितां नव्हे, किंवा राज्योपभोगापासून मिळणाऱ्या सुखामुळें नव्हे, किंवा माझी स्वामिभक्ति नष्ट झाली म्ह-

णूनाहि नव्हे; तर माझी अशी समजूत आहे कीं म-हाराज नंद जरी स्वर्गस्थ झाले तरी त्यांच्या शत्रूचा नाश झाला म्हणजे त्यांना तेथेंहि आनंद होईल. म्हणूनच मी त्यांची भक्ति अद्यापि सोडिली नाहीं. (वर पाहून डोळ्यात पाणी आणून) भगवती कमलालये लक्ष्मी, खरोखर तुला गुणाची परीक्षा नाहीं. आनंद सागर नंदांना सोडून तूं त्या मौर्य पुत्रावर अनुरक्त झालीस काय? मत्त हत्ती नाहींसा झाला म्हणजे त्याच्या गंडस्थळावरून वाहणारी मदाची धार जशी नाश पावते तशी नंदमहाराजाबरोबर तूंहि कां लयाला गेली नाहींस? मूर्खे, पृथ्वीच्या पाठीवर आणखी प्रख्यात आणि कुलवान राजे थोडे आहेत कां? त्या-सर्वांना सोडून तूं त्या कुलहीन मौर्याला माळ घातलीस? खरोखर पुरुषाच्या गुणाची परीक्षा करण्याची अक्कल बायकांना नसते. थांब, दुष्टे, तुझा आधारच तोडून टाकतों. (विचार करून) मी मित्रोत्तम चंदनदासाचे घरीं मंडळी ठेऊन शहर सोडलें हें चांगलें केलें. कारण त्याच्यायोगानें, आमचे जे स्नेही कुसुमपुरांत आहेत, त्यांची खात्री होईल कीं राक्षस अ-

ह्यापि कुसुमपुर हस्तगत करून घेण्याची खटपट क-करीत आहे. आणि या मुळें ते सुद्धां आपली खट-पट सुरू ठेवतील. आमच्या लोकांना चंद्रगुप्ताच्या नाशाकरितां तीक्ष्ण उपाय योजितां यावेत, व शत्रूचे उपाय मोडतां यावेत, म्हणून शकटदासाजवळ मोठा धनसंचय ठेविला आहेच. तसेंच शत्रुची प्रतिक्षणीं-ची हालचाल लक्षांत यावी व त्यांचें व्यंग कोठें आहे हें कळावें म्हणून जीवसिद्धी प्रभृति मित्रांची योजना केली आहेच. साराश, दासीपुत्र असून नंद महारा-जांनीं ज्याला औरस पुत्राप्रमाणें वाढवून पुष्ट केले त्या कृतघ्न चंद्रगुप्ताचें मर्म मी आपल्या बुद्धिरूप शरानें छेदितों. दैवानें मात्र त्याचा सांभाळ करूं नये.

कंचुकी येतो.

कं—(आपल्याशीं) ज्याप्रमाणें चाणक्यानें नंदाला मारून कुसुमपुरांत चंद्रगुप्ताची गादी स्थापिली, तसेंच या म्हा-तारपणानें विषयाभिलाषाला मारून आमच्या शरीरांत धर्माची गादी स्थापिली. आणि तिकडे जसा चंद्रगु-प्ताचा प्रभाव वाढत असतांनाही प्रसंग पाहून राक्षस त्याला जिंकण्याची खटपट करितो, पण जय पावत

नाहीं, तसेंच इकडेही धर्माचा प्रभाव वाढत असतां-नाहि प्रसंग पाहून लोभ त्याला जिंकण्याची खटपट करितो. पण जय पावत नाहीं. (इकडे तिकडे फिरून) हें अमात्यराक्षसाचें घर. (जवळ जाऊन) अमात्या तुझें कल्याण असो.

रा०—जाजले, तुला नमस्कार करतों. प्रियवंदका जाजलीला आसन दे.

प्रि०—हें आसन आहे बसावें.

कं०—(बसून) अमात्या, कुमार मलयकेतूची आपणाला अशी विनंती आहे कीं, आपण बरेच दिवसांपासून आभरणें घालणें सोडलें हें मला बरें वाटत नाहीं. जरी स्वामीच्या गुणांची आठवण सहसा बुजणें कठीण आहे तरी माझ्या एवढ्या विनंतीला अमात्यांनीं मान द्यावा, असें ह्मणून कुमारानें आपल्या अंगावरचीं आभरणें काढून पाठविलीं आहेत, (आभरणें दाखवितो) तीं अमात्यानें धारण करावींत.

रा०—आर्या, जाजले, कुमार मलयकेतूला माझा असा निरोप सांग कीं वत्सा तूं आपल्या गुणांनीं नंदमहारां-

जांची आठवण बुजविलीस; परंतु जों पर्यंत सकल रिपुमंडळाचा नाश करून तुझें सिंहासन कुसुमपुरांतील सुगांग प्रासादावर स्थापन झालें नाहीं तों पर्यंत पराभवानें दुर्बल झालेल्या या शरीरावर आभरणें घालावयाचीं नाहींत असा माझा निश्चय आहे.

कं—अमात्या, तुमच्यासारखा पुढारी कुमाराला असल्यावर, ही गोष्ट कठीण आहे काय? तर कुमाराची ही प्रथमच विनंती मान्य करावी.

रा०—आर्या, कुमाराप्रमाणें तुझेंही वचन मला मोडवत नाहीं. तर जशी तुमची मर्जी. (कंचुकी राक्षसाला आभरणें घालतो)

कं०—तुझें कल्याण असो. जातों मी आतां.

रा०—आर्या अभिवंदन करतों.

कं०—मी जातों आपल्या कामाला. (जातो)

रा०—प्रियवंदका, पहा बाहेर माझ्या भेटीकरतां कोण आलें आहे तें.

प्रि०—आज्ञा (बाहेर येऊन गारुड्यास)तूं कोणरे?

गारुडी०—दादा मी गारुडी हाय. जीरनइख याझं नांव. ह्माराजास्नी सरपाचा खेळ दावायास्नी आलुया.

प्रि०—थांब मी अमात्यांना कळवितों. (राक्षसास) महाराज, एक गारुडी खेळ करण्यास आला आहे.

रा०—(डावा डोळा लवलासें पाहून) काय पहिल्यानेंच सर्पदर्शन ? (उघड) खेळ पाहण्याची कांहीं इच्छा नाहीं. त्याला हें बक्षीस देऊन जाऊं दे.

प्रि०—आज्ञा (गारुड्यास) हें घेरे बुवा. महाराजांनीं तुझा खेळ न पाहतांच तुला हें बक्षीस दिलें आहे. पाहिलें असतें तर मग काय दिलें असतें कोण जाणें.

गा०—आर नग दादा, अमात्यास्नी माझी इनंती सांग कीं मी नुस्ता गारुडीच न्हाइ, पन मी थोडसं गानबी रचतुया. तर ह्माराजानें ह्य माझ गान वाचाव. (कागद देतो)

प्रि०—(राक्षसास) महाराज, तो गारुडी विनवितो कीं मी केवळ गारुडीच नाहीं तर कवीहि आहे, तेव्हां अमात्यांनीं हें माझें गाणें वाचावें.

रा०—(पत्र घेऊन वाचतो)

आर्या.

मधुकर कुसुम रसातें, पिउनी निःशेष टाकि जें काय ॥
त्या योगें सहजगतीं, अन्यांचें होतसें महत्कार्य ॥

अरे, कुसुमपुरचा वृत्तांत मला माहीत आहे आणि मी तुमचा हेर आहे असा या पदाचा अर्थ दिसतो. कार्यांनीं मन व्यग्र झाल्यामुळें आणि हेराहि पुष्कळ असल्यामुळें हा कोण याची आठवण नव्हती. आतां आठवण झाली. बहुधा हा गारोडी विराधगुप्त असावा. याला मी कुसुमपुराला पाठविलें होतें. (उघड) प्रियंवदका पाठीवर, त्या गारुड्याला. चांगला कवि दिसतो हा. याचीं गाणीं ऐकिलीं पाहिजेत.

प्रियंवदक—आज्ञा (गारुड्यास) चलरे आंत.

गा०—(येऊन आपल्याशीं) अरे, हा अमात्यराक्षस. राजलक्ष्मी चंद्रगुप्ताच्या मांडीवर बसली, डावा हात तिनें त्याच्या गळयांत घातला, तोंडाजवळ तोंड नेलें, तरी या अमात्य राक्षसाच्या भीतीनें ती दुसरा हात त्याच्या गळयांत न घालतां, मागें मुरडून पहात आहे (उघड) अमात्यांचा जयजयकार असो.

रा०—(पाहून) अरे विराध–' इतकेंच बोलून) प्रियंवदका, तूं जा आपल्या परिजनासह. मी आतां सर्पांचा खेळ पाहणार आहे. (प्रियंवदक आज्ञा म्हणून जातो.)

रा०—मित्रा विराधगुप्ता, बैस.

वि०—आज्ञा (बसतो).

रा०—(सखेद पाहून) काय ही नंद महाराजांच्या सेवकजनांची अवस्था! (डोळे पाण्यानें भरून येतात)

वि०—अमात्या, शोक पुरे करा. अमात्यांच्या प्रभावानें आह्माला पूर्वीची स्थिती लौकरच येईल.

रा०—मित्रा, विराधगुप्ता, कुसुमपुरचा वृत्तांत सांग.

वि०—अमात्य, फार मोठा आहे वृत्तांत. आज्ञा करावी कोठून सांगू तें.

रा०—चंद्रगुप्तानें नगर प्रवेश केलपासूनचा वृत्तांत सांग. मी जे तीक्ष्ण उपाय योजण्याकरितां हेर पाठविले होते, त्यांनीं काय काय केलें तें सर्व सांग.

वि०—ठीक आहे. प्रथमतः शक, यवन, किरात, कां-

भोज, पारसीक, बाल्हीक इत्यादिकांनीं चाणक्याच्या सल्ल्यानें चालणाऱ्या पर्वतक आणि चंद्रगुप्त यांच्या सैन्यासह कुसुमपुराला बळकट वेढा दिला.

रा—(भ्रांत होऊन शस्त्र उपसून आवेशानें)मी असतांना कुसुमपुराला कोण वेढा घालतो ? प्रवीरका, प्रवीरका ! जा लौकर. धनुष्यबाण धारण करणारांना तटावर जायला सांग. वेशीमध्यें, शत्रूच्या हत्तीचीं गंडस्थळें फोडणारे असे हत्ती ठेवा. आणि ज्यांना यशाची चाड असेल त्यांनीं शत्रूचें भय सोडून शस्त्र धारण करून मजबरोबर शत्रूच्या दुर्बल सैन्यांत एकदम तुटून पडावें.

वि०—अमात्य आवेश पुरे मी हकीकत सांगत आहे.

रा०—काय ? हकीकत आहे ही ? मला असा भास झाला कीं ही खरी गोष्ट आहे. (शस्त्र टाकून डोळ्यांत पाणी आणून)हा ! महाराजनंदा ! या राक्षसावर अशा प्रसंगीं जे आपण अनुग्रह करित असां ते आतां सर्व आठवतात. आपला मजवर स्नेह व भरवंसा असा कीं रणामध्यें ज्याठिकाणीं मेघाप्रमाणें काळे गज

चालतात, त्याठिकाणीं आपण मलाच जाण्याविषयीं आज्ञा करीत असां. प्रळयकाळच्या समुद्राच्या लाटेप्रमाणें उसळणाऱ्या घोडेस्वारांचें अधिपत्य आपण राक्षसालाच देत असा. पायदळाचा हल्लाहि राक्षसानेंच न्यावा. सारांश, नगरांत मी एकटा राक्षस, पण स्नेहामुळें हजारों राक्षस आहेत असें आपणाला वाटत असे. (उघड) बरें, पुढें ?

वि०—अशारीतीनें कुसुमपुराला वेढा पडल्यामुळें पुष्कळ दिवसांपासून शांततेचा उपभोग घेणाऱ्या नगरवासी लोकांनां फार त्रास झाला; नगरवासी लोकांची उपेक्षा करून सर्वार्थसिद्धी सुरंगाला येऊन तेथून तपोवनास गेले; महाराज नंदांच्या विरहामुळें आपल्या लोकांनीं आपले प्रयत्न शिथिल केले; चंद्रगुप्ताचा जय झाला तथापि लोकांनीं आनंद प्रदर्शक गोष्टी केल्या नाहींत; पुन्हा नंदराज्य परत आणण्याकरितां आपण सुरंगाला परत आलां; चंद्रगुप्ताला मारण्याकरितां जी विषकन्या आपण पाठविली तिनें बिचारा पर्वतेश्वर मारला गेला;

रा०—आश्चर्य आहे ! कर्णानें जशी अर्जुनाला मारण्या-

करितां एक शक्ति राखून ठेविली होती, तशीच चंद्र-गुप्ताला मारण्याकरितां मी ही विषकन्या राखून ठेविली होती. पण कृष्णाच्या कुशलतेमुळें त्या शक्तीनें जसा अर्जुन न मरतां घटोत्कच मेला, तसेंच या दुष्ट चाणक्याच्या कपटामुळें माझ्या विषकन्येनें चंद्रगुप्त न मरतां, चाणक्याच्या मनांतून ज्याला मारावयाचें होतें असा पर्वतक मेला.

वि०—हा सारा दैवाचा खेळ! दुसरें काय?

रा०—बरें पुढें?

वि०—पुढें, बापाच्या मरणामुळें त्रासून जाऊन कुसुमपुराहून मलयकेतू निघून गेला; पर्वतकाचा भाऊ वैरोधक याचा चाणक्यानें आपल्यावर विश्वास बसवून घेतला; चंद्रगुप्त आतां नंदांच्या राजवाड्यांत प्रवेश करणार असें लोकांना समजलें; इतक्या साऱ्या गोष्टी झाल्यावर, चाणक्यानें एके दिवशीं सगळे कुसुमपुरांतील सुतार बोलावून आणले, व त्यानां सांगितलें कीं आज बरोबर मध्य रात्रीं चंद्रगुप्ताला नंदाच्या वाड्यांत जाण्याला चांगला मुहूर्त आहे असें ज्योतिष्यांनीं सांगितलें आहे

तर तुह्मी तात्र्डतोब राजवाडा स्वच्छ करून आरास वगैरे करून शृंगारून ठेवा. तेव्हां ते सुतार ह्मणाले, महाराज, चंद्रगुप्ताचा नंदाच्या वाड्यांत प्रवेश होईल हें जाणून दारुवर्म्यानें अगोदरच सोन्याचें तोरण वगैरे लावून पहिलें राजद्वार शृंगारून ठेविलें आहे. आतां आह्माला फक्त आंतच शृंगारावयाचें राहिलें आहे ते-व्हां त्या लबाड चाणक्यानें, सांगितल्यापूर्वींच द्वार सु-शोभित करून ठेविलें ह्मणून संतोष दाखविला, दारुव-र्म्याची स्तुति केली, आणि ह्मणाला कीं तुला या तुझ्या हुषारी बद्दल बक्षीस लौकरच मिळेल.

रा०—(खेदानें) गड्या, त्या चाणक्याला कशाचा संतो-ष होतो ? दारुवर्म्याला त्याच्या हुषारी बद्दल बक्षीस कांहीं तरी अनिष्टच मिळावयाचें. खरोखरच त्या वि-चाराच्या बुद्धीला मोह झाला कीं त्यानें प्रसंगाची वाट न पाहतां, अशा रीतीनें चाणक्याच्या मनांत संशय येण्याजोगें कृत्य केलें. बरें पुढें ?

वि०—नंतर चाणक्यानें सर्व शिल्पकारानां व नगरवासी जनाला कळविलें कीं आज मध्यरात्रीं लग्न वगैरे चां-

गलें असल्यामुळें चंद्रगुप्त नंदभवनप्रवेश करणार. असें सांगून त्यानें दिवसाच, पर्वतेश्वराचा भाऊ वैरोधक याला चंद्रगुप्ताच्या अर्धासनावर बसवून त्याला अर्धराज्याचा अभिषेक केला.

रा०—वैरोधकाला दिलेलें वचन पाळलें आं चाणक्यानें?

वि०—होय.

रा०—(आपल्याशीं) खरोखर मोठा पाजी आहे हा भटुरडा. वैरोधकाच्याहि मरणाची तयारी यानें अगोदरच करून ठेविली असेल. पर्वतकाच्या मरणामुळें जो दोष यावयाचा त्याचें निराकरण व्हावें ह्मणून त्यानें हा वैरोधकाच्या अभिषेकाचा विधी उरकून घेतला (उघड) बरें पुढें ?

वि०—पुढें, चंद्रगुप्त अर्धरात्रीं नंदभवन प्रवेश करणार हें, व वैरोधकाला राज्याभिषेक झाला हें, अगोदरच प्रसिद्ध झालें होतें. त्याप्रमाणें अर्धरात्रीं, शुभ्र बर्फाप्रमाणें स्वच्छ मोत्याची झालर ज्याला आहे असें चिलखत ज्यानें घातलें आहे, मणिमयमुगुटाच्या योगानें ज्याचें मस्तक फार शोभत आहे, सुगंधीं पुष्पांच्या माळा ज्या-

च्या वक्षःस्थळावर घातल्या आहेत, आणि या प्रमाणें अतिपरिचित जे आहेत त्यांना सुद्धां ओळखूं येणार नाहीं, असा चंद्रगुप्ताच्याच आकृतीचा वैरोधक चाणक्याच्या आज्ञेनें चंद्रगुप्ताच्या चंद्रलेखा नांवाच्या हत्तीणीवर बसून, नंदभवनाकडे येण्यास निघाला; व चाणक्याच्या आज्ञेनें चंद्रगुप्ताच्या मागें चालणारे राजेलोकहि त्याच्या मागें मागें चालूं लागले. असें होतांच, चंद्रगुप्त आला असें समजून चंद्रगुप्तावर पाडण्याकरितां तुमच्या दारुवर्म्यानें आपलें यंत्रतोरण अगदीं सज्ज करून ठेविलें. वैरोधक आल्यावर त्याच्या मागून चालणारे राजेलोकांनीं आपापलीं वाहनें बाहेरच उभीं केलीं. इकडे चंद्रगुप्ताला मारण्याकरितां आपण बर्बरकाला भालदार होण्यास पाठविलें होतें त्यानें आपल्या काठींत छपविलेली सुरी काढण्याकरितां तिची सांखळी धरली.

रा०—अरेरे! दोघांचाहि अयोग्य वेळीं प्रयत्न झाला. बरें, पुढें?

वि०—नंतर, एकाएकीं त्या हत्तीणीला कोणी जघनावर

प्रहार केला, त्यामुळें ती एकीकडे वळली. त्यासरसा तिच्या पहिल्या निशाणावर जें यंत्रतोरण सोडलें होतें त्याचा नेम चूकून तें बर्बरकाच्या मस्तकावर पडलें व तो मेला. हें पाहतांच दारुवर्म्यानें विचार केला कीं आतां आपला मृत्यू खास आलाच. तेव्हां त्यानें यंत्र-तोरण पाडण्याचा लोखंडाचा गज होता तो घेऊन त्या हत्तीणीवर जो वैरोधक होता त्याला मारिला व त्यामुळें वैरोधक मेला.

रा०—हर हर! हे दोन अनर्थ ओढवले. चंद्रगुप्त मेला नाहींच; आणि बर्बरक आणि वैरोधक मेले! (खेदानें आपल्याशीं) हे दोघेच मेले नाहींत तर दैवानें आह्मी सुद्धां मेलोंच. (उघड) बरें, तो सुतार दारुवर्मा कोठें आहे?

वि०—वैरोधका बरोबरच्या लोकांनीं दगड मारून त्याचा प्राण घेतला.

रा०—(डोळ्यांत पाणी आणून) कठीण हो कठीण! अहो आमचा परमस्नेही दारुवर्माहि गेलाना? बरें, त्या अभयदत्त वैद्यानें काय केलें?

वि०—त्यानें सर्व केलें.

रा०—(आनंदानें) काय मित्रा, चंद्रगुप्त मारला ?

वि०अमात्य, दैव थोर त्याचें. मेला नाहीं.

रा०—तर मग असा आनंदानें काय सांगतोस सर्व केलें ह्मणून ?

वि०—अमात्य, त्यानें विषचूर्ण घालून एक औषध केलें चंद्रगुप्ताकरितां. पण चाणक्यानें तें पाहिलें आणि सोन्याच्या पात्रांत टाकलें. त्यासरसें त्या पात्राचा रंग बदलला. तेव्हां त्यानें चंद्रगुप्ताला सांगितलें कीं चंद्रगुप्ता हें औषध पिऊं नकोस. यांत विष आहे.

रा०—मोठा शठ आहे तो बटू. बरें त्या वैद्याचें कसें काय ?

वि०—त्या वैद्याला तेंच औषध पाजविलें आणि त्यानें ता मला.

रा०—अरेरे ! मोठा विद्वान वैद्य गेला. बरें मित्रा शयनाधिकारावर प्रमोदक नेमिला होता त्याचें काय झालें?

वि०—जें दुसऱ्यांचें तेंच त्याचें.

रा०—कसें बरें?

वि०—तो खरोखरच मूर्ख. त्याला आपण पुष्कळ पैसा दिला होता तेव्हां तो थाटानें राहावयास लागला. चाणक्यानें त्याला विचारलें कीं तुला पैसा कोठून मिळतो. तेव्हां तो आपला कांहीं तरी असंबद्ध बोलूं लागला. तेव्हां चाणक्यानें त्याला मारेकऱ्या करवीं हालहाल करून मारलें.

रा०—(दुःखानें) काय सांगावें? दैवानें इथेंहि सुद्धां पाठ पुरविली! बरें चंद्रगुप्त निजल्यावर त्याला मारण्याकरितां त्याच्या शयनागारांत सुरुंग करून त्यांत बीभत्सकादिकांना ठेविलें होतें त्यांचा काय वृत्तांत?

वि०—अमात्य, त्यांचाहि वृत्तांत भयंकरच.

रा०—काय? त्यांचाही वृत्तांत भयंकरच? तेथें असलेलें त्या चाणक्याच्या लक्षांत आले नाहींत नां?

वि०—आले नाहींत तर काय?

रा०—कसें बरें?

वि०—चंद्रगुप्ताच्या नंदभवनप्रवेशाच्या पूर्वीं एकदां चाणक्य शयनमंदिरांत गेला व तेथें त्यानें सभोंवतीं लक्षपू-

र्वक पाहिलें तों भिंतीच्या एका लहानशा भोंकांतून एक मुंगी तोंडांत तांदुळाचा दाणा घेऊन आलेली त्याच्या दृष्टीस पडली. ती पाहिल्याबरोबर चाणक्याला येथें कांहीं तरी दगा आहे असा संशय आला व त्यानें तावडतोब तें शयनगृह जाळून टाकिलें. त्याबरोबर त्या बीभत्सकादिकांचा मार्ग बंद झाला व तेहा त्यामध्यें जळाले.

रा०—(डोळ्यांत पाणी आणून) मित्रा, पहा! चंद्रगुप्ताला सर्वतऱ्हेनें दैव अनुकूळ आहे. (सचित) चंद्रगुप्ताचें दैव पहा! त्याला मारण्याकरितां मी एक विषकन्या पाठविली, तों तिच्या योगानें त्याच्या राज्याचा अर्धा हिस्सा घेणारा पर्वतक मेला. यंत्राच्या ठिकाणीं व औषधाचे ठिकाणीं ज्यांची योजना केली होती ते स्वतःच त्या यंत्रानें व औषधानें मेले. पहा, चंद्रगुप्ताचें दैव कसें चोहोंकडून अनुकूळ आहे!

वि०—अमात्य, असें आहे तथापि आरंभिलेलें कार्य सोडणें रास्त नाहीं. कारण, नीच लोक विघ्नें येताल ह्मणून कोणत्याहि कार्याला प्रारंभच करीत नाहींत.

मध्यम लोक जे आहेत ते आरंभ करतात पण विघ्नें आलीं कीं सोडून देतात. पण उत्तम लोक जे आहेत ते कितीहि विघ्नें आलीं तरी आरंभिलेलें कार्य सोडीत नाहींत. पहा, शेष मस्तकावरील पृथ्वी झुगारून देत नाहीं, तर काय त्याला भार होत नाहीं ह्मणून? तसेंच सूर्य जो विश्रांति न घेतां एक सारखा फिरत असतो तर त्याला काय श्रम होत नाहींत? होतातच. परंतु एकदां कोणत्याहि गोष्टीचा अंगिकार केला ह्मणजे तिचा त्याग करायला उत्तम लोक लाजतात. अंगीकृत गोष्ट शेवटाला नेणें हें त्याचें ब्रीदच आहे.

रा०—मित्रा, आरंभिलेली गोष्ट सोडूं नये हें प्रत्यक्ष माझ्या वरूनच पहा. बरें पुढें?

वि०—तेव्हां पासून चाणक्य चंद्रगुप्ताची हजार पटीनें काळजी घेऊं लागला. हा अमुक असा, हा तमुक तसा असें ह्मणून त्यानें आपल्या सर्व स्नेही मंडळीला पकडलें.

रा०—(दुःखानें) मित्रा, कोण कोण धरले गेले?

वि०—पहिल्या प्रथम क्षपणक जीवसिद्धी. त्याला नगराबाहेर काढून दिलें.

रा०—(आपल्याशीं)एवढें तरी बरें आहे. ज्याला बायकापोरें नाहींत त्याला स्थान सोडण्याचा जर प्रसंग आला तर त्याला त्याचें कांहीं वाईट वाटत नाहीं. (उघड) मित्रा, त्याच्या मागें कोणता अपराध लावला?

वि०—त्या दुरात्म्यानें राक्षसानें पाठविलेल्या विषकन्येच्या योगानें पर्वतेश्वर मारला हा.

रा०—(आपल्याशीं)शाबास चाणक्या शाबास. आपल्या अर्धराज्याचा विभागी मारलास तूं. पण त्याचें अपयश आपल्यावरचें टाळून आमच्यावर घातलेंस. खरोखर तुझी एकच युक्ति पण सर्वप्रकारें फलप्रद होते. (उघड)बरें पुढें?

वि०—नंतर चंद्रगुप्ताला मारण्याचा प्रयत्न दारुवर्म्यादिकांकडून करविला, असा आरोप ठेऊन, शकटदासाला सुळावर दिलें.

रा०—(डोळयांत पाणी आणून) हर हर! मित्रा शकटदासा, अशा रीतीनें तुझा मृत्यु व्हावा ना? पण

तूं स्वामिकार्याकरितां प्राण खर्ची घातलास. आह्मी मात्र दुर्दैवी नंदकुलाचा नाश झाला तरी जिवंत राहण्याचीच इच्छा करितों.

विं०—अमात्य, तसें नव्हे. आपला तरी प्रयत्न स्वामीकार्य साधण्याचाच आहे.

रा०—मित्रा स्वामिकार्याकरितां कां होईना, पण जीवंत रहावें अशी इच्छा आहे आह्मांला. आह्मी कृतघ्न महाराज नंदाच्या मागोमाग स्वर्गाला जात नाहीं.

वि०—अमात्य, तसें नव्हे स्वामिकार्य न करतां त्यांच्या मागोमाग स्वर्गाला जाणें हा खरा कृतघ्नपणा.

रा०—सांग मित्रा, आणखी कितीं मित्रांचीं संकटें असतील तेव्हढीं सगळीं सांग. तीं ऐकिण्याकरितां हा मी सज्ज झालों आहें.

वि०—असा प्रकार जेव्हां चोंहोंकडे चालला, तेव्हां चंदनदासानें भिऊन अमात्यांचें कुटुंब छपविलें.

रा०—हें त्यानें त्या क्रूर चाणक्याच्या विरुद्ध केलें!

वि०—पण मित्रद्रोह तर केला नाहीं ना?

रा०—बरें मग ?

वि०—तेव्हां चाणक्यानें अनेक वेळां त्याला सांगितलें तूं अमात्याचें कुटुंब दे ह्मणून. तथापि त्यानें ऐकिलें नाहीं. मग चाणक्यानें रागावून—

रा०—काय प्राण घेतला ?

वि०—नाहीं, प्राण नाहीं घेतला. पण त्याचें घर लुटून त्याला बायकापोरांसुद्धां बंदींत टाकिलें.

रा०—मग काय सांगतोस राक्षसाचें कुटुंब त्यानें छपविलें ह्मणून? अरे आतां कुटुंबासुद्धां राक्षस पकडला गेला असें समज. (एक नौकर येतो.)

नौ—महाराजांचा जयजयकार असो. महाराज, बाहेर शकटदास वध्यस्थानापासून आला आहे.

रा०—(आश्चर्यानें) प्रियंवदका, खरी गोष्ट आहे ही ?

नौ०—महाराजांच्या पायापाशीं राहणारे काय खोटें बोलतील ?

रा०—मित्रा विराधगुप्ता, हें कसें ?

वि०—अमात्य, भवितव्यता विलक्षण ह्मणावयाची !

रा०—प्रियंवदका, मग उशीर कां? लौकर घेऊन ये त्याला.

नौ०—आज्ञा. (जातो व शकटदास व सिद्धार्थक यांच्यासह येतो)

श०—(आपल्याशीं) चंद्रगुप्ताप्रमाणें जमिनींत रोंवलेला शूळ पाहून, तसेंच त्याच्या राज्यलक्ष्मीप्रमाणें अंतःकरणांत क्षोभ उत्पन्न करणारी वध्याची माळा गळ्यांत घालून, व नंदनाशामुळें अतिशय घोर वाटणारा दवंडीचा नाद ऐकूनही माझें मन बिलकुल व्यग्र झालें नाहीं. कारण स्वामीचा नाश प्रत्यक्ष पाहिल्यामुळें तें आतां कठोर झालें आहे. (राक्षसास पाहून) हा अमात्य राक्षस येथें बसला आहे. नंदवंश क्षीण झाला तरी याची त्याच्या विषयींची भक्ति बिलकुल क्षीण झाली नाहीं. असा स्वामिभक्तीचा मासला सर्व भूतलावर अप्रतिम. (जवळ जाऊन) अमात्याचा जयजयकार असो.

रा०—(पाहून आनंदानें) मित्रा, शकटदासा, चाणक्याच्या तडाख्यांत सांपडला होतास तरी माझ्या दृष्टीस पडलास! केवढें माझें थोर भाग्य. तर मला आलिंगन दे. (शकटदास आलिंगन देतो)

रा०—बैस या आसनावर.

श०—आज्ञा. (बसतो)

रा०—मित्रा, शकटदासा, तुझें प्राणरक्षण करून मला आनंद देणारा कोण ?

श०—(सिद्धार्थकाकडे बोट दाखवून)अमात्य, प्रियमित्र सिद्धार्थकानें घातकांनां भेवडावून पळविलें व माझी तेथून सुटका केली.

रा०—(आनंदानें) गड्या सिद्धार्थका, तुला हें कांहींच नाहीं. तथापि हें घेच. (आपल्या अंगावरील भूषणें देतो)

सि०—(घेऊन नमस्कार करून आपल्याशीं) ह्य आता चानुक्य म्हाराजांच्या सांगन्यापरमान करावं. (उघड) म्हाराज, हथ मी पहिल्यानदाच आलुया. माझं हथ कोनीबी वळखीच न्हाय. तवा ह्यो अमात्याचा परसा- द जपून ठेवायास्नी कुठ जागाच न्हाय. म्हूनशान् अमात्यान किरपा करूनशान् आपल्या खजिन्यामंदीच येला ठेवाव. मी येच्यावर मोहोर करतुया. जवां मला काम लागल तवां घेइन.

रा०—ठीक आहे. शकटदास, या प्रमाणें कर.

श०—आज्ञा (मोहोरपाहून राक्षसास एकीकडे) अमात्य, ही आपलीच मोहोर.

रा०—(पाहून खेदानें व तर्कानें आपल्याशीं) वाहवा ! मी नगरांतून निघालों तेव्हां ब्राह्मणीनें ही करमणुकीं करतां ह्मणून मजजवळून मागून घेतली होती. ती याच्या हातांत कसी आली ? [उघड] गड्या सिद्धार्थका, ही मोहोर तुला कोठें मिळाली ?

सि०—ह्माराज, कुसुमपुरामंदी योक चंदनदास नांवाचा जेव्हाराचा बेपारी हाय. त्येच्या घराच्या दारांत मला गवसलीया.

रा०—मग ठीक आहे.

सि०—म्हाराज, ठीक काय हाय ?

रा०—श्रीमंतांच्या द्वारांत असले अलंकार पडलेले सांपडणें ठीक आहे.

श०—गड्या, सिद्धार्थका, अमात्यांच्या नांवांची ही मोहर आहे. ती जर तूं त्यांना देशील तर ते तुला पुष्कळ धन देऊन खूष करतील बघ.

सि०—म्हाराज या मोहरेचा स्वीकार करत्याल तर त्येतच मला आनंद हाय. (मोहोर देतो).

रा०—मित्रा शकटदासा, ही मोहर घे आणि तूं आपली कामगिरी पूर्वी प्रमाणें बजावीत जा.

श०—आज्ञा.

सि०—(हात जोडून) म्हाराजास्नी यक इनंती हाय.

रा०—गड्या सिद्धार्थका खुशाल सांग.

सि०—म्हाराजास्नी ठाव हायच कीं त्य चानक्याच एकदा वाईट केलया कीं मग कुसमपुरामंदी जाने कठीन व्हतया. तवा म्हाराजांच्या पायाची चाकुरी करावं अस मनामंदी हाय.

रा०—वाहवा! आह्माला तेंच पाहिजे होतें. तुझ्या सारखा मनुष्य मिळविण्याची खटपट चुकली.

सि०—(आनंदानें) मेहरबानी म्हाराजांची.

रा०—मित्रा शकटदासा, सिद्धार्थकाची चांगली व्यवस्था ठेव.

श०—आज्ञा (सिद्धार्थकासह जातो).

रा०—मित्रा विराधगुप्ता, आतां राहिलेला कुसुमपुरचा वृत्तांत सांग. कुसुमपुरांत राहणारे जे चंद्रगुप्ताचे लोक आहेत त्यांना आपले हे प्रयत्न आवडतात कां?

वि०—यांत काय संशय? ते लोक जसें बाहेर पडलें त्याप्रमाणें वागतातहि.

रा०—मित्रा, काय बाहेर पडलें.

वि०—बाहेर असें पडलें कीं मलयकेतू कुसुमपुरांतून निघून गेल्यापासून चंद्रगुप्ताला चाणक्याचा अतिशय राग आला आहे. चाणक्यहि मानी असल्यामुळें त्याला तें सहन होत नाहीं. तो नेहमीं चंद्रगुप्ताच्या आज्ञेचा भंग करून त्याच्या मनाला वाईट वाटेल असें करतो. हा माझा स्वतःचा अनुभव आहे.

रा०—(आनंदानें) तर मग मित्रा विराधगुप्ता, तूं जा पुन्हा कुसुमपुराला या गारुड्याच्याच वेषानें. आणि तेथें माझा मित्र स्तनकलश नांवाचा, भाटाचा वेष घेतलेला आहे, त्याला तूं माझा असा निरोप सांग कीं चाणक्यानें चंद्रगुप्ताचा आज्ञाभंग केला कीं तूं

त्याला उत्तेजनपर कवितांनीं चेतवीत जा. आणि काय होईल तें करभकाच्या हातीं गुप्तपणें मला कळीव.

वि०—आज्ञा. (जातो) (एक पुरुष येतो).

पु०—अमात्यांचा जयजयकार असो. अमात्य, शकटदासाची अशी विनंति आहे कीं हे तीन अलंकार विकावयास आले आहेत, ते अमात्यांनीं पाहावेत.

रा०—(पाहून) अहो मोठे मोलाचे दिसतात. गड्या शकटदासाला निरोप सांग कीं त्या व्यापाऱ्यांना खूष करून त्यांचे जवळून हे अलंकार घ्यावेत.

पु०—आज्ञा. (जातो)

रा०—(आपल्याशीं) आतां पहिल्यानें कुसुमपुराला करभकाला पाठविलें पाहिजे. (उठून) तो दुष्ट चाणक्य आणि चंद्रगुप्त यांच्यामध्यें भेद उत्पन्न होईल काय? अथवा होईल यांत शंका नाहीं. कारण चंद्रगुप्त आतां पृथ्वीवरील सर्व राजांचा मुख्य झाला. व हा राजा माझ्यामुळें झाला ह्मणून चाणक्यालाहि अतिशय गर्व झाला. एकाला राज्य मिळालें ह्मणून

कृतार्थता वाटते. दुसऱ्याला प्रतिज्ञा शेवटास गेली ह्मणून कृतार्थता वाटते. ही दोघांचीही निरनिराळ्या कारणामुळें वाटणारी जी कृतार्थता, या कृतार्थतेमुळेंच दोघामध्यें फूट पडेल.

जातो.

अंक दुसरा समाप्त.

अंक ३ रा.

स्थळ–चंद्रगुप्ताचा राजवाडा

कंचूकी प्रवेश करितो.

कं०—हे देवि तृष्णे, तूं सर्व लोक जिंकलेस, पण तुझ्याही मस्तकावर या जरेनें पाऊल ठेविलेंच. पहा, ज्या ह्या माझ्या इंद्रियांच्या योगानें रूपादिक विषयांचें ज्ञान तुला होत असें, व त्यामुळें तूं वृद्धिंगत होत होतीस तीं हीं इंद्रियें जरेनें शिथिल करून टाकिलीं. व ज्या ह्या अवयवांच्या साह्यानें मी तुझी आज्ञा पाळीत होतों तीं अवयवें हीं माझें ऐकेनाशीं झालीं. ह्मणून ह्मणतों, हे तृष्णे, तूं आतां व्यर्थ घमेंड मिरवूं नकोस. (इकडे तिकडे फिरून)अहो, सुगांगप्रासादावरील अधिकारी लोकहो, कुमार चंद्रगुप्त तुह्माला आज्ञा करीत आहे कीं, कौमुदी महोत्सवामुळें कुसुमपुराला जी रमणीयता-येणार, ती पाहण्याकरितां सुगांगप्रासादावर आह्मी येणार आहोंत, तर बिछायत वगैरे घालण्याची नीटव्यव-

स्था करा. तर बाबांनो उशीर कां करितां ? (पाहून) काय ह्मणतां ? महाराजांना कळलें नाहीं काय कीं कौमुदीमहोत्सव बंद केला आहे ह्मणून ? अरे हतभाग्यांनो, आतांच प्राणघेणाऱ्या गोष्टीची तुह्माला काय पंचाईत ? चला चला जलदीकरा. खांब सुगंधित करून त्याच्यावर फुलाच्या माळा चढवा. जमिनीवर चंदन-कुंकुमाचे सडे घाला. तोरणें उभारा. जा लवकर. काय ह्मणतां, आह्मी चाललों ह्मणून ? तर जा बाबांनो त्वरा करा. हे पहा महाराज आलेच. (पाहून)अहो, ज्याच्या वडिलांनीं हा पृथ्वीच्या कारभाराचा गाडा आपल्या सुदृढ अंगांनीं कठीण रस्त्यांत सुद्धां न थकतां फार वेळ ओढला, तोच गाडा अल्पवयांतच हा ओढूं लागला. तो ओढतांना हा अडखळतो पण त्याबद्दल दुःख बिलकुल वाहत नाहीं. (पडद्यांत असें यावें महाराज असा शद्ब होतो. व नंतर राजा चंद्रगुप्त व प्रतिहारी येतात)

चंद्रगुप्त—राजधर्माप्रमाणें वागणाऱ्या राजाला राज्य हें मोठें दुःखदायक आहे. कारण, दुसऱ्याच्या हिताकडे जर लक्ष द्यावें तर आत्महित अडथळा करितें. बरें

जर आपलें हित मुळींच टाकून द्यावें तर मग राजा होऊन उपयोग तरी काय ? बरें, आपल्या हितापेक्षां दुसऱ्याचें हित जास्त मानावें तर मग आपण परतंत्रच झालों ह्मणावयाचें ! आणि जो एकदां परतंत्र झाला त्याला सुखाचा अनुभव कुठला मिळणार ? खरोखर, मनोजयाची इच्छा करणाराला राज्यकारभार चालविणें फारच कठीण. कारण ही राजलक्ष्मी रागीट माणसापासून भिऊन दूर पळते, आणि कोमळ अतंःकरणाचा असला ह्मणजे आपला अपमान होईल या भीतीनें त्याच्या जवळ सुद्धां उभी राहत नाहीं. मूर्खाचा द्वेष करिते, शाहणा असला तर त्याच्यावर प्रेम करित नाहीं. शूराला भिते, आणि भित्र्याला हांसते. अशी ही राजलक्ष्मी शिरजोर वेश्येप्रमाणें खूष ठेवणें फार कठीण. (थांबून इकडे तिकडे फिरून) आज मला गुरुजींचा निरोप आहे कीं तूं माझ्याशीं खोटेंच भांडण करून कांहीं काळपर्यंत स्वतंत्र हो. मला तर स्वतंत्र होणें ह्मणजे भारी शिक्षाच वाटत आहे. अथवा गुरुजींच्या उपदेशानें नेहमीं आमचीं मनें शुद्ध झालेलीं आहेत, तेव्हां आह्मी स्वतंत्र झालों तरी गुरुजींच्या

तंत्रानेंच चालणार आहोंत. आह्मी जर एखादें चांगलें कृत्य केलें तर गुरुजी आमचें निवारण करीत नाहींत. पण जर आह्मीं मार्ग सोडला तर गुरुजी आह्माला मार्गावर आणण्याला हातीं अंकुश घेऊन तयार आहेतच. एकूण विनयानें आह्मी चाललों ह्मणजे आह्मी नेहमीं स्वतंत्रच आहोंत. (उघड) आर्या वैहीनरे सुगांगप्रासादाचा मार्ग दाखव.

कं०—असें यावें महाराजांनीं (राजा जातो)

कं०—हा सुगांगप्रासाद. हळूंहळूं चढावें महाराजांनीं.

रा०—(चढून पाहून) अहो, शरत्कालच्या शोभेमुळें दिशा किती रमणीय दिसत आहेत! वर्षाऋतूंतील मेघ निघून गेल्यामुळें ह्या दिशा नद्यांप्रमाणें स्वच्छ व दीर्घ दिसत आहेत. शरदऋतूंतील पांढरे मेघ हे नद्यांच्या वाळवंटाप्रमाणें दिसतात; चित्राकार तारागण हा त्यांतील चित्रविचित्र कमळाप्रमाणें दिसत आहे; व दीर्घ चोहोंकडे होणारा हा राजहंसादिपक्षांचा मधुर आलाप हा त्यांना विशेष रमणीयता आणीत आहे. अशा प्रकारच्या दिशा आकाशांतून नद्यांप्रमाणें निथळत

आहेत कीं काय असा भास होतो. आणखी या शरदृतूनें काय चमत्कार केला आहे. पहा नद्यांचें पाणी जें अमर्यादपणें वाहत होतें तें आतां पूर्वास्थितीवर आणिलें; साळीचीं लोंब्रें मोठीं झाल्याबरोबर त्यांनां खालीं वांकविलें; मयूरांना मद झाला होता तोविषाप्रमाणें हरण केला. यावरून असें वाटतें कीं हा शरदृतु सर्व जनाला नम्रताच शिकवित आहे! या गंगेला पाहून तर असें वाटतें कीं इचें मन सवतीमत्सरानें कलुषित झाल्यामुळें ही आजपर्यंत आपल्या पतीवर सिंधूवर—रागावली होती; व ती झुरणीस लागली असतांनाही तिला या चतुर शरदानें, गोष्टी सांगून तिचें मन प्रसन्न केलें, व आतां तो तिला तिच्या पतीकडे घेऊन चालला आहे. (सभोंवतीं नगराकडें पाहून) पण हा काय चमत्कार ! नगरांत अद्यापि कौमदीमहोत्सव कां सुरू झाला नाहीं ? आर्य वैहीनरे, कौमुदीमहोत्सवाची आमची आज्ञा नगरांत फिरविली होती ?

कं०—महाराज, यांत काय संशय ?

चंद्र०—तर मग काय आमची आज्ञा नागरिकांनीं मानिली नाहीं ?

कं०—(कानांवर हात ठेऊन) छे छे! महाराज असें कसें होईल? सगळ्या भूतलावर महाराजांची आज्ञा कोणीहि उल्लंघन करूं शकत नाहीं. मग हे पौरजन कसें उल्लंघन करितील ?

चंद्रं०—तर मग हें काय? नगरांत कौमुदीमहोत्सव अद्यापि कां नाहीं ?

कं०—महाराज, तें ठीकच आहे.

चंद्र०—काय ठीक आहे ?

कं०—तें असेंच.

चंद्र०—आर्या स्पष्ट सांग.

कं०—महाराज, कौमुदीमहोत्सव बंद केला.

चंद्र०—(रागानें) कोणीं ?

कं०—या पुढें महाराज आमचें सांगण्याचें सामर्थ्य नाहीं.

चंद्र०—आर्य चाणक्यानें तर प्रेक्षकांचा हा आनंद नाहींसा केला नाहींना ?

कं०—महाराज दुसऱ्या कोणाचें सामर्थ्य आहे आपली आज्ञा उल्लंघन करण्याचें ?

चंद्र०—शोणोत्तरे, बसावयाचें आहे.

प्र०—महाराज, हें सिंहासन बसावें.

चंद्र०—(बसून) आर्य वैहीनरे, आर्य चाणक्याला भेटण्याची इच्छा आहे.

कं०—आज्ञा (जातो)

(नंतर आपल्या घरीं आसनावर आर्य चाणक्य बसला आहे असा प्रवेश)

चा०—(आपल्याशीं) दुरात्मा राक्षस माझ्याशीं स्पर्धा करितो काय ? ज्याप्रमाणें, नंदांनीं माझा अपमान केला ह्मणून मी रागावून जाऊन गांव सोडून गेलों, व नंदांनां मारून चंद्रगुप्ताला गादीवर बसविलें, त्याचप्रमाणें, आपणाहि चंद्रगुप्ताची राजलक्ष्मी हरण करूं अशी इच्छा धरून हा राक्षस माझ्या बुद्धीवर ताण करूं पाहतो काय ? (वर पाहून) राक्षसा, राक्षसा ! अशा भलत्याच नादांत पडूं नकोस ! अरे, गर्वानें

अंध झालेला आणि दुष्ट सचिवांच्या सल्यानें चालणारा हा नंद राजा नव्हे बरें? हा चंद्रगुप्त आहे. आणि तूं ही पण चाणक्य नव्हेस; राक्षस आहेस. तुझ्या माझ्यांत सारखेपणा फक्त द्वेषाचा आहे. (विचार करून) अथवा या गोष्टींनीं मनाला त्रास करून घेण्यांत कांहीं हंशील नाहीं. कारण माझ्याच सेवकांनीं मलयकेतू जवळ राहून, त्याच्या मसलतींत शिरून त्याला अगदीं ग्रासून टाकिलें आहे. सिद्धार्थकादि माझे हेर मी निरनिराळ्या कामावर योजिले आहेतच. आतां चंद्रगुप्ताशीं एकदां खोटेंच भांडण करून, आपल्या बुद्धिकौशल्यानें मलयकेतू आणि राक्षस याच्यांत विरोध उत्पन्न करतों.

कं०—[प्रवेश करून]कठीण हो कठीण. ही नौकरी ह्मणजे फार कठीण. राज्याला भ्यावें, त्याच्या प्रधानाला भ्यावें, त्याच्या परिचारकांनां भ्यावें, आणि त्याच्या कृपे मुळें माजलेलीं अंतर खाजगींतलीं माणसें त्यांनाही पण भ्यावें. अशारीतीनें या गोळाभर अन्नाकरितां दीनमुद्रेनें लोकांच्या तोंडांकडे बघून, अशी हलकट नौकरी

करणें ह्मणजे कुत्र्याचीच वृत्ती आहे, असें जें शाहणे लोक ह्मणतात तें अगदीं खरें. [फिरून]हें आर्य-चाणक्याचें घर. आंत जावें (जाऊन व पाहून)अहो, राजाधिराजाचे हे मंत्री. याचें वैभव तर पहा! हा शेणी फोडण्यासाठीं दगडाचा तुकडा; हा इकडे शिष्यांनीं आणलेला दर्भाचा भारा; या घराच्या भिंती मोडलेल्या; आणि वाळण्याकरितां घातलेल्या समिधांच्या भारानें हें छप्पर लवलेलें. खरोखर हा महाराजांना दासीपुत्र ह्मणून हाक मारतो तें ठीकच आहे. कारण तृष्णेचा पगडा ज्यांच्यावर बसला आहे, असे लोक मोठे सत्यवादी जरी असले तरी राजाजवळ असले ह्मणजे नसते गुण लावून सुद्धां राजाची लांबलचक स्तुति करतात. पण जे खरे निस्पृह आहेत त्यांना राजा केवळ तृणासारखा वाटतो. (पाहून)अहो, हा आर्य चाणक्य बसला आहे. यानें सर्व लोकांना जिंकून नंदाचा अस्त आणि मौर्यांचा उदय एकाचवेळीं करून थंडी आणि उष्णता एकामागून अशीं देणाऱ्या सहस्र किरण सूर्यावरही ताण केली. (जमिनीवर गुडघे टेकून) आर्यांचा जयजयकार असो.

चा०—(पाहून)कोण ? वैहीनरे, कां आलास ?

कं०—राजाधिराज चंद्रगुप्त चरणावर मस्तक ठेवून अशी विनंती करितात कीं आपल्या इतर कार्याला व्यत्यय येत नसेल तर आपल्या दर्शनाचा लाभ व्हावा.

चा०—चंद्रगुप्त आमच्या भेटीची इच्छा करितो ? वैहीनरे कौमुदी महोत्सव मी बंद केला हें त्याला समजलें तर नाहींना ?

कं०—आर्या, यांत काय संशय ?

चा०—(रागानें) कोणीं सांगितलें ?

कं०—(भिऊन) आर्या, शांत व्हा. सुगांग महालाच्या गच्चीवर महाराज गेले तेव्हां त्यांनींच पाहिलें कीं नगरांत कौमुदी महोत्सव बंद आहे ह्मणून.

चा०—हां, समजलों. थांब, तूंच ही गोष्ट सांगून माझ्या विषयीं त्याला संतापविलें आहेस. दुसरें काय ? (कंचुकी भीतीनें खालीं तोंड घालून बसतो).

चा०—अहो, राजांच्या सेवकांची ही आमच्यावर उलटी कृपा ! चंद्रगुप्त कोठें आहे ?

कं०—आर्या, सुगांग महालांतूनच मला महाराजांनीं आर्यांच्या चरणापाशीं पाठावलें आहे.

चा०—(उठून) सुगांग प्रासादाचा मार्ग दाखीव.

कं०—चलावें आर्यांनीं. (जाऊन) हा सुगांगप्रासाद हळूं हळूं चढावें आर्यांनीं.

चा०—(चढून, पाहून, आनंदानें) अरे चंद्रगुप्त, सिंहासनावर बसला आहे! वाहवा! वाहवा! राजधर्म ज्यांना माहीत नाहीं अशा नंदाला सोडून सर्व राजांचा अधिराज अशा या चंद्रगुप्ताचें सिंहासनानें सेवन केल्यामुळें मला फार आनंद होत आहे. (जवळ जाऊन) चंद्रगुप्ताचा विजय असो.

चंद्र०—(सिंहासनावरून उतरून) आर्या, चंद्रगुप्त प्रणाम करितों (नमस्कार करितों).

चा०—(त्याला उठवून) वत्सा उठ. गंगेच्या तुषारांनीं शांत झालेल्या हिमालयापासून तों अनेक रंगांच्या रत्नांनीं शोभणाऱ्या दक्षिण समुद्रापर्यंतचे राजे लोक भयानें तुझ्या चरणावर नम्र होवोत. व त्यांच्या

मुकुटांतील गळालेल्या रत्नांनीं तुझीं अंगुलिरंध्रें शोभित होवोत.

चंद्र०—आर्यांच्या प्रसादांनीं सर्व आहेच. आर्यांनीं बसावें. (दोघेही बसतात)

चा०—चंद्रगुप्ता, आह्माला कां बोलाविलेंस ?

चंद्र०—आर्यांच्या दर्शनाचा अनुग्रह व्हावा ह्मणून ?

चा०—चंद्रगुप्ता, विनय पुरे. राजेलोक अधिकाऱ्यांना कारणाशिवाय बोलावीत नाहींत. मला तें कारण पाहिजे.

चंद्र०—आर्या, कौमुदीमहोत्सव बंद केल्यापासून काय फायदा आपणाला वाटतो ?

चा०—तर मग आमची फजिती करण्याकरितां बोलाविलें?

चंद्र०—आर्या, फजिती करण्याकरितां नव्हे.

चा०—काय तर मग ?

चंद्र०—विनंती करण्याकरितां.

चा०—चंद्रगुप्ता, असें जर आहे तर ज्यांची विनंती करावयाची असते त्यांच्या मर्जी विरुद्ध शिष्यांनीं वागूं नये.

चंद्र०—आर्या हें खरें. परंतु आपली मर्जी कारणावांचून लागावयाची नाहीं ह्मणून मला प्रश्न करण्याला सवड मिळाली.

चा०—चंद्रगुप्ता, माझा स्वभाव तूं बरोबर जाणलास- कारणावांचून चाणक्य स्वप्नांत सुद्धां कांहीं करणार नाहीं.

चंद्र०—आर्या, तें कारण ऐकिण्याची इच्छा आहे ह्मणूनच विचारावेंसें वाटतें.

चा०—चंद्रगुप्ता ऐक. शास्त्रकारांनीं राज्यकारभाराचे तीन प्रकार केले आहेत एका प्रकारांत केवळ राजाच्या मताप्रमाणें काम होतें. दुसऱ्या प्रकारांत केवळ प्रधानाच्या मताप्रमाणें काम चालतें. आणि तिसऱ्या प्रकारांत दोघांच्याहि मताप्रमाणें काम चालतें. तुझा राज्यकारभार दुसऱ्या प्रकारचा ह्मणजे केवळ प्रधानाच्या मताप्रमाणें चालणारा आहे. मग तूं उगीच कारणें कां विचारतोस? आह्मी आपल्या इच्छेप्रमाणें करीत आहोंत. (चंद्रगुप्त रागानें तोंड फिरवितो)

(पडद्यांत एक भाट)—

कबीत.

आकाश हें काशपुष्पासमप्रभ, भूतिधर-शीतकरदेह सुंदर दिसे । शीतकर-किरण-संपृक्तभू ज्यामध्ये, शंकराभरणगजचर्मपरि लसलसे । धवलही कौमुदी लोचनानंदकर, शंभुतनुरुंडमालाच भासे । यापरी शंभुतनुसदृशा ही शरत्, क्लेश वारण करो सर्व तुमचे॥

कबीत.

प्रथम नेत्र उन्मीलनीं, जडदृष्टी जी होय ।
रत्नदीपकांती जिला, पाहवेन कीं जाय ।
दर्शन-कार्यीं सालसा, जृंभणादिकार्यें ।
अंगभंग योगें जिला, जलकणभूषण ये ।
शयनांतीं श्री विष्णुचें, दर्शन या परिचें ।
शरत्कालिं जें होतसें, रक्षण करुं तुमचें ।

दुसरा भाट—

कबीत.

मत्तगजयूथपतिगंडभेदनपटू, जीव निर्मी जनी सृष्टि-कर्ता । शौर्यतेजोबळें आपुल्या सर्वपशु, जिंकुनीं मिळविती श्रेष्ठसत्ता । जेविं ते मानधन मृगपती एकक्षण, साहति न आपुल्या दंतपाता । त्यापरी त्वत्स-दृशराजराजाधिपति साहिती कधि न आज्ञाविघाता ।

कवीत.

सुवर्ण मौक्तिकभूषणें, वहु जरि प्रभुला तीं ।
लेववितीं तरि प्रभुत्व जें, तें नच त्या देतीं ।
आज्ञा ज्याची मस्तकीं, सकल लोक घेती ।
तोचि खरा प्रभु तुझ्या परी, शोभे श्रुतकीर्ती ।

चा०—(ऐकून आपल्याशीं) पहिल्यानें तर कुलदेवतांचा उच्चार करून शरद्गुण वर्णन करून आशीर्वाद दिला. पण दुसऱ्याच्या गीताचा अर्थ काय? हां, लक्षांत आला. हा राक्षसाचा प्रयोग! अरे दुष्टा राक्षसा, चाणक्य जागा आहे बरें! निजला नाहीं!

चद्रं०—आर्या वैहीनरे, या भाटांनां लाख मोहरा बक्षीस दे.

कं०—आज्ञा. (जाऊं लागतो?)

चा०—वैहीनरे, थांब थांब जाऊं नकोस. चंद्रगुप्ता, हा काय भलताच खर्च करितो?

चद्रं०—आर्यांनीं या प्रमाणें मला वागविल्यावर राज्य हें मग बंधनच आहे ह्मणावयाचें, राज्य नव्हे!

चा०—स्वतः ज्याला राज्यकारभारांत लक्ष द्यावयाचें ना-

हीं, त्याला असेंच व्हावयाचें. तुला जर हें सहन होत नसेल तर स्वतः कारभार पाहात जा.

चद्रं०—ठीक आहे. आह्मी स्वतः कारभार पाहतों.

चा०—फार उत्तम. आह्मीही आतां आपलें काम पाहतों.

चद्रं०—तर मग कौमुदीमहोत्सव कां बंद केला याचें कारण सांगा.

चा०—कौमदीमहोत्सव कां करावयाचा याचें आधीं कारण सांग.

चद्रं०—पहिलें कारण हेंच कीं माझी आज्ञा तशी आहे.

चा०—माझेंहि पहिलें कारण हेंच कीं तुझी आज्ञा मोडावी. कारण, तुझी आज्ञा पूर्वसमुद्रापासून तों पश्चिम समुद्रापर्यंत सर्वराजे शिरसा मान्य करितात. पण माझ्या पुढें मात्र तुझी आज्ञा चालणार नाहीं. व या गुरुभक्तीमुळें तुझा मोठेपणा जास्त शोभेल.

चंद्र०—बरें, दुसरें कारण कोणतें ?

चा०—तेंहि सांगतों. शोणोत्तरे, कायस्थ अचलदत्ताकडे जा आणि त्याला ह्मणावें कीं फरारी होऊन मलयकेतू-

ला मिळालेले जे भद्रभटादिक लोक त्यांच्या नांवाची यादी मागितली आहे.

प्र०—आज्ञा.(जाऊन पुन्हां परत येऊन) आर्या, हे कागद.

चा०—चंद्रगुप्ता, ऐक.

चंद्र०—लक्ष आहे.

चा०—(वाचतो) स्वति महाराज चंद्रगुप्ताच्या बरोबरच उदयास आलेलें जें प्रधानमंडळ येथून निघून जाऊन मलयकेतूस मिळालें त्याच्या नांवांची यादी:—

१ हत्तीवरचा मुख्य अधिकारी भद्रभट.
२ घोड्यावरचा मुख्य अधिकारी पुरूषदत्त.
३ मुख्य द्वारपाळ जो चंद्रभानू त्याचा भाचा हिंगुरात.
४ महाराजांचा संबंधी बलगुप्त.
५ महाराजांचा लहानपणचा हुजऱ्या राजसेन.
६ सेनापति सिंहबल याचा धाकटा भाऊ भागुरापण
७ मालवराजाचा मुलगा रोहिताक्ष.
८ भालेकऱ्यांतला मुख्य विजयवर्मा.

(आपल्याशीं)याप्रमाणें आह्मी सर्व महाराजांच्या कामांत तत्पर आहोंत. (उघड) याप्रमाणें हें पत्र.

चंद्र०—हे फितूर कां झाले हें ऐकण्याची इच्छा आहे.

चा०—चंद्रगुप्ता, ऐक. यामध्यें जे हे हत्ती व घोडे यांच्यावरचे मुख्य भद्रभट व पुरुषदत्त नांवाचे, यांना रंडी बाजी, दारूबाजी, आणि शिकार हीं तीन व्यसनें लागलीं व त्यायोगानें त्यांच्यानें काम बरोबर होईना झणून मीं त्यांनां अधिकारावरून काढलें आणि त्यामुळें ते फितूर झाले, आणि तिकडे मलयकेतूकडे त्याच अधिकावर नौकर राहिले. हे जे हिंगुरांत आणि बलगुप्त आहेत हे अतिशय लोभी; यांना कितीहि पगार वाढवला तरी कमीच वाटत असे; तेव्हां मलयकेतूकडे आपणाला जास्त मिळेल या आशेनें हे फितूर झाले. जो हा तुझा लहानपणचा हुजऱ्या राजसेन याला तुझ्या मेहरबानीनें पुष्कळ हत्ती घोडे धनदौलत मिळाली ती कदाचित् पुन्हां तूं हिसकावून घेशील या भीतीनें तो निघून गेला. जो हा सेनापती–सिंहबलाचा धाकटा भाऊ भागुरायण, याचा पर्वतेश्वराशीं पुष्कळ दिवसाचा स्नेह होता; तो मेल्यावर त्यानें मलयकेतूच्या मनांत भरविलें कीं तुझा बाप चाणक्यानें मारिला; आणि अ-

शा रीतीनें त्यानें मलयकेतूला पळविलें; पुढें तुझे अपराधी जे चंदनदास यांनां पकडण्याला सुरुवात झालेली पाहून त्याच्या मनांत भीति वाटली व तो येथून पळून गेला; तिकडे मलयकेतूनें यानें माझा प्राण राखिला ह्मणून कृतज्ञता जाणून त्याला आपल्या प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं. हे जे दोघे रोहिताक्ष आणि विजयवर्मा आहेत हे अतिशय मानी आहेत; यांच्या भाऊबंदांना तूं वेतन व मानपान दिलास हें त्यांना सहन झालें नाहीं ह्मणून ते मलयकेतूकडे पळून गेले. अशीं हीं ह्यांच्या फितुराचीं कारणें आहेत.

चंद्र०—आर्या, यांचीं फितुराचीं कारणें जर आपणास समजलीं होतीं तर आपण याची व्यवस्था त्याचवेळेस कां केली नाहीं?

चा०—करतां आलीच नाहीं.

चंद्र०—कां बरें? अक्कल चालली नाहीं? किंवा कांहीं दुसरें कारण होतें?

चा०—अक्कल कशी चालणार नाहीं? कांहीं कारण होतें ह्मणूनच तसें केलें नाहीं.

चंद्र०—तें कारण कोणतें हें ऐकण्याची इच्छा आहे.

चा०—सांगतों, ऐक आणि समजून घे.

चंद्र०—दोन्हीं चालूं आहेत. सांगा.

चा०—चंद्रगुप्ता, लोक फितूर झाले ह्मणजे त्याला उपाय दोन आहेत. एक त्यांच्यावर मेहरबानी करावी, किंवा त्यांना शिक्षा करावी. आतां, हे भद्रभट व पुरुषदत्त यांच्यावर मेहरबानी करावयाची ह्मणजे त्यांना त्यांच्या अधिकारावर पुन्हाः नेमावयाचें. पण अशा व्यसनी पुरुषाला पुन्हाः नेमावयाचें ह्मणजे राज्याला फार घातक आहे; त्यांतून त्यांच्या हातीं राज्यांचीं मुख्य अंगें हत्ती आणि घोडे आहेत. तेव्हां तसें करणें अप्रशस्त आहे. हिंगुरात आणि बलगुप्त हे अतिशय लोभी. सगळें राज्य जरी त्यांनां दिलें तरी त्यांनां संतोष नाहीं. मग त्यांच्यावर मेहरबानी कशी करायची? राजसेन व भागुरायण तर बिचारे आपल्या प्राणाच्या व पैशाच्या भीतीनें पळून गेलेले. त्यांच्यावर मेहरबानी करण्याला सवड कुठली व्हायला? रोहिताक्ष आणि विजयवर्मा यांना भाऊबंदाच्या सन्मानापासून पीडा उत्पन्न होते;

मग त्यांच्यावर आपण मेहरबानी कशी करावी? या प्रमाणें एक उपाय तर खुंटलाच. आतां दुसरा उपाय शिक्षा करण्याचा. तो जर केला असतां तर प्रजेच्या मनांत असें आलें असतें कीं आपणाला नुकतेंच नंदांचें ऐश्वर्य प्राप्त झालें आहे, पण आपण लागलीच आपल्या बरोबर उदयास आलेल्या प्रधान मंडळीलाच कडक शिक्षा देऊन पीडा देत आहेंत; असें त्यांना वाटलें ह्मणजे त्यांचा आपल्यावर विश्वास बसावयाचा नाहीं. यामुळें दुसराहि उपाय योजिला नाहीं. अशा प्रकारचे आपल्याकडचे लोक राक्षसाला फितूर झाल्यामुळें मलयकेतूनें त्यांच्या साह्यानें म्लेंच्छराजांचें मोठें सैन्य जमा केलें आहे; आणि बापाच्या मरणामुळें संतापून जाऊन त्यानें आपल्यावर स्वारी करण्याची कडेकोट तयारी चालविली आहे. ह्मणून हा लढाईचा काळ आहे, उत्सवाचा काळ नाहीं. अगोदर तटबंदी केली पाहिजे, कौमुदीमहोत्सव नको, ह्मणून मी तो बंद करविला.

चंद्र०—आर्या, यांत पुष्कळ विचारावयाचें आहे.

चा०—चंद्रगुप्ता, खुशाल विचार. मलाहि पुष्कळ सांगावयाचें आहे.

चंद्र०—हा मी विचारतों.

चा०—हा मी सांगतों.

चंद्र०—हा जो सर्व अनर्थाला कारण मलयकेतू हा येथून निघून जात असतां, त्याला कां जाऊं दिलें ?

चा०त्याला न जाऊं द्यावें तर काय करावें ? त्याला जर ठेवून घेतला तर त्याच्या बापाला कबूल केल्याप्रमाणें राज्याचा अर्धा भाग त्याला द्यावा लागणार, किंवा त्याला बंदींत टाकावें लागणार. त्याला जर बंदींत टाकलें तर पर्वतकाला आह्मीं मारलें असा लोकांचा समज आपण स्वतःच करून घ्यावा व आपण कृतघ्न ठरावें. बरें, राज्याचा अर्धा भाग द्यावा तर मग राज्य मिळावयाचें तरी कशाला ? तेव्हां त्याला जाऊं दिलें हेंच बरें.

चंद्र०—बरें हें असो. राक्षस या नगरांत बरेच दिवस होता, तथापि आपण त्याच्यावर लक्ष पुरविलें नाहीं, यावर काय ह्मणणें आहे आपलें ?

चा०—चंद्रगुप्ता, राक्षसाची आपल्या स्वामीच्या ठिकाणीं अढळ भक्ति असे; शिवाय तो पुष्कळ दिवस येथें राहिलेला होता; ह्मणून नंदावर प्रेम करणाऱ्या प्रजेचा त्याच्यावर विश्वास फार होता; त्याचप्रमाणें तो बुद्धिमान आहे, शूर आहे, त्याला साह्य चांगलें होतें, व त्याला पैशाचेंहि बळ होतें. तेव्हां तो जर नगरांत राहिला असतां तर मोठा उत्पात करिता. आणि मग मोठें कठीण गेलें असतें. आतां बाहेर गेल्यावर त्यानें कांहींहि केलें तरी त्याला पकडणें कठीण जाणार नाहीं, ह्मणून हृदयांत टोंचणाऱ्या शल्याप्रमाणें त्याला उपडून बाहेर फेकून दिला.

चंद्र०—चढाई करून त्याला कां पकडलें नाहीं ?

चा०—चंद्रगुप्ता, राक्षस आहे तो. पराक्रम दाखविण्याची वेळ आली ह्मणजे एक तर स्वतः मरेल किंवा तुमचें सैन्य तरी मारील. आणि असें झालें ह्मणजे दोन्ही कडून घातच आहे. कारण त्याच्यावर चढाई करून त्यांत जर तो मेला तर मग असा निःसीम भक्ति करणारा मनुष्य मिळावयाचा नाहीं. बरें त्यानें

तुझें सैन्य मारलें तर तिकडूनहि पीडाच. ह्मणून अशाला रानांतल्या हत्तीप्रमाणें युक्तीनेंच पकडला पाहिजे.

चंद्र०—आपल्याला बोलून जिंकण्याचें मला सामर्थ्य नाहीं. पण मला असें वाटतें कीं अमात्य राक्षस किती तरी हुषार!

चा०—आणखी तुह्मी नाहीं असेंच ना तुझ्या मनांतून बोलावयाचें होतें? दासीपुत्रा, त्यानें काय केलें रे?

चंद्र०—काय केलें हें आपल्या लक्षांत आलें नसेल तर ऐका. त्या महात्म्यानें, आमची गादी नगरांत स्थापन झाल्यावर आमच्या मस्तकावर पाय देऊन, याच नगरांत यथेष्ट वास केला, आणखी आह्मी विजयदुंदुभी वाजवीत असतां, आपल्या ल्हानशा सैन्यानें आमच्या अफाट सैन्याचा उत्साहभंग केला. आणि आपल्या बुद्धिकौशल्यानें अशी कांहीं आमची स्थिती करून टाकिली कीं आमचा आमच्या अत्यंत विश्वासू पुरुषावरसुद्धां विश्वास बसेनासा झाला.

चा०—(हांसून) चंद्रगुप्ता एवढेंच केलें राक्षसानें?

चंद्र०—यांत काय संशय? हें अमात्य राक्षसानें केलें.

चा०—मला वाटलें, नंदाला मारून ज्याप्रमाणें मीं तुला गादीवर बसविलें, त्याप्रमाणें तुला मारून त्यानें मलयेकतूला गादीवर बसविलें.

चंद्र०—हें दुसऱ्यानेंच केलें. यांत तुह्मीं काय केलें?

चा०—हे मत्सरबुद्धे, सर्व लोकांसमक्ष रागानें स्फुरण पावणाऱ्या आपल्या हातानें आपली शेंडी सोडून सकल रिपुकुलाचा उच्छेद करण्याची घोर प्रतिज्ञा कोणीं केली? आणि राक्षस पाहत असतांना, नवकोटी धनाचे स्वामी नवनंद यज्ञांतल्या पशुप्रमाणें कोणीं मारिलें? अरे, या नंदांचा चिताग्नी स्मशानांत अद्यापि शांत झाला नाहीं! त्या अग्नीच्या धुरानें सूर्यमंडल झांकून जाऊन आकाश धूसर दिसत होतें तें अद्यापि स्वच्छ झालें नाहीं! आणि त्यांना पाहून आनंदित झालेल्या स्मशानांतील पिशाच्चांचा कलकलाट अद्यापि शांत झाला नाहीं!

चंद्र०—हें सर्व दुसऱ्यानेंच केलें हो!

चा०—कोणीं ?

चंद्र०—नंदकुलांचा द्वेष करणाऱ्या दैवानें.

चा०—अरे, मूर्ख लोक दैवावर विश्वास ठेवितात.

चंद्र०—विद्वान् लोकहि बढाईखोर नसतात.

चा०—(संतापून जाऊन) दासीपुत्रा चंद्रगुप्ता, नौकराप्रमाणें मला वागवूं पाहतोस ? शेंडी बांधण्याचा प्रसंग आला असतांही ती मोकळी ठेवण्याविषयीं माझा हात धावूं पाहतो ! (जमिनीवर पाद प्रहार करून) पुन्हा प्रतिज्ञा करण्याविषयीं पाय वळवळ करीत आहे ! नंदाच्या नाशानें शांत होत चाललेला माझा क्रोधाग्नि, काळानें तुला घेरल्यामुळें तूं पुन्हा प्रज्वलित करीत आहेस !

रा०—(घाबरून आपल्याशीं)अरे, गुरुजी खरेंच रागावले काय ? यांचा हा पादप्रहार धरित्रीनें कसा धारण केला कोण जाणें ? या वेळेस तिला रौद्ररसाचा अभिनय करणाऱ्या महादेवाची आठवण झाली असेल. हें पहा, यांच्या डोळ्यांतून रागानें अश्रू निघतात तरी त्यांची लाली कमी होत नाहीं ! उलट त्यांमधून अग्नीच्या ठिणग्याच पडत आहेत कीं काय असा भास होतो !

खोटा

चा०—(कोप आवरून)चंद्रगुप्ता, प्रश्नोत्तरें बस झालीं. जर आमच्या पेक्षां राक्षस बरा वाटतो, तर हें शस्त्र त्यालाच दे. (शस्त्र फेंकून देतो व उठून वर पाहून आपल्याशीं)राक्षसा, राक्षसा, चाणक्याच्या बुद्धीवर ताण करूं इच्छिणाऱ्या तुझ्या बुद्धीचा हा उजेड. शठा, चाणक्यावरचा चंद्रगुप्ताचा विश्वास उडाला ह्मणजे मी त्याला सहज जिंकीन ह्मणून उभयतांमध्यें फूट पाडण्याची जी ही युक्ती योजिलीस ती, मूर्खा, तुझ्याच नाशाला कारण होईल. (निघून जातो)

चंद्र०—वैहीनरे, आजपासून चाणक्याला सोडून चंद्रगुप्त स्वतः राज्यकारभार पाहणार अशी लोकांत दंवडी पिटवायला सांग.

कं०—(आपल्याशीं) काय, नुसतें चाणक्यच ह्मटलें ? मागें कांहींच किताब नाहीं ? अरेरे! खरोखरच महाराजांनीं याचा अधिकार काढून घेतला ! अथवा, यांत महाराजांचा काय दोष ? राजानें कांहीं वाईट केलें तर त्याचा दोष प्रधानाकडेसच. कारण हत्ती जो बेफाम होतो तो महाताच्याच दोषा मुळें.

चंद्र०—आर्या, विचार काय करतोस ?

कं०—कांहीं नाहीं महाराज. पण विनंती एवढीच कीं आतां आपण खरेंच महाराज झाला.

चंद्र०—(आपणाशीं) अशारीतीनें आमची फूट झालेली लोकांत दाखविण्यांत गुरुजींचा जो हेतू असेल तो पूर्ण होवो ह्मणजे झालें. (उघड) शोणोत्तरे, या शुष्क-कलहानें माझें डोकें दुखावयास लागलें आहे. तर शयनगृहाचा मार्ग दाखीव.

प्र०—चलावें महाराजांनीं.

चंद्र०—(उठून आपल्याशीं) गुरुजीच्या आज्ञेवरूनच मी त्यांचा मानभंग केला तर मला कसें देमायधरणी ठाय झालें आहे. मग जे वडिलांचा खरोखर अपमान करीत असतील त्यांच्या हृदयाचे लाजेनें हजार तुकडे कसे होत नाहींत ? (जातो)

अंक तिसरा समास.

अंक ४ था.

(प्रवाशाचा वेष धारण करणारा एक पुरुष येतो)

पुरुष०—वाहवा ! वाहवा ! अहो मालकाची आज्ञा नसती तर शंभर शंभर योजनें कोण गेले असतें हो ? ही मालकाची आज्ञा नसत्या ठिकाणीं सुद्धां मनुष्याला नेते. तर आतां आपणही अमात्यराक्षसाच्या घरांत जावें. (फिरून) कोण आहे हो द्वारावर ? अहो अमात्यराक्षसांनां निरोप सांगा कीं हा करभक त्वराकरून जरूरीच्या कामामुळें कुसुमपुराहून आला आहे.

द्वारपाळ—(येऊन)अरे, मोठ्यानें बोलूं नकोस. अमात्यराक्षसांना राजकारणांनीं बरेंच दिवसांपासून जाग्रणें झालीं आहेत आणि त्यामुळें त्यांना मस्तकशूळ झाला आहे, ह्मणून ते अद्यापि निजलेच आहेत. तर तूं क्षणभर थांब. प्रसंग पाहून मी तूं आल्याचें कळवितों.

पु०—गड्या, तुझ्या सोईला येईल तसें कर.

(नंतर बिछान्यावर बसलेला राक्षस व आसनावर बसलेला शकटदास असा प्रवेश)

रा०—(आपल्याशीं)कार्याच्या आरंभीं हा विचार मनांत येतो कीं दैव तर प्रतिकूळ आहेच. आणि या दुष्ट चाणक्याची बुद्धि मूळचीच वांकडी. तेव्हां मी जे उपाय योजले आहेत, ते फसले तर कसें? असें तरंग मनांत घोळत असल्यामुळें मला कैक रात्रीं झोंप मिळाली नाहीं. पहा, या कारस्थानाचें बीज आधीं बारीक हवें. बरें, तें पेरतांना कोणाच्या ध्यानांत येतां कामाचें नाहीं, पण वृक्ष तर झाला पाहिजे. कांहीं बीजें गुप्तच ठेवावीं लागतात. त्याचें फळ जें फार खोल असतें तें प्रसंगींच फोडून दाखवावयाचें. आपल्या एकट्याच्याच बुद्धीनें सर्वांच्या कल्पना जाणावयाच्या. योग्यप्रसंगीं आपणच माजविलेलें आपणच आवरावयाचें. अशारीतीनें कारस्थानी पुरुषाच्या श्रमाचा अनुभव आमच्या सारख्यांना येतो किंवा उत्तम नाटक निर्माण करणाऱ्या कवीला तरी येतो. (थांबून)या दुष्ट चाणक्य बटूचा——

द्वा०—(प्रवेश करून)जयजयकार असो.

रा०—(तें न ऐकिलेंसें करून) भेद होणें शक्य आहे.

द्वा०—अमात्यांचा.

रा०—(डावा डोळा लवलासें पाहून आपल्याशीं)हां! चाणक्य बटूचा जयजयकार असो. भेदहोणें शक्य आहे अमात्याचा. असें सुचविलें या वामनेत्र स्फुरणानें तथापि खटपट सोडूं नये (उघड) अरे, काय काम आहे?

द्वा०—अमात्य महाराज, हा करभक कुसुमपुराहून आला आहे. आपल्या दर्शनाची इच्छा करितो.

रा०—मग त्याला खुशाल येऊं दे.

द्वा०—आज्ञा. (करभकास) गड्या, हे अमात्य महाराज बसले आहेत. चल. (द्वारपाल जातो)

पु०—(जवळ जाऊन) अमात्यांचा जयजयकार असो.

रा०—(पाहून) गड्या करभका, ये बैस.

पु०—आज्ञा (खालीं बसतो)

रा०—(आपल्याशी) मीं याला कोणत्या कामावर नेमिलें होतें बरें? कामें फार असल्यामुळें लौकर आठवण होत नाहीं. (विचार करतो).

एक भालदार—(प्रवेश करून) अरे, पैस, पैस. बाजू अरे, तुह्माला माहीत नाहीं काय, कीं अभागी लोकांना राजा, देव आणि ब्राह्मण यांचें दर्शन सुद्धां दुर्लभ मग सांनिध्य तर दूरच. (पडद्याकडे पाहून) काय ह्मणतां ! ही वाट कशाकरितां ! हे पहा महाराज मलयकेतू अमात्य राक्षसांचें मस्तक दुखत आहे असें ऐकल्यामुळें, त्याच्या दर्शनास निघाले आहेत. याकरितां दूर व्हां, वाट सोडा. (जातो)

(नंतर भागुरायण व कंचुकी यांच्या सह मलयकेतु येतो)

म०—(दीर्घश्वास सोडून) तात महाराजांना जाऊन आज दहा महिने झाले. अणि अद्यापि मी त्यांना तिलांजली सुद्धां दिली नाहीं ! अथवा मीं पूर्वी प्रतिज्ञा केलीच आहे कीं ज्याप्रमाणें आमच्या आईनीं तात महाराजांच्या मरणामुळें, हृदय पिटून व वस्त्र भूषणें फाडून फोडून हाहाकार केला, तसाच हाहाकार शत्रूच्या स्त्रियांमध्यें करवीन, तेव्हांच वडिलांना तिलांजली देईन. जास्त काय? ज्याअर्थीं शूर पुरुषाला उचित असें हें कार्य हातीं घेतलें आहे, त्या अर्थीं

असल्यामुळें चंद्रगुप्त अशा रीतीनें वांचला. चंद्रगुप्ताचे ठिकाणीं आजानुबाहुत्वादि सर्व राजचिन्हें होतीं; व शौर्य, औदार्य, गांभीर्य, व विनय यांचा तर केवळ तो निधीच होता. अशा प्रकारचा असूनहि तो त्या दुष्ट नंदांच्या डोळ्यांत खुपत असे. ह्मणून त्यांनीं त्याचा नाश करण्यास्तव पुष्कळ प्रयत्न केले. अखेरीस त्यांनीं त्याला अन्नछत्रावर देखरेख करण्याकडे नेमिलें. त्या ठिकाणीं दुष्ट नंदांचा नाश करण्याची संधी बघत चंद्रगुप्त राहिला. एके दिवशीं एक अति रागीट ब्राह्मण त्याच्या दृष्टीस पडला. त्या ब्राह्मणाच्या पायाला एकदां दर्भाचें खुंट लागलें, तेव्हां संतापून जाऊन त्यानें मुळापाळासुद्धां तो दर्भ उपटण्याचा महा खटाटोप केला. हा त्याचा अति रागीटपणा पाहून चंद्रगुप्ताला असें वाटलें, कीं हा ब्राह्मण नंदांचा समूळ नाश करण्यास योग्य आहे. या ब्राह्मणाचें नांव विष्णुगुप्त. हा लहान असतांना शुक्राचार्यांच्या दंडनीतींत व ज्योतिःशास्त्रांत फार प्रवीण झाला. नीतिशास्त्र रचणारा जो चणक, त्याचा हा मुलगा ह्मणून याला चाणक्य ह्मणत. ह्याला सर्व शास्त्र व वेद चांगलें अवगत होतें. गुणवान् चंद्रगुप्तावर याचें प्रेम फार बसलें. तेव्हां चंद्रगुप्तानें त्याला

म०—मित्रा, भागुरायणा, आपल्याकडे जे भद्रभटादिक आले आहेत, त्यांनीं मला असें सांगितलें कीं आह्मी अमात्यराक्षसाच्या मार्फत आलों नाहीं, तर आपले सेनापति शिखरसेन यांच्या मार्फत आलों आहोंत; दुष्ट चाणक्यानें घेरलेल्या चंद्रगुप्तावर आह्मी नाराज झालों, व आपले उत्तम गुण पाहून आपला आश्रय केला. या त्यांच्या ह्मणण्याचा भावार्थ काय असेल याचा मी पुष्कळ विचार करतों पण कांहीं लक्षांत येत नाहीं.

भा०—महाराज, यांच्या ह्मणण्याचा भावार्थ कांहीं कठीण नाहीं. ज्याला ज्याला उत्कर्षाची इच्छा आहे, आणि ज्याला ईर्षा आहे, अशांनीं ज्याचा आश्रय करावयाचा त्याला जो हितकर आणि प्रेमी असेल त्याच्या मार्फत त्याचा आश्रय करावा हें रास्तच आहे.

म०—पण, आह्माला तर हितकर आणि प्रेमी असा अमात्यराक्षस आहे.

भा०—होय, खरें आहे. पण अमात्यराक्षसाचें वैर चाणक्याशीं; चंद्रगुप्ताशीं नाहीं. तेव्हां चाणक्याच्या वरचढीमुळें रागावून जर चंद्रगुप्तानें त्याला सचिवपदापासू-

एकतर रण करून पित्याच्या मागें जाईन, नाहींतर आईच्या डोळ्यांचें अश्रु पुसून शत्रूंच्या स्त्रियांच्या डोळ्यांत अश्रू उत्पन्न करीन. (उघड) जाजले, मागाहून येणाऱ्या सर्व राजांना माझा निरोप सांग कीं मी एकटाच अमात्य राक्षसाकडे त्यांना न कळेल असें जाऊन त्यांना आश्चर्य उत्पन्न करणार आहे. तर तुह्मी मजबरोबर येण्याचें श्रम घेऊं नका.

कं०—आज्ञा (फिरून) अहो राजे लोकहो! महाराज मलयकेतूची अशी आज्ञा आहे कीं माझ्यामागें कोणी येऊं नये. (पाहून आनंदानें) महाराज आपली आज्ञा ऐकिल्याबरोबर हे राजे पहा कसे एकदम परत फिरले! त्यांनीं आपले घोडे व हत्ती कसे एकदम फिरविले! समुद्र ज्याप्रमाणें आपली मर्यादा सोडीत नाहीं तशी आपली आज्ञा कोणी सुद्धां उल्लंघित नाहीं.

म०—जाजले, तूंही सेवकासुद्धां परत जा. भागुरायणच एकटा मजबरोबर येईल.

कं०—आज्ञा (सपरिजन जातो)

म०—मित्रा, भागुरायणा, आपल्याकडे जे भद्रभटादिक आले आहेत, त्यांनीं मला असें सांगितलें कीं आह्मी अमात्यराक्षसाच्या मार्फत आलों नाहीं, तर आपले सेनापति शिखरसेन यांच्या मार्फत आलों आहोंत; दुष्ट चाणक्यानें घेरलेल्या चंद्रगुप्तावर आह्मी नाराज झालों, व आपले उत्तम गुण पाहून आपला आश्रय केला. या त्यांच्या ह्मणण्याचा भावार्थ काय असेल याचा मी पुष्कळ विचार करतों पण कांहीं लक्षांत येत नाहीं.

भा०—महाराज, यांच्या ह्मणण्याचा भावार्थ कांहीं कठीण नाहीं. ज्याला ज्याला उत्कर्षाची इच्छा आहे, आणि ज्याला इर्षा आहे, अशांनीं ज्याचा आश्रय करावयाचा त्याला जो हितकर आणि प्रेमी असेल त्याच्या मार्फत त्याचा आश्रय करावा हें रास्तच आहे.

म०—पण, आह्माला तर हितकर आणि प्रेमी असा अमात्यराक्षस आहे.

भा०—होय, खरें आहे. पण अमात्यराक्षसाचें वैर चाणक्याशीं; चंद्रगुप्ताशीं नाहीं. तेव्हां चाणक्याच्या वरचढीमुळें रागावून जर चंद्रगुप्तानें त्याला सचिवपदापासू-

न हांकलून दिलें, तर अमात्यराक्षस, चंद्रगुप्त नंदवंशांतला आहे ह्मणून, आणि आपल्या आप्तवर्गाचा आग्रह पडला ह्मणून, चंद्रगुप्ताशीं कदाचित् संधी करील. आणि चंद्रगुप्त देखील, आपल्या वडिलांच्या वेळचा मनुष्य हा आहे ह्मणून याला ठेवील. आणि असें झालें ह्मणजे त्याच्या मार्फत आलेल्या माणसावर आपला विश्वास सहजच राहणार नाहीं. हा यांचा भावार्थ दिसतो.

म०—असेल बुवा कदाचित्. मित्रा, अमात्यराक्षसाच्या घराकडे चल.

भा०—चलावें. (फिरून) हें अमात्यराक्षसाचें घर. आंत चलावें.

म०—चला. (आंत जातात)

रा०—हां आठवलें. (उघड) गड्या, कुसुमपुरांत तुला स्तनकलश भाट भेटला होता काय ?

पु०—होय अमात्यमहाराज.

म०—मित्रा भागुरायणा, कुसुमपुरच्या गोष्टी चालल्या आहेत, असें वाटतें. तर आतांच जाऊं नये. क्षण-

भर येथूनच ऐकावें कशासंबंधाच्या आहेत त्या. हे अमात्य लोक सर्व लोकांत प्रसिद्ध जरी एखादी गोष्ट झाली तरी राजाला राग येईल ह्मणून ती त्याला अगदींच बदलून सांगतात.

भा०—ठीक आहे.

रा०—गड्या, तें काम झालें?

पु०—अमात्यांच्या कृपेनें झालें.

म०—मित्रा भागुरायणा, कोणतें कार्य असावें बरें?

भा०—हा वृत्तांत कांहीं गूढ दिसतो. इतक्यांतच हा लक्षांत येणार नाहीं. आणखी जरा लक्ष देऊन ऐकावें.

पु०—ऐकावें अमात्यांनीं. मला अमात्यांची आज्ञा होतीच—

रा०—गड्या, सविस्तर सांग.

पु०—होय. मला अमात्यांनीं सांगितलें होतेंच कीं करभका, माझा निरोप स्तनकलश भाटाला सांग कीं जेव्हां जेव्हां ह्मणून चाणक्य चंद्रगुप्ताच्या आज्ञा मोडीत जाईल तेव्हां तेव्हां तूं उत्तेजनपर कवितांनीं चंद्रगुप्ताला चिडवीत जा.

रा०—बरें, पुढें?

पु०—तेव्हां मी कुसुमपुराला गेलों आणि आपला निरोप त्याला सांगितला.

रा०—बरें, पुढें?

पु०—त्याच वेळेस, नंदकुलाच्या नाशामुळें खिन्न झालेल्या लोकांना आनंद उत्पन्न करणारा असा कौमुदी महोत्सव करण्याविषयीं चंद्रगुप्तानें नगरांत आज्ञा फिरविली. ती आज्ञा ऐकून जसा काय लांबचा स्नेही भेटला, असा लोकांना आनंद झाला.

रा०—(डोळ्यांत पाणी आणून) हे महाराजा नंदा, नुसत्या कुमुदांना आनंद देणारा चंद्र जरी असला, तरी सकल जगताला आनंद देणारा तूं नसल्यामुळें कौमुदी कशी शोभेल? बरें, पुढें?

पु०—नंतर लोकांच्या आनंदसागरास भरती आणणारा तो कौमुदी महोत्सव दुष्ट चाणक्यानें बंद केला. ह्या प्रसंगांत स्तनकलशानें चंद्रगुप्ताला उत्तेजन येईल असे दोन कवीत ह्मटले.

रा०—कोणते बरें?

पु०—[मत्तगज युथपति इत्यादि ह्मणून दाखवितो]

रा०—[आनंदानें] शाबास, मित्रा स्तनकलशा, शाबास. योग्यकाळीं तूं बीज पेरिलेंस त्याचें फळ अवश्य येईलच येईल. अहो, क्रीडा-रसाचा भंग झालेला यःकश्चित् पुरुषाला सुद्धां सहन होत नाहीं. मग राजे लोकांना कुठला सहन व्हावयाला?

म०—अगदीं खरी गोष्ट.

रा०—बरें पुढें?

पु०—तेव्हां, आपली आज्ञा मोडली ह्मणून चंद्रगुप्ताला राग आला, व त्यानें आपल्या गुणांची स्तुति करून चाणक्याला अधिकारावरून काढून टाकिलें.

म०—मित्रा, भागुरायणा, चंद्रगुप्तानें राक्षसाचें गुणवर्णन केलें, यावरून चंद्रगुप्ताची राक्षसाचे ठिकाणीं भक्ति आहे असें दिसतें.

भा०—त्याच्या पेक्षां चाणक्याला काढून टाकिलें याच्यावरून तर आपलें ह्मणणें अगदीं खरें वाटतें.

रा०—गड्या, चाणक्याला अधिकारावरून दूर करण्याला, कौमुदी महोत्सव बंद केला एवढेंच कारण बस झालें?

म०—मित्रा, चंद्रगुप्ताला चाणक्याला काढण्याला आणखीं काय कारणें झालीं हें पाहण्यांत याचा काय हेतू असावा बरें?

भा०—हेतू हाच कीं चाणक्य फार हुषार आहे; तो विनाकारण चंद्रगुप्ताला कांहीं राग आणणार नाहीं. आणि चंद्रगुप्तहि कृतज्ञ आहे तेव्हां तोहि व्यर्थ एवढ्यावरूनच चाणक्याचा अपमान करणार नाहीं. याकरितां त्या दोघांमध्यें विघाड होण्याला जर आणखीं कारणें झालीं असलीं तरच तो विघाड टिकेल.

पु०—अमात्य महाराज, या शिवाय चंद्रगुप्ताला चाणक्यावर रागावण्याला पुष्कळ कारणें झालीं आहेत.

रा०—कोणतीं कोणतीं बरें?

पु०—एक, महाराज मलयकेतू व आपण कुसुपुरांतून निघून जात असतांना दुर्लक्ष केलें.

रा०—[आनंदानें] वाहवा! मित्रा शकटदासा, आतां चंद्रगुप्त आपल्या हातांत आला.

श०—वाहवा! आतां चंदनदास बंधनांतून सुटेल, आपलीहि आपल्या मंडळीची भेट होईल, व जीवसिद्धी—वगैरेचे हाल चुकतील.

भा०—[आपल्याशीं] जीवसिद्धी—वगैरेचे मात्र हाल चुकतील खरे!

म०—मित्रा भागुरायणा, चंद्रगुप्त हातांत आला असें ह्मणण्याचा याचा भावार्थ काय?

भा०—दुसरें काय? चाणक्यापासून एकदां चंद्रगुप्त निराळा झाला, ह्मणजे मग त्याला आपल्याकडे ओढणें कांहीं कठीण नाहीं.

रा०—अधिकारावरून हांकलून दिला गेल्यावर तो चाणक्य कोठें असतो?

पु०—तेथेंच कुसुमपुरांत राहतो.

रा०—(साशंक) काय? तेथेंच राहतो! तपोवनाला गेला नाहीं? किंवा त्यानें पुन्हा प्रतिज्ञा केली नाहीं?

पु०—अमात्य महाराज, तपोवनाला जाणार असें ऐकितो.

रा०—(साशंक)शकटदास, हें जुळत नाहीं. पहा, ज्याला या पृथ्वीतलावर इंद्राप्रमाणें शोभणाऱ्या नंदमहाराजांनीं अग्र्यासनावरून ओढल्याचा अपमान सहन झाला नाहीं, त्या मानी पुरुषाला, स्वतः ज्याला राज्य मिळवून दिलें, त्यानें केलेला अपमान कसा सहन होईल ?

म०—मित्रा भागुरायणा, चाणक्यानें तपोवनांत गेल्यापासून, किंवा पुन्हा प्रतिज्ञा केल्यापासून याचा काय फायदा ?

भा०—महाराज, ही गोष्ट कठीण नाहीं. जसजसा चाणक्य निरपेक्ष होऊन चंद्रगुप्तापासून दूर होईल तसतसा याचा फायदाच आहे.

श०—अमात्य, जास्त कल्पना करण्यांत कांहीं हंशील नाहीं. हें सर्व जुळतें आहे. अहो, ज्यानें, सकल भूतलावरील राजांच्या मणिमय–मुकुटावर पाय दिला, त्याला आपल्या आज्ञेचा भंग झालेला कसा सहन होईल ? तसेंच, चाणक्य रागीट खरा; पण प्रतिज्ञा केली

ह्मणजे काय त्रास पडतो याचा त्याला पूर्ण अनुभव आला आहे. तेव्हां तो देखील पुनः प्रतिज्ञा करायला भीत आहे. आणखी, एकदां त्यानें प्रतिज्ञा केली ती दैवानें पूर्ण झाली, आतां पुनः केली, तर ती पूर्ण होईल कीं नाहीं याचीहि वानवाच.

रा०—हीच गोष्ट खरी. मित्रा जा, आणि करभकाची व्यवस्था लाव.

शा०—आज्ञा. (पुरुषासह जातो)

रा०—मलाहि आतां मलयकेतूला भेटावयाचें आहे.

म०—(एकदम येऊन) हा मीच आपणाला भेटावयास आलों आहे.

रा०—(पाहून) अरे, मलयकेतूच स्वतः आला (उठून) या आसनावर बसावें.

म०—होय. अमात्यांनीं बसावें. (दोघेही बसतात)

म०—अमात्य, डोकें कसें काय ? दुखावयाचें राहिलें ?

रा०—तुला जोंपर्यंत सार्वभौमपद मिळत नाहीं तोंपर्यंत कुठलें डोकें दुखावयाचें राहायला ?

म०—अमात्यांनीं हें काम हातीं घेतल्यावर साध्य होण्याला कांहीं कठीण नाहीं. तर मग आतां सर्व सैन्यासह शत्रूचें व्यंग पहात आह्मी किती दिवस येथें बसावयाचें?

रा०—आतां कशाला बसावयाचें? चला, स्वारीची तयारी करा.

म०—अमात्य, शत्रूचें कांहीं व्यंग सांपडलें?

रा०—होय. चांगलें सांपडलें.

म०—कोणतें?

रा०—राजा आणि प्रधान यांच्यांत तंटा. चंद्रगुप्तानें चाणक्याला हांकलून दिलें.

म०—हा तंटा कांहीं व्यंग नव्हे.

रा०—मलयकेतू, दुसऱ्या राजाला तें नसेल. पण चंद्रगुप्ताला तें व्यंगच आहे.

म०—नव्हे. विशेषतः चंद्रगुप्ताला तें व्यंग नाहीं.

रा०—कां बरें? विशेषतः चंद्रगुप्ताला तें व्यंग कां नाहीं?

म०—चंद्रगुप्तावर प्रजा नाखूष असायला कारण चाणक्य.

त्याला एकदां काढून टाकलें ह्मणजे चंद्रगुप्तावर पूर्वींच प्रेम करणारी प्रजा आतां दुप्पट प्रेम करूं लागतील.

रा०—मलयकेतू, तसें नाहीं. कुसुमपुरांत प्रजा दोन प्रकारच्या आहेत. एक चंद्रगुप्ता बरोबर उदयास आलेल्या, आणि दुसऱ्या, नंदकुलावर प्रेम करणाऱ्या. त्यामध्यें चंद्रगुप्ता बरोबर ज्या उदयाला आल्या आहेत त्यांच्याच नाखुषीला कारण चाणक्य आहे, नंदकुलावर अनुरक्त असलेल्यांच्या नाहीं. या दुसऱ्या प्रकारच्या ज्या प्रजा आहेत त्या, यानें नंदकुलाचा उच्छेद केला ह्मणून याच्यावर संतापलेल्या आहेत. पण त्यांना दुसरा आधार कोठें नाहीं ह्मणूनच केवळ चंद्रगुप्ताचा आश्रय धरून राहिल्या आहेत. त्यांना जर चंद्रगुप्ताचा नाश करण्यास तयार असा कोणी तुझ्यासारखा मिळाला तर त्या ताबडतोब चंद्रगुप्ताला सोडून त्याचा आश्रय धरतील. आणि याचें प्रत्यंतर प्रत्यक्ष आह्मीच.

म०—अमात्य, चंद्रगुप्तावर स्वारी करण्याला एक सचिवभेद हेंच व्यंग आहे कीं आणखीं आहेत?

रा०—मलयकेतू, आणखीं पुष्कळ व्यंगें आहेत. पण काय करायचीं आहेत? सगळयांत मुख्य व्यंग हेंच.

म०—कसें बरें मुख्य? चाणक्याला काढल्यावर चंद्रगुप्त स्वतः कारभार करून किंवा दुसऱ्या सचिवावर कारभार सोंपवून काम करूं शकणार नाहीं काय?

रा०—अलबत् नाहीं.

म०—कां बरें?

रा०—जेथें राजे स्वतः काम पाहतात किंवा जेथें राजे आणि प्रधान मिळून काम पाहतात, तेथें हें संभवतें. पण चंद्रगुप्ताचे ठिकाणीं हें संभवत नाहीं. हा दुष्ट चंद्रगुप्त निवळ सचिवाच्या तंत्रानें चालणारा आहे. सचिव नसला ह्मणजे तो केवळ आंधळाच. तेव्हां त्याच्यानें ही गोष्ट कशी होईल? केवळ सचिवावरच भार टाकणारे जे आहेत त्यांना सचिवापासून दूर करणें ह्मणजे दूधपिल्या मुलाला आईच्या स्तनापासून ओढण्या प्रमाणेंच आहे. त्याची मग बिचाऱ्याची कठीण अवस्था होते.

म०—(आपल्याशीं) मी सचिवाच्या तंत्रानें चालणारा नाहीं हें एक बरें आहे. (उघड) अमात्य, पुष्कळ कारणें असतांना तीं झिट्कारून केवळ सचिवभेदच कारण धरून शत्रूवर स्वारी केल्यानें, जय खात्रीनेंच मिळेल असें वाटत नाहीं.

रा०—मलयकेतू, जय खात्रीनें मिळेल. पहा, आपलें सैन्य उत्तम; अग्रणी तूं; कुसुमपुर नंदावर अनुरक्त; चाणक्य अधिकारभ्रष्ट; चंद्रगुप्त राजा नवीन; आणि माझ्या स्वाधीन–पण माझें काम इतकेंच कीं तुह्माला मार्ग दाखवावयाचा–; एवढी अनुकूलता असल्यावर मग कार्यसिद्धीमध्यें आणि तुझ्यामध्यें फक्त तुझी इच्छाच आड.

म०—अमात्य, तर मग स्वारी करण्याला ही उत्तम संधी आहे असें जर आपणाला वाटत असेल, तर मग उशीर कां? ज्याप्रमाणें मेघमाला विंध्यपर्वताला वेढा घालते तसेंच माझे हत्ती कुसुमपुराला वेढा घालोत, आणि शत्रूचा समूळ मोड करून शोण नदींत विहार करून यथेच्छ जलपान करोत. (भागुरायणासह निघून जातो)

रा०—कोण आहे रे तिकडे?

पुरुष— (येऊन) काय आज्ञा?

रा०—प्रियंवदका, पहा बरें बाहेर कोणी ज्योतिषी असेल तर.

पु०—आज्ञा. (जातो व पुनः येऊन) अमात्य, हा ज्योतिषी क्षपणक–

रा०—(अपशकुन झालासें दाखवून आपल्याशीं) पहिल्याप्रथमच क्षपणकाचें दर्शन!

पु०—जीवसिद्धी.

रा०—त्याला चांगला पोषाक देऊन इकडे आण.

पु०—आज्ञा. (जातो व क्षपणक येतो)

क्ष०—मोहव्याधीचे वैद्य जे आहेत त्यांची आज्ञा पाळीत जा बरें! ते औषध देतात तें कडू असतें पण त्याचा परिणाम फार गोड होतो. (येऊन) उपासकाला धर्मलाभ होवो.

रा०—ज्योतिषी बुवा, आह्माला प्रस्थानाला योग्य दिवस पहा बरें!

क्ष०—(विचार करून) उपासका, मुहूर्त पाहिला. मध्यान्हानंतर सात कलांनीं पौर्णिमा लागते ती संपूर्ण चंद्रतिथी उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणाराला फार उत्तम. नक्षत्रही त्यावेळेस दक्षिणद्वाराबरच पडलें आहे.

अस्ताभिमुखे सूरे, उदिते संपूर्ण मंडले चंद्रे.
गमनं बुधस्य लग्ने, उदितास्तमितेच केतौ.

रा०—ज्योतिषी बुवा, ही तिथीच शुद्ध दिसत नाहीं.

क्ष०—उपासका,

एकगुणा भवति तिथिश्चतुर्गुणं भवति नक्षत्रम् ॥
चतुषष्टिगुणं लग्नं एतत् दृश्यते ज्योतिषसिद्धांते ॥

आणखी.

लग्नं भवति सुलग्नं, क्रूरग्रहं परिहर आशु ।
प्राप्नुहि दीर्घलाभं चंद्रस्य बलेन गच्छन् ॥

रा०—ज्योतिषी बुवा, आणखी इतर ज्योतिषांनांही विचारून पहा

क्ष०—तूंच विचार तुला वाटेल तर. मी चाललों.

रा०—ज्योतिषी बुवा, रागावलां तर नाहीं ना ?

क्ष०—ज्योतिषीबुवा नाहीं रागावला ?

रा०—मग कोण रागावला ?

क्ष०—(आपल्याशीं) भगवान् कृतांत रागावला तुझ्यावर. कारण तूं आपला पक्ष सोडून दुसऱ्याचा पक्ष धरतोस ! (जातो).

रा०—प्रियंवदका, वेळ कोणती आहे पहा बरें ?

पु०—आज्ञा. (जाऊन पुनः येऊन) सूर्य नारायण अस्तास जात आहे.

रा०—काय? सूर्यनारायण अस्तास चालला आहे? खरेंच, जीं बगीच्यांतलीं झाडें, सूर्य उदयगिरीवर आला असतांनाच, त्याच्यावर जणुं काय अनुरक्त होऊन छायारूपानें हळूं हळूं त्याच्याकडे धांवत होतीं, तींच झाडें आतां तोच सूर्य, पश्चिम दिशेकडे वळल्या बरोबर त्याच्यापासून परत फिरलीं. खरोखर विपत्ती आली ह्मणजे चाकरलोक मालकाला असेच सोडीत असतात ! (जातो).

अंक चवथा समाप्त.

अंक ५ वा.

(पत्र व दागिन्याची एक पेटी घेऊन सिद्धार्थक येतो)

सि०—आज काय मजा हाय बगा! बुद्वी हाय पानी; आणि स्थळ आणि येळ ह्य हायती घागरी. ह्या घागरी मंदी त्य पानी घालूनशान् चानुक्य महाराजांनं ज्ये येलीला आजपावंतं वाढविलं, त्ये येलीला आज लइ नामी फळ येनार हाय बगा. चानुक्य महाराजाच्या आज्ञेप-रमान मी ह्य पत्तर तर घेतलया. येच्यावर अमात्य रा-खुसाचा शिक्का हाय. अन् ह्य पेटीबी घेतलीया. आतां कुसुमपुरास जायास्नी निघालुया. (पाहून) अर, हा ख-पनक येतुया मोहरून. ह्यो सकुन चांगला न्हाय. तव्हा थोडा येळ बसूनशान जावं. पण ज्ये कामा-पायीं मी निघालुया त्येल असच सकून चांगल. त-व्हा बसायच कांहीं कारण न्हाइ. चलावं. (क्षपणक येतो).

क्ष०—आपल्या गंभीर बुद्धीमुळें व लोकांच्या मार्गाहून

यांचे मार्ग निराळे असल्यामुळें जे सिद्धीला त्वरित पावतात असे जे अर्हत त्यांना माझा नमस्कार असो.

सि०—जोसी बुवा, मी नमस्कार करतुया तुह्मास्नी.

क्ष०—उपासका, तुला धर्मलाभ होवो. (पाहून) उपासका, बराच लांबचा पल्ला गांठण्याचा तुझा निश्चय दिसतो.

सि०—जोशी बुवानं कसं वळखलं?

क्ष०—उपासका यांत काय आहे? तुझ्या हातांतील पत्र आणि तुला झालेला शकुन याच्यावरूनच हें कळतें.

सि०—जोशीबुवांनीं बराबर वळखलया. मी दुसऱ्या देशास जायास निघालुया. तर आजचा दीस कसा हाय?

क्ष०—(हांसून) उपासका, हजामत झाल्यावर मग हजामतीला दिवस पहावयाचा काय?

सि०—जोसीबुवा, आतांभी काय झालंया? दीस चांगला असल तर जाईन, न्हाइतर परतून जाईन.

क्ष०—हल्ली मलयकेतूच्या छावणींतून बाहेर जायला कोणालाच दिवस चांगला नाहीं.

सि०—असं कशापायीं?

क्ष०—उपासका, ऐक. पूर्वी मलयकेतूच्या छावणीमधून जाण्यायेण्याला कोणालाच आडकाठी नव्हती. आतां हे कुसुमपुरच्या जवळ येऊन ठेपले, तेव्हां आतां भागुरायणाच्या मोर्तबाचा परवाना असल्याशिवाय कोणालाच जाऊं देत नाहींत. तेव्हां तुला जर तसा परवाना मिळाला असेल तर मग तूं खुशाल जा. नसेल तर गुपचिप् परत फिर. नाहीं तर पाहऱ्यावरचे शिपाई हातपाय बांधून तुला राजाकडे घेऊन जातील.

सि०—जोसीबुवा, आपनास्नी ठाव न्हाय जनु, कीं मी अमात्य राखसाच चाकर हाय? मला सिद्धार्थकाला परवाना कशापायी हवं? मला भाहिर जाण्याला कोन मनाई करतुया?

क्ष०—तूं राक्षसाचा मनुष्य अस, कीं पिशाच्चाचा मनुष्य अस. परवान्याशिवाय बाहेर जाण्याला मार्गच नाहीं.

सि०—जोसीबुवा, रागावूं नग. तुमी मला तुझं काम फत्त होवो असं असरवाद द्या कीं.

क्ष०—उपासका, जा तुझी कार्यसिद्धी होईल. मीहि कुसुमपुरास जाण्याकरितां भागुरायणास परवाना मागतों. (जातात). (एक पुरुष बरोबर आहे असा भागुरायण येतो).

भा०—(आपल्याशीं) आर्य चाणक्याचें कारस्थान किती विचित्र आणि आश्चर्यकारक आहे? कधीं याचा हेतु काय आहे तो स्पष्ट दिसतो, आणि कधीं तो इतका खोल असतो कीं कितीहि विचार केला तरी लक्षांत येत नाहीं. कधीं हें कारस्थान मनाप्रमाणें जुळून आलें असें दिसतें; आणि कधीं हें साफ फसल्यासारखें वाटतें. कधीं वाटतें यांतलें जें बीज होतें तें बुडालें; व कधीं त्या बीजाचा प्रचंड वृक्ष होऊन त्याला फळें आल्यासारखें दिसतें. अशा प्रकारच्या राजकारस्थानीं पुरुषाच्या कल्पनेची गती दैवाच्यागती प्रमाणें विचित्र आहे असें ह्मणावें लागतें. (उघड) भासुरका, महाराजांची अशी इच्छा आहे कीं मी

त्यांच्यापासून दूर असूं नये, ह्मणून माझें आसन जवळच दरबारच्या तंबूजवळ घाल.

पु०—आज्ञा. (आसन घालून) हें आसन घातलें आहे. यावर बसावें.

भा०—(बसून) भासुरका, कोणी जर परवाना घेण्याकारितां आला तर त्याला आंत घेऊन ये.

पु०—आज्ञा. (जातो)

भा०—(आपल्याशीं) माझ्यावर अशा तऱ्हेचें प्रेम करणाऱ्या मलयकेतूला मी फसविणें ह्मणजे किती दुःखाची गोष्ट आहे? आणखी ह्मणूनच मला ती कठीण वाटते. पण आतां हा विचार कशाला? एकदा द्रव्यलोभास्तव हें क्षणभंगुर शरीर विकलें ह्मणजें मग विकणारानें आपलें कुल, लाज, मान, अपमान कीर्ति याबद्दलचे सर्व विचार सोडले पाहिजेत. अशा रीतीनें परतंत्र झालेल्या मनुष्यानें हा हुकूम योग्य आहे कीं अयोग्य आहे याचा विचार करून तरी काय उपयोग? (प्रतिहारीसहित मलयकेतु येतो)

म०—(आपल्याशीं) राक्षससंबंधानें अनेक संशय येत असल्यामुळें मन कसें गोंधळून गेलें आहे! कोणत्याच गोष्टीचा ह्मणून निश्चय होत नाहीं. हा राक्षस नंद-कुलाचा वंशपरंपरेचा अमात्य आहे. आणि चंद्रगुप्त झाला तरी नंद कुळांतलाच. आणि त्यांतून आतां तर चंद्रगुप्तानें चाणक्याला कामावरून दूर केलें आहे. तर हा काय चंद्रगुप्ताला मिळेल, किंवा मला वचन दिल्याप्रमाणें माझ्याशींच मिळून राहील, याच्याविषयीं कांहींच निश्चय होत नाहीं. यामुळें माझें मन कुंभा-राच्या चाकावर बसल्याप्रमाणें एकसारखें फिरत आहे. (उघड) विजये, भागुरायण कोठें आहे?

प्र०—महाराज, सैन्यांतून बाहेर जाणारांनां परवांना देत आहेत.

म०—विजये, क्षणभर पाऊल वाजूं देऊं नकोस. मी त्याचे मागून जाऊन डोळे झांकतों.

प्र०—आज्ञा.

पु०—(येऊन भागुरायणास) हा क्षपणक परवाना मा-गण्यासाठीं आला आहे.

भा०—त्याला घेऊन ये. (पुरुष जातो व क्षपणकासह येतो)

क्ष०—उपासकाला धर्म लाभ होवो.

भा०—(पाहून आपल्याशीं) अरे हा राक्षसाचा मित्र जीवसिद्धी. (उघड) ज्योतिषीबुवा, राक्षसाच्या कामाकरितांच जात आहां काय?

क्ष०—(कानावर हात ठेऊन) छे छे उपासका, मी अशा ठिकाणीं जात आहे कीं जेथें राक्षसाचें किंवा पिशाच्चाचें नांव सुद्धां ऐकूं येणार नाहीं.

भा०—ज्योतिषीबुवा, मित्रावर फार रागावलां आपण. राक्षसानें आपला काय अपराध केला?

क्ष०—माझा काय अपराध करणार तो? माझेंच नशीब फुटकें ह्मणून मी आपल्या कर्माला लाजतों आहें!

भा०—ह्मणजे? मोठेंच आश्चर्य वाटतें?

म०—मलाहि आश्चर्य वाटतें.

भा०—ज्योतिषिबुवा स्पष्ट सांगा.

क्ष०—न ऐकण्यासारखी गोष्ट ऐकून फायदा काय?

भा०—गुप्त असेल तर राहूं द्या.

क्ष०—उपासका, गुप्त नाहीं पण अत्यंत कठोर आहे.

भा०—तर मग सांगाच.

क्ष०—उपासका, गुप्त नाहीं पण मी सांगत नाहीं.

भा०—तर मग मीहि परवाना देत नाहीं.

क्ष०—(आपल्याशीं) आतां याला सांगायची वेळ आली. (उघड) बरें बुवा, निरुपाय आहे. सांगतों. मी पूर्वीं कुसुमपुरांत राहत होतों. तेव्हां दुर्दैवानें माझी राक्षसाची मैत्री झाली. त्या वेळेस राक्षसानें गुप्तरीतीनें विषकन्या पाठवून महाराज पर्वतेश्वराला मारविलें.

म०—(सबाष्प आपल्याशीं) काय? राक्षसानें बाबाला मारविलें? चाणक्यानें नाहीं?

भा०—ज्योतिषीबुवा मग पुढें?

क्ष०—नंतर मी राक्षसाचा मित्र ह्मणून मला दुष्ट चाणक्यानें नगरांतून काढून दिलें. आतांहि राक्षसाची कृती अशी आहे कीं त्याच्या योगानें मला जगांतूनच उठून जाण्याची पाळी येणार आहे.

भा०—ज्योतिषीबुवा, वचन दिल्याप्रमाणें अर्धे राज्य पर्वतेश्वराला द्यावें लागणार, तें टाळण्याकरितां दुष्ट चाणक्यानें त्याला मारिलें, असें आह्मीं ऐकिलें.

क्ष०—छे! छे! छे! चाणक्याला बिचाऱ्याला त्या विषकन्येचें नांवहि माहीत नाहीं. याच दुष्ट राक्षसानें हें घोर कार्य केलें.

भा०—ज्योतिषीबुवा, बरें तर, परवाना मग देईन. अगोदर चला, आपण ही गोष्ट महाराजांना सांगू.

म०—(एकदम येऊन) ऐकिली, मित्रा, हृदय फोडून तुकडे करणारी गोष्ट ऐकिली. ती ऐकिल्यामुळें तातांच्या मरणाबद्दल मला दुप्पट वाईट वाटत आहे.

क्ष०—(आपल्याशीं) हां, ह्या कारट्यानें ऐकिलें माझें भाषण. आतां माझें काम झालें. (जातो).

म०—(वर पाहून दुःखानें) राक्षसा! तुला हें योग्य आहे काय? ज्यानें तुला मित्र समजून सर्व प्रकारें तुझ्यावर भार टाकिला, त्या माझ्या ताताला मारून तूं आमच्या सर्व बंधु वर्गाच्या डोळ्यांतून पाणी काढिलेंस!

खरोखर तुझ्या नांवाप्रमाणेंच तुझी करणीहि राक्षसीच आहे.

भा०—(आपल्याशीं) राक्षसाचा जीव राखावा अशी आर्य चाणक्याची आज्ञा आहे. तेव्हां आतां असें केलें पाहिजे. (उघड) महाराज, शोक पुरे. आपण आसनावर बसाल तर आपणाला कांहीं सांगावयाचें आहे.

म०—(बसून) सांग, मित्रा, काय सांगावयाचें आहे तें.

भा०—महाराज, राजकारस्थानी पुरुष जे आहेत ते शत्रू मित्र, आणि उदासीन असे जे लोकांचे तीन भेद करितात ते कारणामुळें करितात; इतर लोकांप्रमाणें मनास वाटेल तसे करीत नाहींत. याप्रमाणें पाहिलें, ह्मणजे राक्षसानें केलें हें फार वाईट केलें, असें मला वाटत नाहीं. कारण, त्या वेळस सर्वार्थसिद्धीला राज्यावर बसवावें, ही इच्छा राक्षसाची. पण तसें घडून आणण्याला चंद्रगुप्तापेक्षांही पर्वतेश्वराची त्याला फार भीति होती. ह्मणून त्यानें तसें केलें. या राजनीतीमुळें शत्रूचे मित्र होतात व मित्राचे शत्रू होतात; आणि अशा रीतीनें

या एकाच जन्मांत अनेक जन्म होतात. ह्मणून राक्षसाकडे याचा फारसा दोष नाहीं. आपण नंदराज्य प्राप्त होईपर्यंत त्याच्या सल्लयानें चालावें आणि नंतर मग वाटेल तर त्याला ठेवावें नाहींतर हांकलून द्यावें.

म०—असेंच करणें ठीक. नाहींतर त्याचा वध केल्यानें लोक आताच आमच्यावर बिघडतील. आणि मग आपल्याला जयाची वानवाच.

पुरुष०—(येऊन) महाराजांचा जयजयकार असो. बिनीचा अधिकारी दीर्घचक्षू याची महाराजांना अशी विनंती आहे कां आह्मी एक पुरुष परवाना न घेतांना, पत्र घेऊन छावणींतून जात होता त्याला पकडून आणिला आहे. व त्याला महाराजाकडे पाठविला आहे. त्याची महाराजांनीं चौकशी करावी.

भा०—त्याला घेऊन ये.

पु०—आज्ञा. (जातो व हात बांधलेल्या सिद्धार्थकासह येतो)

सि०—(आपल्याशीं)गुनानं खूस होणार, आनू दोसा-

पासूनशान् माग फिरवनार, अशा या आमच स्वामीभगतीला मी नमस्कार करतुया.

पु०—महाराज, हाचतो पुरुष.

भा०—(पाहून)कायरे, तूं नवीनच आहेस कीं इथेंच कोणाचा आश्रित आहेस ?

सि०—मी अमात्यराखुसाचा चाकुर हाय.

भा०—तर मग गड्या, परवाना न घेतां छावणींतून कां चाललां होतास ?

सि०—म्हाराज, काम लई बेगीचं व्हतं बघा.

भा०—असें कोणतेंरे तें काम, कीं ज्याच्या योगानें तुला राजाची सुद्धां आज्ञा पाळायला फुरसत नाहीं ?

म०—मित्रा भागुरायणा, तें पत्र घे.

सि०—(भागुरायणास पत्र देतों)

भा०—(पत्र पाहून)महाराज यावर राक्षसाच्या नांवाचा शिक्का दिसतो !

म०—शिक्का बचावून पत्र उघडून मला दाखव. (भागुरायण तसें करतो)

म०—(पत्र वाचतो) स्वस्तिश्री. कोणासतरी कोठेंतरी, कोणीतरी असें कळवितात कीं आमच्या शत्रूला काढून टाकून तुह्मीं आपलें वचन पाळलें यावरून तुमचा सत्यवादीपणा स्पष्ट झाला. याचप्रमाणें दुसरे आमचे स्नेही आहेत त्यांनाही दिलेलें वचन पाळाल अशी आमची खात्री आहे. त्यांच्यावर आपण उपकार केला असतां ते सध्यां ज्यांच्या आश्रयाला आहेत त्यांचा नाशकरून आपल्या आश्रयाला राहतील. या गोष्टीचें आपणाला स्मरण असेलच, तथापि पुन्हां सूचनार्थं लिहितों. त्यापैकीं कित्येक शत्रूचा खजीना मिळावा अशी इच्छा करितात; कोणी शत्रूला चांगली शिक्षा व्हावी एवढेंच इच्छितात; व कोणी शत्रूच्या राज्याची इच्छा करितात. आह्माला जे तीन अलंकार पाठविले ते पावले. थैली रिकामी नसावी ह्मणून आह्मींहि कांहीं यत्किंचित् पाठविलें आहे त्याचा स्वीकार करावा. तोंडी निरोप पाठविला आहे तो या विश्वासू सिद्धार्थकापासून ऐकून घ्यावा. (भागुरायणास) मित्रा, भागुरायणा, काय बरें असेल या पत्राचा अर्थ?

भा०—सिद्धार्थका, कोणाचें पत्र हें ?

सि०—मला ठाव न्हाइ म्हाराज.

भा०—अरे लुच्चा, पत्र नेतोस आणि कुणाचें हें माहीत नाहीं ह्मणतोस ? बरें, तोंडी निरोप तुझ्यापासून कोणीं ऐकावयाचा ?

सि०—[भितीनें] तुह्मीं.

भा०—काय, आह्मीं ?

सि०—तुह्मीं मला पकडलं हाय, तवा मी काय बोलतुया येचं मला बिलकुल भानच न्हाई.

भा०—(रागावून) आतां तुला भानावर आणतों. भासुरका, याला बाहेर घेऊन जा, आणि हा सर्व सांगे पर्यंत याला कोरडे मार.

पु०—आज्ञा. (त्याला घेऊन जातो, व पुन्हा येऊन) महाराज, आह्मी त्याला मारीत असतांना त्याच्या काखेंतून ही अलंकाराची पेटी पडली. इच्यावरहि राक्षसाच्या नांवाचा शिक्का आहे.

भा०—(पाहून महाराज, इच्यावरही राक्षसाचा शिक्का आहे!

म०—थैली खालीं नसावी ह्मणून जें यत्किंचित् पाठविलें, तें हेंच बरें! शिक्का बचावून पेटी उघड बरें. (भागुरायण तसें करतो)

म०—(अलंकार पाहून) अरे, मी आपल्या अंगावरून काढून राक्षसाला पाठविलें होतें तेच हे अलंकार. हें चंद्रगुप्तालाच पत्र आहे खास.

भा०—महाराज, आतां याचें निराकरण होईल. गड्या, त्याला पुन्हां कोरडे मारा.

पु०—आज्ञा. (जातो व पुन्हा येऊन) त्याला आह्मी खूप कोरडे मारले तेव्हां तो ह्मणतो मी स्वतः महाराजाजवळ सांगतों ह्मणून.

म०—त्याला घेऊन ये.

पु०—आज्ञा. (जातो व सिद्धार्थकासह येतो.)

सि०—(पाय. पडून) ह्माराजांनीं मला अभय द्यावं.

म०—अरे तूं दुसऱ्याचा अंकित. तेव्हां तुला अभयच आहे. तेव्हां सांग सगळें.

सि०—ऐकावं म्हाराजांनीं. मला अमात्यराखुसानं चंदरगुपताकड ह्य पत्तर घेऊनशान् पाठविल हाय.

म०—तोंडी निरोप कोणता आहे तो सांग.

सि०—अमात्यराखुसाच अस निरोप हाय, कीं आमच ज्य पांच राज मितर हायती, कीं कुलुत देशाचा राज चितरवर्मा, मलयदेशाच राज सिंहनाद, कासमीर देशाच राज पोखराक्श, सिंधुदेशाच राज सिंधुसेन, आणि पारसीकांच राज मेघाक्श, येंच्यापैकीं पहिल ज्य राज तीन हायती त्येस्नी मलयकेतूच राज्य हवं, आन् ज्य बाकीच दोघ हायती त्येस्नी मलयकेतूच हत्ती आन् खजिना लागतुया.

म०—काय! चित्रवर्मादिक सुद्धां माझ्याशीं वैर करितात! म्हणूनच, यांची राक्षसाचे ठिकाणीं इतकी भक्ती आहे. (उघड) विजये, अमात्यराक्षसांनां बोलाव.

प्र०—आज्ञा. (जाते)

(आसनावर अमात्यराक्षस बसला आहे, जवळ एक पुरुष आहे, असा प्रवेश)

रा०—(आपल्याशीं) चंद्रगुप्ताकडचे लोक आमच्या सैन्यांत फार आले हें कांहीं बरें नाहीं. कारण, जें सैन्य आपला पक्ष बळकट धरून शत्रूच्या पक्षाला बिलकुल मिळालेलें नसतें, अशा सैन्याच्या साह्यानेंच मालकाला यशःप्राप्ती होते. पण जें सैन्य दोन्ही पक्षांला मिळालें असतें किंवा जें दोन्ही पक्षांविषयीं उदासीन असतें, अशा सैन्याचें साह्य घेतलें कीं मालक खात्रीनें पकडला जातो. (विचारकरून) अथवा, हे लोक चंद्रगुप्तावर नाराज कां झाले व केव्हां झाले हें आपणाला माहीत आहे. तेव्हां त्यांच्यासंबंधानें शंका घेणें रास्त नाहीं. (उघड) प्रियंवदका, कुमाराच्या अनुयायी राजांना माझा निरोप सांग, कीं दिवसेंदिवस कुसुमपुरजवळ येत चाललें आहे. तेव्हां तुह्मी रस्त्यानें जात असतां, मी सांगतों या मिसलीनें चलावें. सर्वांच्या पुढें मी. माझ्यामागून खस व मगध यांनीं आपल्या सैन्याचा व्यूह रचून चलावें. यवनराजांच्या सैन्यासहवर्तमान गांधारांनीं सैन्याचा मध्य भाग धरावा. सर्वांच्या मागून चेदि आणि हूण यांच्यासहवर्तमान शकदेशांतील राजांनीं चलावें. व चित्रवर्मादिक बाकींच्या राजांनीं कुमाराच्या भोंवतीं असावें.

पुरुष०—आज्ञा. (जातो)

प्रतिहारी—(येऊन) अमात्यांचा जयजयकार असो. महाराजांना आपल्या दर्शनाची इच्छा आहे.

रा०—जरा थांब. कोण आहेरे तिकडे ?

पु०—आज्ञा.

रा०—शकटदासाला सांग, कीं कुमारानें आपणाला घालण्याकरितां अलंकार पाठविले आहेत, तेव्हां आतां अलंकार न घालतांना त्याच्या भेटीला जाणें कांहीं रास्त होणार नाहीं. करितां परवां जे तीन अलंकार विकत घेतले आहेत त्यांतला एक अलंकार पाठीव, ह्मणजे तो घालून मी कुमाराच्या भेटीला जाईन.

पु०—आज्ञा. (जातो व येऊन) महाराज हा अलंकार.

रा०—(अलंकार घालून) विजये, मलयकेतू कुठें आहे तो मार्ग दाखीव.

प्र०—असें यावें अमात्यांनीं.

रा०—(आपल्याशीं) चाकरी ह्मटली ह्मणजे निर्दोष पुरुषाला सुद्धां भय उत्पन्न करिते. क्षणोक्षणीं त्याला

असें वाटतें कीं आपणावर कोणत्यावेळेस काय किटाळ येईल कोण जाणें.

प्र०—(फिरून) अमात्य, हे पहा महाराज बसले आहेत. तर चलावें अमात्यांनीं.

रा०—(आपल्याशीं) अरे, हा मलयकेतू. हा पहा कसा पायाकडे एकसारखी निश्चल दृष्टि लावून बसला आहे! पण ती दृष्टि शून्य असल्यामुळें पायाकडे त्याचें लक्ष नाहीं. तसेंच, मोठमोठ्या कार्यांनीं जणूं काय नम्रच केला आहे असा हा मुखचंद्र यानें आपल्या हातावर टेंकला आहे. (जवळ) मलयकेतू, तुझा जयजयकार असो.

म०—अमात्य, अभिवादन करितों. आसनावर बसावें. (राक्षस बसतो)

म०—अमात्य, बरेच दिवस दर्शन न झाल्यामुळें मनाला बरें वाटत नव्हतें.

रा०—स्वारीची व्यवस्था करण्यांत गुंतलों असल्यामुळें तुझ्या ह्या अशा भाषणाला पात्र झालों.

म०—स्वारीची व्यवस्था कशी केली अमात्यांनीं?

रा०—स्वारीची व्यवस्था अशी केली कीं–("सर्वांच्या पुढें मी" येथून "भोंवतीं असावें" येथवर पान १२९ यांतील भाषण पुनः ह्मणतो).

म०—(आपल्याशीं) आं ! जे माझा नाश करून चंद्रगुप्ताची प्रीति संपादन करणार, त्यांना माझ्या भोंवतीं ठेवलें काय ? बरें. (उघड) अमात्य कुसुमपुराला जाणारा किंवा तिकडून येणारा कोणी आहे काय ?

रा०—मलयकेतू, जाण्या येण्याचें कारण संपलें आतां. आतां पांच सहा दिवसांनीं आपणच तिकडे जाऊं.

म०—(आपल्याशीं) असें काय ? (उघड) असें जर आहे तर मग अमात्यांनीं पत्र देऊन या मनुष्याला कुसुमपुराला कशाला पाठविलें ?

रा०—(पाहून) कोण ? सिद्धार्थक ? गड्या काय आहेरे हें ?

सि०—(डोळे पुसून भीतीनें) माफ करा ह्माराज. मला येनी लई मारलया, ह्मनूशान् माझ्याच्यान आपली गोष्ट गुपीत न्हाई ठेववलीया.

रा०—अरे कोणती गुप्त गोष्ट, तें मला कांहीं समजलें नाहीं.

सि०—म्हाराज, हात जोडूनशान् सांगतों बगा, कीं मला येनीं मारल.—(इतकेंच बोलून लाजून भीतीनें स्तब्ध होतो)

म०—भागुरायणा, मालका पुढें बोलायला हा भीतो, आणि लाजतो. तर तूंच सांग ती गुप्त गोष्ट अमात्यांना.

भा०—आज्ञा. अमात्यमहाराज, हा सांगतो कीं मला अमात्यराक्षसांनीं पत्र देऊन आणि तोंडी निरोप सांगून चंद्रगुप्ताकडे पाठविलें ह्मणून.

रा०—(आश्चर्यानें) कायरे सिद्धार्थका, खरें आहे हें?

सि०—येनी मला मारल ह्मूनशान् मी सांगितल्या.

रा०—मलयकेतू, खोटी गोष्ट आहे ही. मनुष्यानें मार खाल्ला ह्मणजे तो वाटेल तें बोलेल.

म०—भागुरायणा, पत्र दाखीव. तोंडी निरोप हा त्यांचा मनुष्यच सांगेल.

भा०—अमात्यमहाराज, हें पत्र. (पत्र देतो)

रा०—(पत्र वाचून) मलयकेतु, हें शत्रूचें कपट बरें!

म०—थैली रिकामी नसावी ह्मणून अमात्यांनीं हा अलंकार पाठविला आहे. तर हें पत्र खोटें कसें असेल?

रा०—(अलंकार पाहून) मलयकेतु, हा मीं नाहीं पाठविला. हा अलंकार तूंच मला दिला, आणि मीं चांगल्या कामाबद्दल सिद्धार्थकाला बक्षीस दिला.

भा०—अमात्य महाराज, आपल्या अंगावरचा अलंकार महाराजांनीं तुह्माला दिला, त्याचा असा उपयोग करावयाचा काय?

म०—तोंडी निरोप विश्वासू सिद्धार्थकापासून ऐकावा असें अमात्यांनीं लिहिलें आहे.

रा०—कशाचा तोंडी निरोप? पत्र कोणाचें? हें कांहीं मला माहीत नाहीं.

म०—तर मग हा शिक्का कोणाचा?

रा०—मलयकेतु, लबाड लोकांना खोटे शिक्के बनवितां येतात.

भा०—महाराज, अमात्यांचें ह्मणणें बरोबर आहे. गड्या, सिद्धार्थका, हें पत्र कोणीं लिहिलें?

(सिद्धार्थक राक्षसाच्या तोंडाकडे पाहून गुपचिप् बसतो).

भा०—हें पहा, पुन्हा मार खाऊं नकोस.

सि—शकुटदासानं.

रा०—शकटदासानें जर लिहिलें असेल तर मग मींच लिहिलें ह्मणावयाचें !

म०—विजये, शकटदासाला आण.

प्र०—आज्ञा.

भा०—(आपल्याशीं) अरेरे ! हें चुकलें. आर्य चाणक्याचे दूत असें भलतेंच बोलावयाचें नाहींत. आतां जर शकटदास आला, आणि त्यानें खरें खरें सांगितलें कीं सिद्धार्थकानें हें पत्र लिहविलें ह्मणून, तर काम फसेल. तर आतां असेंच केलें पाहिजे. (उघड) महाराज, अमात्यराक्षससमोर शकटदास मी हें पत्र लिहिलें ह्मणून कबूल करणार नाहीं. तर त्याच्या हातचीं आणखीं लिहिलेलीं पत्रें आणवावींत ह्मणजे त्यावरूनच सर्व निकाल होईल.

म०—विजये, असेंच कर.

भा०—आणि अमात्यांचा शिक्काहि आणवावा.

म०—विजये, दोन्ही कर.

प्र०—आज्ञा. (जाऊन पुन्हा येऊन) महाराज, हा शिक्का आणि हीं पत्रें.

म०—(सिद्धार्थकाजवळचें पत्र आणि प्रतिहारीनें आणिलेलीं पत्रें जुळवून पाहून) अमात्य, अक्षर तर बरोबर जुळतें.

रा०—(आपल्याशीं) अक्षर जुळतें, पण शकटदास माझा मित्र आहे हें जुळत नाहींना! तर काय हें शकटदासानें लिहिलें ह्मणावें? बायकापोरांकरितां काय तो स्वामिभक्ति विसरला असेल? (विचार करून) अथवा असेलही. हा शिक्का नेहमीं त्याच्याच हातांत राहणारा; सिद्धार्थक त्याचाच मित्र; आणि त्याच्या इतर पत्रांवरून हेंहि पत्र त्याच्याच हातचें दिसतें; यावरून या लबाड शकटदासानेंच शत्रूशीं मिळून आपल्या प्राणाकरितां हें दुष्ट काम केलें यांत संशय नाहीं.

म०---(राक्षसाच्या अंगावरील अंलकार पाहून) अमात्य, आपण, तीन अलंकार पाठविले ते पोंहचले, ह्मणून जें पत्रांत लिहिलें आहे, त्यांतलाच हा एक अलंकार काय? (निरखून पाहून आपल्याशीं) अरे, हा अलंकार पूर्वी बाबा घालीत होते! (उघड) अमात्य, हा अलंकार कोठून आणला ?

रा०---व्यापाऱ्यापासून विकत घेतला.

म०---विजये, हा अलंकार ओळखीचा आहे?

प्र०---(पाहून डोळयांत पाणी आणून) महाराज, कसा ओळखीचा नसेल? हा अलंकार महाराज पर्वतेश्वर पूर्वी घालीत होते.

म०---(डोळयांत पाणी आणून) हा तात! नक्षत्रांनीं जसा चंद्र शोभावा तसा तूं या अलंकारांनीं शोभत होतास.

रा०---(आपल्याशीं) काय? पर्वतेश्वराचीं आभरणें हीं? (उघड) तर मग चाणक्याच्याच दूतानें व्यापाऱ्याचा वेष घेऊन आह्मांला हीं आभरणें विकलीं खास.

म०—अमात्य, तातांनीं पूर्वीं धारण केलेलीं, आणि चंद्रगुप्ताजवळ असलेलीं, हीं आभरणें व्यापाऱ्यापासून विकत मिळालीं हें जुळत नाहीं. अथवा जुळतेंहि. कारण, चंद्रगुप्त व्यापारी, त्यानें लाभाच्या आशेनें तुह्माला हे अलंकार विकले, आणि त्याची किंमत ह्मणून तुह्मी क्रूरपणानें माझा देह त्याच्या हातीं देणार.

रा०—(आपल्याशीं) हा कपट प्रयोग तर फारच नामी जुळला! काय करावें बरें आतां? पत्र माझें नाहीं ह्मणावें तर हें कांहीं उत्तर नव्हें; कारण यावर माझा शिक्का आहे. शकटानें विश्वासघात केला ह्मणावा तर तेंही खरें वाटत नाहीं. चंद्रगुप्त अलंकार विकावयास आला ह्मणावें, तर तें कोण खरें मानील? तर आतां कांहीं तरी गांवढळ उत्तर देण्यापेक्षां स्वस्थ बसणेंच चांगलें.

म०—आणखी मी आर्यांनां असें विचारतों.—

रा०—बाबा जो आर्य असेल त्याला विचार. आह्मी तर अनार्य ठरलों.

म०—चंद्रगुप्त आपल्या स्वामीचा मुलगा; आणि मी तु-

मची तावेदारी करणारा मित्रपुत्र. तेथें चंद्रगुप्त तुह्मांला पैसा देणार, आणि इथें तुह्माला वाटेल तें तुह्मीं मला देणार. तेथें सचिवपद ह्मणजे सत्कारपूर्वक तर खरीच पण चाकरीच, आणि इथें सचिवपद ह्मणजे पूर्ण मालकी. असें असतांना तेथें अमात्यांनीं जास्त फायदा कोणता पाहिला ?

रा०—मलयकेतू, तुझ्याच बोलण्यावरून निकाल होतो. चंद्रगुप्त माझ्या स्वामीचा मुलगा, आणि तूं माझी तावेदारीकरणारा मित्रपुत्र. तेथें चंद्रगुप्त मला पैसा देणार, आणि इथें मला वाटेल तें मीं तुला देणार. तेथें सचिवपद ह्मणजे सत्कारपूर्वक तर खरीच, पण चाकरीच, आणि इथें सचिवपद ह्मणजे पूर्ण मालकी. असें असतांना तेथें मी जास्त फायदा कोणता पाहिला? तूंच सांग बरें.

म०—(पत्रासुद्धां अलंकाराची पेटी दाखवून) आर्या, हें काय ?

रा०—दैवाची करणी ! आमचा सर्व तऱ्हेनें तिरस्काराला पात्र असा नौकरीचा पेषा असतांना ज्यांनीं,

आह्मी थोड्या बहुत केलेल्या नौकरीचा गौरव करून प्रेमानें आह्माला पोटच्या पोराप्रमाणें वागविलें, ते करारी आणि परीक्षक नंदराजे ज्या दुष्ट दैवानें विलयाला नेले, त्याच, प्रयत्न निष्फळ करणाऱ्या दुष्ट दैवाचा हा खेळ!

म०—(रागावून) काय ? अझून सुद्धां दैवाची करणी ह्मणून छपवाछपव चालविली आहेस ? कृतघ्ना, तुझ्या-वर पूर्ण भरवसा ठेवणाऱ्या माझ्या बापाला तीव्र विष-कन्या पाठवून तूंच मारविलेंस. आणि आतां दिमा-खानें आमची दिवाणगिरी पत्करून आमचे देह मा-सांच्या तुकड्या प्रमाणें शत्रूला विकावयाला निघाला आहेस काय ?

रा०—(आपल्याशीं) हा आणखी दुःखावर डाग. (उघड) हर हर हर हर! मलयकेतु, मी पर्वतेश्व-राकडे विषकन्या पाठविली नाहीं.

भ०—मग कोणीं पाठविली ?

रा०—दैवाला विचार.

म०—(रागानें) दैवाला विचार, आणि जीवसिद्धि क्षपणकाला नको!

रा०—(आपल्याशीं) जीवसिद्धी सुद्धां चाणक्याचा हेर! अरेरे! माझें काळीज सुद्धां शत्रूंनीं घेरलें?

म०—(रागानें), विजये, शिखरसेन सेनापतीला माझी आज्ञा सांग कीं जे हे पांच राजे राक्षसाचा स्नेह करून माझा द्रोह करितात व चंद्रगुप्ताची चाकरी करितात, त्यां पैकीं तिघे, चित्रवर्मा सिंहनाद आणि पुष्कराक्ष यांना माझें राज्य पाहिजे आहे, करितां जमिनींत एक खाडा खणून त्यांत त्यांना गाडून टाका. आणि बाकींचे जे दोघे सुषेण आणि मेघाक्ष, यांना माझे हत्ती व खजीना पाहिजे, तेव्हां त्यांना हत्तीच्याच पायीं बांधून ठार मारा.

प्र०—आज्ञा. (जाते)

म०—(रागानें) राक्षसा, राक्षसा, मी विश्वासघात करणारा राक्षस नाहीं, मलयकेतू आहे. तेव्हां तुला मोकळें सोडतों. तूं खुशाल जाऊन चंद्रगुप्तास मीळ. जसा एकाटा अन्याय, धर्म काम आणि मोक्ष या

तिघांनांहि नाहींसा करण्याला समर्थ आहे, तसा मी एकटा, तूं चाणक्य आणि चंद्रगुप्त या तिघांचाहि एकदम निःपात करण्याला समर्थ आहे.

भा०—महाराज, आतां ज्यास्त वेळ लावूं नये. कुसुमपुराला वेढा घालण्याला आपल्या लोकांना आतांच आज्ञा करावी. [दोघेहि जातात]

रा०—हर हर! धिःकार असो. ते बिचारे चित्रवर्मादिक मारले गेले नां! तर मी जे प्रयत्न करितों ते शत्रूला मारण्यासाठीं कीं मित्राला मारण्यासाठीं? आतां या हतभाग्यानें काय करावें? तपोवनांत जाऊं? पण नको. ज्यांत वैर शिरलें आहे असें हें मन तपानें शांत होणार नाहीं. महाराज नंद मेले तेव्हां आतां आपणाहि जीव द्यावा, आणि तो शत्रू जीवंत असतांनां, तर तें बायकांचें काम. हातांत तरवार घेऊन शत्रूच्या सैन्यावर तुटून पडावें? हां, हें ठीक होईल. पण त्यालाहि अडथळा आहेच. चंदनदासाला सोडविण्याविषयीं मन घोंटाळतें. (जातो)

पण

अंक पांचवा समाप्त.

अंक ६ वा.

(बक्षीस मिळाल्यामुळें आनंदित झालेला सिद्धार्थक येतो)

सि०—मेघापरमान् निळ, आन् केसी राकुसाला मारणार ज्यो केसव त्येला माझा नमस्कार. तसच चांगले लोकांच्या डोळ्यास्नी ज्यो चांदापरमान आनंद देतुया, त्या चंदरगुपत महाराजास्नी माझ नमस्कार. आन् फौजे त्रिगर ज्यो सत्रूला जिंकतोया त्या महाराज चानुक्याच्या कारस्थानाला माझा नमस्कार. असो. लई दीस झाल्याती, माझा जिगरदोस्त संमधारतक न्हाई भेटलया तव्हां त्येला भेटाव. (फिरून) आर ह्यो पहा, माझा दोस्त संमधारतक हकडच येतुया. तर त्येला सामुर जाव. (सिद्धार्थक येतो)

समि०—थंडगार वखद घेतल तरीबी ज्यो संतापच देतुया, आन् आनंदांतबी ज्येच्यापासून दुखच होतया, असा त्यो दोस्ताचा इरह लई तरास देतुया. माझ दोस्त सिधार्थक मलयेकतुच्या छावनीमधूनशान् हकड

लई वखत झालया आलाया ह्मून ऐकिलया. पन त्येची आद्याप गाठ पडत न्हाई! आता कुठं सोधावं! (फिरून) आर ह्यो सिद्धार्थक. दोस्ता, तुझ कुसल हायना.

सि०—काय, दोस्ता, संमद्या, हतच भेटलां? आर दोस्ता तुझबी ठीक हायना? (दोघे आलींगन देतांत)

स०—आर, माझं ठीक कस असल? तू हथ येऊनशान मला भेटला न्हाइस आन् माझ्याबरोबर गुपित गोष्टीबी केल्या न्हाइस आन तसाच दुसरीकड गेलास, तवा मला सुख कस व्हइल?

सि०—अर दोस्ता, रागावूं नग. म्या काय करावं? तकडून येऊनशान चाणक्याच्या भेटीला गेल्याबराबर, त्येनी मला लागलीच हुकूम केला कीं सिद्धार्थका, ह्यो वृत्तांत ह्माराज चंदरगुप्तास कळव ह्मून. तवा मी ह्यो वृत्तांत ह्माराजास्नी सांगूनशान् त्येच्यापासून बक्शीस घेऊनशान् असच तुला भेटन्याकरतां तुझ्या घराकडच निघालोया, तवा तूच हत भेटलास.

स०—कायर, ह्माराजास्नी तू काय सांगितल त्य मला,

ऐकन्यासारख असल तर सांगनांस ?

सि०—आर दोस्ता, तुला न सांगन्यासारख कांहीं असल काय ? ऐक. ह्माराज चानक्याच्या जुगतीन त्या दुवाड मलयकेतूची बुद्धी फिरलीया, आन् मग त्येन, राकुसास हाकलून देऊनशान्, त्य ज्य चितरवर्मा वगैरे पाच राज व्हत, त्येस्नी ठार मारलया. तवां ह्यो राजा फार दुवाड हाय ह्मूनशान् संमद त्येच्या सैन्यातल लोक भिऊनशान् पळालया, आन् आपापल देशास्नी गेलया. तवां मग भदरभट, पुरुसदत, हिंगुरात, बलगुपत, राजसेन, भागुरावेन, आणि रोहिताक्स येनी त्य मलयकेतुला कैद केलया.

स०—कार दोस्ता, त्य भदरभट वगैर लोक ह्माराजावर नाराज होऊनशान् मलयकेतुला मिळाल अस संमद लोक ह्मनत्याती. आन् ह्य कस झालया ?

सि०—आर ल्योका, दैवाचा रस्ता जस कोनास्बी दिसत न्हाई, तसच ह्य चानक्याची जुगत कोनास्बी गावत न्हाइ.

स०—बर मंग ?

सि०—तवा मग ह्माराज चानक्यानें उमद उमद फौज पाठवूनशान् शिलक ऱ्हायलेल त्येंच सैन्य व्हत, त्य आपल्या ताब्यामंदी घेतलया.

स०—पन दोस्ता, त्य राहू दे वाइच. पन मला अस सांग, कीं चानक्यान समद्या लोकासमक्श कारभार सोडला व्हता, मग पुन: त्येन त्योच कारभार कशा पायी घेतलया?

सि०—आर ल्योका तू लइ मूर्ख हायस. आर अमात राकुसासारख्यासनी जिचा ठाव न्हाइ लागलया, त्या ह्माराज चानक्याच्या जुगतीचा तू ठाव लावतुस व्हय?

स०—भार दोस्ता, आता त्यो अमात्य राकुस कुठ हा-य र?

सि०—त्यो त्या धांदलीमंदी मलयकेतुच्या छावनीमधूनशान् निघालया, आन् हत कुसुमपुरामंदी आलाया. त्येच्या माग ह्माराज चानक्याच उदुंबर नांवाच हेर हायच. त्येनं ह्य बातमी ह्माराजास्नी कळवलीया.

स०—कायर, नंदाच राज पुनः हत आनाव ह्मन तर खटपट त्य राकुसाची. तवा त्येची खटपट फसल्यावर हत त्यो आता कशापायी आलाया बरं?

सि०—आर, त्यो चंदनदासाकरतां आला असल बग.

स०—अर, खर, र, खर. बर कार, चंदनदास सुटल का र.

सि०—अर दोस्ता, आतां कसचा सुटतोय. त्येला घेऊनशान् सुळी देन्य.च्या जागीं जान्याचा आपना दोघास्नी हुकूम झालाया ह्मराज चानक्याचा.

स०—(रागावून) काय र, चानक्याला दुसर मानुस नव्हत कार? त्येन आपनास्नीच या हलक कामावर नेमलया?

सि०—आर, बाबा, तुला या पिरथ्वीवर कांहीं तरी दीस काढाचं हायेत का न्हाइत? जर कांहीं दीस काढायचे हायती, तर मग ह्मराज चानक्याच्या हुकुमापरमान केलच पाहिजे. तर चाल, आपुन मांगाचा सेंग घेऊनशान् त्येला सुळावर द्यायला नेऊं. (जातात)

(एक पुरुष दोरी घेऊन येतो).

पु०—शत्रूला बांधून टाकण्यांत जशी आर्य चाणक्याची

नीति हटकून विजयी होते, तशी राक्षसाला बांधण्यांत ही माझी दोरी हटकून विजयी होणार. कारण जशी ती संधीविग्रहादि सहा गुणांनीं दृढ केलेली असते, तसीच ही दोरीहि सहा पदरांनीं बळकट वळलेली आहे. आणि त्या नीतीच्या तोंडावर जशी सामदानादि उपायांची योजना असते, तशीच या दोरीच्याहि तोंडावर बळकट गांठीची योजना आहे. असो. (फिरून) आर्य चाणक्याच्या उदुंबर नांवाच्या हेरानें सांगितलेलें ठिकाण तर हेंच. आतां आर्य चाणक्याच्या आज्ञेप्रमाणें अमात्यराक्षसाला या ठिकाणीं शोधावयाचें. (पाहून) हा पहा, अमात्यराक्षस डोकीवरून पाघरूण घेऊन इकडेसच येत आहे. तेव्हां आतां या जीर्णोद्यानाच्या झाडाआड लपून पाहूं, हा कुठें बसतो, काय करतो, तें. (तसें करतो)

(वर्णन केल्याप्रमाणें अमात्यराक्षस प्रवेश करतो)

रा०—(डोळ्यांत पाणी आणून) पहा, काय चमत्कार आहे ! या राजलक्ष्मीनें पहिला आश्रय तुटल्यासारखा वाटल्याबरोबर छिनाल रांडेप्रमाणें दुसऱ्या कु-

ळांतील पुरुषाचा आश्रय केला, आणि मेंढराप्रमाणें एकामागून एक जाणारे हे लोकहि तिच्यामागेंच गेले! आप्त इष्टमित्र सुद्धां प्रयत्न निष्फळ झाल्यामुळें स्वस्थ बसले! — पण त्यांनीं तरी काय करावें? मुंडकें नसलें ह्मणजे ज्याप्रमाणें धड निरुपयोगीं होतें, तसें त्या सर्वांचा काय उपयोग? (थांबून) महाराज नंदाचा तशा अयोग्यरीतीनें अंत झाल्यावर मी पर्वतेश्वराला पुढें करून खटपट चालविली. तोहि मेला तेव्हां त्याच्या मुलाचा, ह्मणजे मलयकेतूचा आश्रय केला. तरीहि सारें व्यर्थच! यावरून असें वाटतें कीं दैवच, नंदकुलाचा शत्रू आहे हा भटुर्डा नाहीं. आणखी हा, म्लेच्छ मलयकेतू तरी किती अविचारी! त्यानें असा विचार केला नाहीं कीं जो, धन्याचा समूळ निर्वंश झाला असतांनांहि त्याची सेवा करतो, तो हा राक्षस धडधाकट असतांनां त्यांच्याशत्रूंशीं संधीं कसा करील? आणि त्या मूर्खाच्या मनांत असेंही आलें नाहीं,—पण नको. ज्याचें दैव फिरतें त्याची बुद्धीच उलटी होतें. (थांबून) अझून देखील हा राक्षस शत्रूच्या हातीं सांपडला, तरी नाश पावेल पण चंद्रगुप्ताशीं संधी करणार नाहीं. अ-

सत्य भाषणाचा दोष आलेला एकपरी बरा; पण शत्रूंनीं ठकवून पराजित केलें अशी अपकीर्ती नको. (सभोंवती पाहून) महाराज नंदाच्या पादस्पर्शानें पवित्र झालेला हा कुसुमपुरच्या सभोंवतालचा प्रदेश. याच ठिकाणीं महाराजांनीं मृग धावत असतां त्यांच्यावर घोड्यावर बसून बाण सोडावेत; व त्यावेळेस धनुष्य ओढण्यांत त्याचा हात गुंतल्यामुळें घोड्याची लगाम सैल व्हावी. आणि असें झालें असतांहि त्यांनीं पुन्हां घोडा पळवावा व अनेक चमत्कार करावे. या झाडाच्या राईत महाराज बसत असत, व राजांशीं गोष्टी करीत असत. आतां त्यांच्यावांचून हा प्रदेश पाहून मनाला अतिशय वाईट वाटत आहे ! (थांबून) तर मग मी मंदभाग्यानें आतां कोणीकडें जावें ! ! (पाहून) या जीर्णोद्यानांत जाऊन चंदनदासाचा कांहीं वृत्तांत कळेल तर पहावा. (इकडें तिकडें फिरून) मनुष्याला कोणत्या वेळेस कोणती दशा येईल याचा कांहीं नियम नाहीं. पहा, जो मी पूर्वीं कुसुमपुराहून बाहेर निघालों ह्मणजे हजारों राजे लोक माझ्या मागून येत असत, आणि नगरांतील लोक द्वितीयेच्या चंद्राप्रमाणें

माझ्याकडे बोट दाखवीत असत, तोच मी सध्यां याच नगरांत, निराश होऊन, या जीर्णोद्यानांत, चोराप्रमाणें छपून जात आहे! अथवा, ज्यांच्या प्रसादानें माझा एवढा थाट होता तेच गेले, तेव्हां तो थाट तरी कुठला राहायला? (सभोंवती पाहून) अहो, हे जीर्णोद्यान तरी किती उदास दिसत आहे! अत्यंत महत्वाकांक्षी पुरुषाच्या कुटुंबाप्रमाणें हा राजवाडा अस्ताव्यस्त झाला आहे! मित्राच्या नाशामुळें प्रेमळ पुरुषाचें अंतःकरण जसें शुष्क व्हावें, तसेंच हें सरोवर शुष्क पडलें आहे! मूर्खराजाच्या सहवासानें जसें कारस्थान फलहीन व्हावें तसे हे वृक्ष फलहीन झाले आहेत! आणि मूर्खांची बुद्धी जसी कुविचारानें झांकून जावी, तसीच ही जागा गवतानें झांकून गेली आहे! तसेंच, तीक्ष्ण कुऱ्हाडीच्या घावांनीं अंगाची त्वचा निघून गेल्यामुळें हीं झाडें पारवतांच्या शद्बाच्या रूपानें रडत आहेत! आणि अंगाची त्वचा निघून गेली ह्मणजे कसें दुःख होतें हें या सर्पांनां माहीत असल्यामुळें त्यांनां त्या झाडाची दया येऊन ते आपल्या शरीरांनीं त्या घावामुळें झालेल्या त्यांच्या जखमा बांधीत आहेत!

तसेंच हे विचारे वृक्ष, यांनां पाणी नसल्यामुळें हे कसे सुकून गेले आहेत! कीड लागल्यामुळें यांनां जीं भोंकें पडलीं आहेत, त्यांच्यामधून जणूं काय हे अश्रूच ढाळीत आहेत! आणि छायेचा आणि त्यांचा वियोग झाल्यामुळें हे कसे मलिन दिसत आहेत! अशा प्रकारच्या या वृक्षांनां पाहून तर मला असें वाटतें कीं नंदमहाराजांच्या मागोमाग यांनींहि स्मशान यात्रेची तयारी केली आहे!! (पाहून) तर आतां माझ्याप्रमाणेंच दुर्दैवानें दुभंगलेल्या या शिलातलावर क्षणभर बसावें. (ऐकून) हा डंकाभेरी शिंग वगैरेचा आवाज कुठला बरें ऐकूं येतो? हां. आलें लक्षांत. हा मलयकेतूला धरल्यामुळें राजवाड्यांत—अंहः. मौर्याच्या वाड्यांत—चाललेला आनंदध्वनी आहे. (उश्वास सोडून) कठीण हो कठीण. या दुष्ट दैवानें मला प्रथम शत्रूचें वैभव ऐकविलें, नंतर जवळ आणून दाखविलें, आणि आतां याचा प्रयत्न मला त्याचा प्रत्यक्ष अनुभव आणून देण्याचा दिसतो. (खालीं बसतो)

पु०—स्वारी बसली. तेव्हां आतां आर्य चाणक्याच्या

आज्ञेप्रमाणें करावें. (राक्षसाला जणूंकाय पाहात नाहीं अशा तऱ्हेनें त्याच्यासमोर गळ्याला दोरीचा फास अडकवून झाडाला अडकवितो)

रा०—(पाहूत आपल्याशीं) अरे, हा आपल्या गळ्याला फास लाऊन घेतो ! खरोखर माझ्याप्रमाणेंच हा पुरुष दुःखी असावा. याला विचारूं बरें. (जवळ जाऊन) बाबा, हें तूं काय करतोस ?

पु०—प्रिय मित्राच्या नाशामुळें, दुःखानें आमच्या सारख्या मंदभाग्यांनीं जें करावयाचें तें करतों.

रा०—(आपल्याशीं) मला पहिल्यानेंच वाटलें कीं माझ्या सारखाच हा बिचारा दुःखी असावा. असो, विचारावें. (उघड) बाबा, जर गुप्त नसेल आणि भारी नसेल तर तूं जीव कां देतोस, तें ऐकण्याची इच्छा आहे.

पु०—महाराज, गुप्तहि नाहीं आणि भारीहि नाहीं. पण प्रियमित्राच्या नाशामुळें मला इतकें दुःख झालें आहे कीं आतां मला मरणाला एक क्षणाचा सुद्धां विलंब लावावासा वाटत नाहीं.

रा०—(श्वास सोडून आपल्याशीं) अरेरे! मित्रावर संकट आलें असतांनाहि स्वस्थ बसणाऱ्या या राक्षसाचा हा उपहासच करतो ह्मणावयाचा! (उघड) बाबा, जर गुप्त नाहीं आणि भारीहि नाहीं, तर सांगच तुझ्या दुःखाचें कारण.

पु०—बरें बुवा, तुमचा आग्रह फार दिसतो, तर सांगतों, ऐका. या नगरांत एक श्रीमंत शेटजी विष्णुदास नांवाचा आहे.

रा०—(आपल्याशीं) विष्णुदास तर चंदनदासाचा परम स्नेही.

पु०—तो माझा परम स्नेही आहे.

रा०—(आनंदानें आपल्याशीं) परम स्नेही ह्मणतो! अरे, संबंध अगदींच जवळचा! तेव्हां चंदनदासाचा सर्व वृत्तांत याला माहीत असलाच पाहिजे.

पु०—(सबाष्प) त्या विष्णुदासानें यावेळेस आपली सर्व संपत्ती गरीबगुरीबांनां वाटून दिली, व आपण स्वतः अग्निप्रवेश करण्याच्या इराद्यानें नगराबाहेर निघाला आहे.

पु०—बाबा, अग्निप्रवेश करण्याला तुझ्या मित्राला काय कारण? कांहीं असाध्य रोग त्याला झाला आहे काय?

पु—नाहीं.

रा०—तर मग काय अग्नीप्रमाणें अथवा विषाप्रमाणें तीक्ष्ण असा राजाचा क्रोध त्याच्यावर येऊन पडला आहे?

पु०—छे, छे, चंद्रगुप्ताच्या राज्यांत अशीं निर्दय कामें बिलकुल संभवत नाहींत.

रा०—तर काय कोणा सुंदर स्त्रीवर त्याची प्रीती बसून ती त्याला मिळाली नाहीं.

पु०—असेंहि नाहीं. बनियामध्यें ही गोष्ट संभवेल तरी कशी? त्यांतून विष्णुदासाचें ठिकाणीं तर नाहींच नाहीं.

रा०—तर मग काय तुझ्या प्रमाणेंच प्रियमित्राच्या नाशाचें असह्य दुःख त्याला झालें आहे?

पु०—होय.

मात्यराक्षसाचें कुटुंब यानें छपविलें आणि पुष्कळदां मागितलें तरी दिलें नाहीं ह्मणून आह्मी त्याला कैद केलें आहे. तर, तो जर अमात्यराक्षसाचें कुटंब आमल्या स्वाधीन करील, तरच तो सुटेल; नाहींतर त्यानें आपल्या प्राणाची आशा सोडावी. असें ह्मणून, आणि दुसरें कोणीं असें करूंनये अशी दवंडी पिटवून, त्यानें चंदनदासाला सुळी देण्याच्या जागीं पाठविलें. तेव्हां चंदनदासाचें वाईट ऐकण्याच्या पूर्वींच आपण आपला मार्ग काढावा, ह्मणून अग्निप्रवेश करण्याकरतां विष्णुदास नगराबाहेर निघाला. त्या विष्णुदासाचें वाईट ऐकिण्यापुर्वींच आपणहि फास घेऊन प्राण द्यावा ह्मणून मी या जीर्णोद्यानांत आलों.

रा०—चंदनदास अद्यापि मारला गेला नाहीं नां ?

पु०—नाहीं, अद्यापि त्याला मारलें नाहीं. त्याला पुनः पुनः अमात्यराक्षसाचें कुटुंब दे ह्मणून ह्मणतात. पण तो खरा स्नेही. त्यांचें ह्मणणें कांहीं ऐकत नाहीं. आणि यांमुळें त्याचें मरण लांबणीवर पडत आहे.

रा०—(आनंदानें आपल्याशीं) शाबास, मित्रा चंदनदासा,

शात्रास. शरणागताचें रक्षण करून तू शिबीराजाप्र-माणें कीर्ती मिळविलीस. परंतु मित्राला जोडीदार द्या-यचे होतेंस. (उघड) गड्या, तूं लौकर धांवत जा आणि विष्णुदासाला अग्निप्रवेश करूं देऊं नकोस. मीहि इकडे चंदनदासाची सुटका करतों.

पु०—महाराज, आपण चंदनदासाची कोणत्या उपायानें सुटका करणार ?

रा०—(खड्ग उपसून) अरे, निरभ्र आकाशाप्रमाणें नील वर्णाचा हा खांडा पाहिलास ? हा एकदा माझ्याहातां-त आला ह्मणजे याला युद्धाचें कसें स्फुरण चढतें ! याच्याच साह्यानें युद्धांत शत्रूंचो गती कुंठीत होऊन मझें शौर्य त्यांनां दिसत असें. असें हें शस्त्र मित्रा-करतां मला साहस करण्यास प्रवृत्त करीत आहे.

पु०—महाराज या उपायानें चंदनदासाची सुटका होईल कीं नाहीं या विषयीं मला संशय वाटतो. असो. आ-पण अमात्यराक्षस आहां काय ? कृपाकरून माझ्या संशयाची निवृत्ती करावी.

रा०—होय बाबा. ज्यानें आपल्या मालकाचा नाश पा-

हिला, जो आपल्या मित्राच्या नाशाला कारण, आणि ज्याच्या नांवाचा उच्चार करणें ह्मणजे अपशकून, तो-च हा नांवाप्रमाणें कृती करणारा राक्षस.

पु०—(आनंदानें पायांपडून) महाराज, मी कृतार्थ झालों.

रा०—बाबा, उठ उठ; वेळ घालवूं नकोस. विष्णुदासाला सांग कीं हा राक्षस चंदनदासाची मृत्यूपासून सुटका करतो ह्मणून.

पु०—(पायांपडून) आर्या, क्षमा करा. या नगरांत दुष्ट चंद्रगुप्तानें शकटदासाला सुळावर देण्याची शिक्षा दिली होती. तेव्हां त्याला वधस्थानापासून कोणीं दुष्टानें पळविलें त्यामुळें चंद्रगुप्ताचा क्रोधाग्नी इतका भडकला कीं त्यानें त्या मांगाचें बळी घेतलें. तेव्हांपासून अपराधी मारायला नेत असतांना, कोणीहि पुरुष शस्त्र घेऊन येतांना मारेकऱ्यांच्या दृष्टीस पडला कीं ते आपल्या प्राणाच्या भीतीनें अपराध्याचा तिथल्या तिथेंच वध करितात. ह्मणून विनंती करितों कीं अमात्यांनीं शस्त्र घेऊन तिथें जाऊं नये. नाहीं तर आपणाला पाहून मारेकरी लागलीच चंदनदासाला मारून टाकतील.

रा०—(आपल्याशीं) अहो, या भटुर्ड्या चाणक्याचें कारस्थान समजायला फार कठीण. याच्याच सांगण्यावरून सिद्धार्थकानें शकटदासाला मजकडे आणून पोंचविलें असें जर ह्मणावें, तर मग यानें मारेकऱ्यांचा काय ह्मणून जीव घेतला? बरें, तसें जर न ह्मणावें तर सिद्धार्थकानें तसें कपट कां करावें? (विचार करून) काय करावें? मन अगदीं गोंधळून जातें. असो, पण विचार करीत बसण्याची ही वेळ नाहीं. तथापि तरवारीचा उपयोग करण्याची मात्र ही वेळ नाहीं. कारण तसें केलें तर मारेकरी चंदनदासाला तेथेंच मारून टाकतील. कांहीं युक्ति योजावी तर ती उशीरानें फलद्रुप होणार; तेव्हां तिचाहि उपयोग नाहीं. माझ्यासाठीं प्रियमित्र घोर संकटांत पडला आहे तेव्हां स्वस्थ बसणें हें उचित नाहीं. काय करावें बरें? हां. आलें लक्षांत. असें करावें कीं आपलें शरीर देऊन त्याचें शरीर सोडवावें. (जातात).

अंक सहावा समाप्त.

अंक ७ वा.

एक चांडाळ प्रवेश करतो.

१ ला चांडाळ—दूर व्हा र लोकानो दूर व्हा. तुमास्नी जर आपल जीव, कुळ, आन् आपल बायका प्वोर व्हाव अस वाटत असल तर ह्य राजदुरहाच गुन्हा करू नग बर! ह्य लइ जालीम इख हाय. दुसर इख घेतल तर त्य घेनारालाच मारतया; पन ह्य इख जर घेतल तर त्य समद्या कुळाच नास करतया. तुमास्नी जर ह्य खर नसल वाटत तर ह्य चंदनदासाकड बघा. येला राजाच्या हुकमान आह्मी बायका प्वोरासकट सुळी द्यायच्या जागीं नेतुया. (पडद्याकडे पाहून) काय ह्मनतां बाबानों? येल सुटायला कांहीं मारग हाय का ह्मून? आतां या अभाग्याला सुटायला मारग कोठला राहनार? एक हाय. जर ह्यो अमात्य राकुसाच कुटुंब देऊनशान् टाकल तर हाय. (पडद्याकडे पाहून) काय ह्मनता? हा साधु पुरुस परान ग्येल तरीबी तस करनार न्हाई ह्मून? तर बाबानों त्येल

आतां ईश्वर चांगली गती देवो असच ह्मना. (नंतर दुसऱ्या चांडालानें धरलेला चंदनदास वध्याच्या वेषानें प्रवेश करितो. त्याच्या बरोबर त्याची बायको व मुलगा येतात)

चंद०---काय आमचें नशीब हें ? आह्मी नेहमीं सालसपणानें वागत असतां आह्मांला असें चोरासारखें मरण्याचा प्रसंग यावा काय ? यमराजा, धन्य आहेस तूं बाबा. पण दुष्टांनां चांगलें आणि वाईट सगळेंच सारखें. गरीब बिचाऱ्या हरिणांनां मारतांनां व्याधाला कुठें शंका वाटते ? (सभोंवती पाहून) अहो विष्णुदास, तुह्मी परमस्नेही ह्मणवतां ना ? अहो उत्तर तर द्या ! अशावेळेस कोण कामीं पडतो ? (डोळ्यांत पाणी आणून) हें आमचे परममित्र सुद्धां काय करतील बिचारे ? नुसतें डोळ्यांतून पाणी काढतात आणि आह्मांकडे पाहतात !

१ ला व २ रा चां०---आर ए, चंदनदासा, वधायच्या जागीं तूं आलयास. तर तूं आतां बायका प्वोरांचा निरूप घे.

चंद०—प्रिये, तूं मुलाला घेऊन जा. हें वध्यस्थान आहे. याच्यापुढें कोणालाहि मजबरोबर येतां यावयाचें नाहीं.

चं० बा०—(रडत रडत) प्रिया, आपण परलोकाला जावयाला निघालां, परदेशाला नव्हे. तेव्हां आतां आह्मांला सोडणें बरोबर नाहीं.

चंद०—प्रिये, मी मित्राकरितां परलोकाला जात आहे, स्वतः करतां नाहीं. मग आनंद मानावयाचा सोडून अशी रडत्येस कां ?

चंद० बा०—प्रिया, असें जर आहे, तर मग आह्मांला कां सोडतां ?

चंद०—मग तूं काय करणार ?

चंद० बा०—प्रिया, आपल्या बरोबर येणार.

चंद०—प्रिये, असें साहस करणें चांगलें नाहीं. तूं गेल्या वर या बाळाचें कोण पालन करील ?

चंद० बा०—कुलदेवता याचें रक्षण करतील. बाळा तूं यांना शेवटचा नमस्कार कर.

मु०—(नमस्कार करून) बाबा तुमच्यावांचून मी कुठें राहूं ?

चंद०—बाळा, जिथें चाणक्य नसेल तिथें जाऊन राहावें.

१ ला चां०—आर चंदनदासा, सूळ रोवलया. चाल तयार व्हय.

चं० बा०—धांवाहो धांवा.

चंद०—बाबांनो, क्षणभर थांबा. प्रिये असा धांवा कोणाचा करत्येस. स्त्रियांचा धांवा ऐकून धांव घेणारे नंदमहाराज स्वर्गाला गेले. आणखी, मित्राकरतां मी जातों, तर आनंद मानावयाचा सोडून असें दुःख कां करत्येस ?

१ ला चां०—अर येनूएतरका, चंदनदासाला धर, म्हंजी ह्य समद लोक आपआपच जात्याल.

२ रा० चां०—आर वज्रलोमका, ह्यो मी धरतुया.

चंद०—बाबांनों, जरा थांबा. मी मुलाला आलिंगन देतों. (मुलाला आलिंगन देऊन) बाळा, मृत्यू हा प्रत्येकाला यावयाचाच पण मला मित्राकरतां मृत्यू आला आहे बरें !

मु०—बाबा, हा काय आपला कुलधर्म आहे? (पायां पडतो)

१ ला चांडाळ—अरे धरर वज्रलोमका. (चांडाळ चंदनदासाला धरतात)

चं० बा०—धावांहो धांवा.

रा०—(येऊन) बाई, भिऊं नको, भिऊं नको. अरे मारेकऱ्यांनों, चंदनदासाला मारूं नका. अरे, ज्यानें आपल्या मालकाच्या कुलाचा नाश होत असलेला आपल्या डोळ्यांनीं पाहिला, जो मित्रावर संकट आलें असतांनांही मोठ्या आनंदांत असे, आणि ज्यानें आपणाला सर्व लोकांच्या तिरस्काराला पात्र करून घेतलें, अशा ह्या माझ्या गळ्या मध्यें, ही परलोकाला नेणारी लालफुलांची माळ घाला.

चंद०—(पाहून) अमात्य काय केलें हें!!

रा०—तुझ्या उत्तम वर्तनांतल्या एका भागाचें अनुकरण.

चंद—अमात्या, माझे सर्व श्रम निष्फळ झाले. आपण हें बरें केलें नाहीं.

रा०—मित्रा चंदनदासा, आतां बोलणें पुरें. स्वार्थाकरितां सारेच खटपट करितात. अरे ए, मागांनों, जा, जाऊन सांगा त्या दुष्ट चाणक्याला——

१, २ चां०—काय सांगाव ?

रा०—या दुष्ट कलियुगांत सुद्धां ज्यानें आपल्या प्राणांनीं दुसऱ्याचे प्राण रक्षण करून शिबीचें नांव मागें पाडलें, आणि ज्यानें आपल्या शुद्धाचरणानें बुद्धावरहि ताण केली, तो हा चंदनदास पूजेला योग्य असतांनांहि शत्रूसारखा तुला ज्याच्यामुळें वाटला, असा हा राक्षस उभा आहे.

१ ला० चां०—आर येनुयेतरका, तू ह्य चंदनदासाला धरूनशान् ह्या झाडाच्या सावली मंदी बस. मी वाइच म्हाराज चानक्यास्नी सांगतुया कीं अमात्यराकुस धरला हाय ह्मून.

२ रा० चां०—अर वजरलोमका, ब्यस हाय. (चांडाळ व राक्षस खेरीज सर्व जातात)

चां०—(राक्षसासह फिरून)कोन हायर दारावर ? आ-

र, नंदकुलाच आन् त्येच्या सैन्याच चूर करूनशान् मौर्यकुलाची गादी बांधनाऱ्या चानक्य म्हाराजास्नी निरुप सांग कीं—

रा०—काय, हें शद्ब मी ऐकावेंत !

चां०—म्हाराजांच्या जुगतरूपी दोरीनं जखडूनशान् टाकलेला राकुस धरला हाय म्हून.

(नंतर सर्वांगावरून पांघरूण घेतलेला व केवळ तोंड दिसत आहे असा चाणक्य प्रवेश करितो)

चा०—अरे बोल बोल. गगनमंडलापर्यंत ज्याच्या ज्वाला जात आहेत, असा अग्नि वस्त्रांत कोणीं बांधला ? वायूला पाश घालून त्याची गती कुंठित कोणीं केली ? हत्तीच्या मदस्त्रावांचा ज्याच्या आयाळाला वास येत आहे असा सिंह पिंजऱ्यांत कोणीं अडकविला ? नक्र आणि मगर यांनीं परिपूर्ण असा विस्तीर्ण समुद्र बाहुबलानें कोण तरून गेला ?

चां०—म्हाराजानींच.

चा०—छे छे, असें म्हणू नकोस. नंद कुलाचा द्वेष करणाऱ्या दैवानेंच हें केलें.

रा०—(आपल्याशीं) हाच तो दुरात्मा, अथवा हाच महात्मा चाणक्य. हा सागराप्रमाणें रत्नभूत सर्व शास्त्रांची जणूकाय खाणच. ह्याच्या गुणांनीं आह्मी मात्र मत्सरी असल्यामुळें संतोष पावत नाहीं.

चा०—(पाहून आनंदानें) अरे, हा अमात्यराक्षस! ज्या महात्म्यानें घोर युत्या योजून माझ्या बुद्धीला आणि चंद्रगुप्ताच्या सेनेला अहोरात्र जाग्रणांनीं त्रासविलें. (पांघरूण काढून) हे अमात्यराक्षसा, मी विष्णुगुप्त नमस्कार करतों.

रा०—(आपल्याशीं) आतां अमात्य हें नांव लाजीरवाणें वाटतें. (उघड) विष्णुगुप्ता, मला शिवूं नकोस. मला चांडाळांचा विटाळ झाला आहे.

चा०—अमात्यराक्षसा, हा चांडाळ नव्हे. हा तुह्मी पाहिलेला सिद्धार्थक नांवाचा राजसेवक. आणि तो जो दुसरा आहे, तोही समिद्धार्थक नांवाचा राजसेवकच. या सिद्धार्थकानेंच त्या बिच्याऱ्या शकटदासाकडून त्याला न कळूं देतां माझ्यासांगण्यावरून तें बनावट पत्र लिहविलें.

रा०—(आपल्याशीं) शकटदासावरचा दोष नाहींसा झाला हें बरें झालें.

चा०—जास्त काय ? थोडक्यांत सांगतों. ते भद्रभटादि लोक, तें पत्र, तो सिद्धार्थक, ते तीन अलंकार, तो तुमचा मित्र ज्योतिषी क्षपणक जीवसिद्धी, तसेंच तो बगीच्यातील दुःखी पुरुष, आणि या श्रेष्ठी चंदनदासाचे हे क्लेश, हें सर्व तुमच्याशीं चंद्रगुप्ताचा स्नेह व्हावा ह्मणून मी—छे छे—चंद्रगुप्तानेंच केलेलें कारस्थान आहे. हा चंद्रगुप्त तुमच्या दर्शनाची इच्छा करितो.

रा०—(आपल्याशीं) काय उपाय ? (उघड) ठीक आहे.

(सेवकासह चंद्रगुप्त येतो)

चंद्र०—गुरुजींनी मलयकेतूचें अजिंक्य सैन्य युद्धावांचून जिंकलें हें पाहून आह्माला लाज वाटते. आमच्या बाणांनां लोखंडाचें फळ आहे पण शत्रू जिंकण्याचें फळ नाहीं. त्यांनां पाखरांच्या पक्षांचा लाभ आहे, पण शत्रुपक्षावर वर्चस्व मिळविण्याचा लाभ झाला नाहीं. ह्मणून त्यांना लाज वाटून खालीं तोंड घालून भात्यां-

तच राहणें बरें वाटलें. अथवा, यांत काय नवल? माझें धनुष्य जरी सज्ज नसलें तरी मी शत्रु जिंकण्यास समर्थच आहे. कारण मी जरी निद्रिस्त असलों, तरी राजकार्य धुरंधर गुरु चाणक्य नेहमीं जागे आहेतच.

चा०—चंद्रगुप्ता, आजपर्यंत तुला मिळालेल्या आशीर्वादांना फळ आलें. तर आतां अमात्यराक्षसांना नमस्कार कर. हे तुझ्या बापाच्या वेळचे मुख्य प्रधान आहेत.

रा०—(आपल्याशीं) यानें संबंध जुळविला.

चं०—आर्या, चंद्रगुप्त नमस्कार करतों. (राक्षसास नमस्कार करतो.)

रा०—(पाहून) अरे हा चंद्रगुप्त! हा लहान असतांनांच लोकांनां वाटत असे कीं हा पुढें मोठ्या योग्यतेला चढणार. त्याप्रमाणें, हत्ती जसा आपल्या कळपाचा अधिपती होतो, तसा हा आतां राजा झालाच! (उघड) चंद्रगुप्ता तुझा विजय असो.

चंद्र०—आर्या, राज्यकारभाराचा सर्व भार आपण व गु-

रुजींनीं घेतल्यावर मग जगांत काय जिंकावयाचें उर-लें आहे ?

रा०—(आपल्याशीं) अरे, या कुटाळ चाणक्याचा शिष्य मलाहि सेवकाप्रमाणें मुजरा करतो ! अथवा, हा त्याचा विनय आहे. आमच्या मनांत त्याच्याविषयीं मत्सर असल्यामुळें आह्माला मात्र हें विपरीत भासतें. खरोखर चाणक्य यशस्वी झाला तें रास्त आहे. कारण होतकरू वस्तू मिळाली ह्मणजे काम करणारा जड जरी असला तरी तो निःसंशय यशस्वी होतो. परंतु वस्तु होतकरू नसली ह्मणजे कार्य करणारा कितीही चतुर असला तरी तो, नदीच्या काठीं वाढलेल्या वृक्षाप्रमाणें पाळामुळासुद्धां उलथून पडतो.

चा०—अमात्यराक्षसा, चंदनदासाचा जीव वांचवावयाचा आहे ना ?

रा०—विष्णुगुप्ता, यांत काय संशय ?

चा०—अमात्य राक्षसा, आपण हें शस्त्र घेऊन चंद्रगुप्तावर अनुग्रह करीत नाहीं ह्मणून संशय वाटतो. तर

जर खरोखर, चंदनदासाचा जीव जगावा अशी तुमची इच्छा असेल, तर हें शस्त्र घ्या.

रा०——विष्णुगुप्ता, हें बरोबर नाहीं. हें शस्त्र धारण करण्याला आह्मी अयोग्य आहोंत. आणि विशेषतः जें शस्त्र तूं धारण केलेंस तें घेण्याची तर माझी योग्यताच नाहीं.

चा०——अमात्य राक्षसा, मी योग्य आणि आपण अयोग्य असें तुह्मी कसें ह्मणतां? हे आमचे घोडे पहा; यांच्या पाठीवरील जीन व तोंडांतील लगाम कधींहि काढतां न आल्यामुळें ते किती क्षीण झाले आहेत? त्याचप्रमाणें हे हत्ती; यांना स्नानपान आहार विहार इत्यादि सुखें अगदीं वर्ज झालीं असल्यामुळें त्यांच्या पाठींचे कणे किती वर निघाले आहेत? हें सर्व तुमच्या शौर्याचें माहात्म्य. अथवा, कशाला इतक्या गोष्टी? तुह्मी शस्त्र घेतल्याशिवाय चंदनदास वांचत नाहीं.

रा०——(आपल्याशीं) काय दैवगती विलक्षण आहे पहा? माझें हृदय नंद महाराजांच्या प्रेमानें उचं-

बळलेलें आहे, पण आतां नौकरी त्यांच्या शत्रूची करावी लागणार! जे वृक्ष मी आपल्या हातांनीं पाणी घालून वाढविले त्यांच्या फळाची इच्छा करावी तर ते मोडून पडले! तेव्हां आतां हें अमात्यपद मित्राच्या रक्षणाकरितां मला पत्करणें भाग आहे! (उघड) नमस्कार असो या मित्रप्रेमाला. याच्या-करतां पाहिजे तें काम कबूल करावें लागतें. विष्णु-गुप्ता, आण तें शस्त्र.

चा०—(आनंदानें शस्त्र घेऊन) चंद्रगुप्ता, चंद्रगुप्ता, अमात्य राक्षसांनीं शस्त्र धारण करून तुझ्यावर अनु-ग्रह केला. तुझें खरोखर मी अभिनंदन करतों.

चं०—आर्यांच्या प्रसादाचें हें फळ.

पु०—(येऊन) महाराजांचा जयजयकार असो. महा-राज, भद्रभट भागुरायणादिकांनीं हातपाय बांधून म-लयकेतूला आणलें आहे. तो बाहेर उभा आहे.

चा०—ऐकिलें. अरे, अमात्य राक्षसांनां सांग. आतां हे कारभार पहाणार.

रा०—(आपल्याशीं) मला दास करून हा चाणक्य

मला विनंती करायला लावतो! काय करावें? (उघड) राजा, चंद्रगुप्ता, तुला माहीत आहेच कीं आह्मी मलयकेतूबरोबर कांहीं दिवस राहिलों आहोंत. तेव्हां त्याचे प्राण राखिले पाहिजेत.

(चंद्रगुप्त चाणक्याच्या तोंडाकडे पाहतो.)

चा०—चंद्रगुप्ता, अमात्य राक्षसाचें हें पहिलेंच ह्मणणें आहे तेव्हां त्याला मान दिलाच पाहिजे. (पुरुषास) अरे, भद्रभटादिकांना सांग कीं अमात्यराक्षसांनीं विनविल्यावरून चंद्रगुप्तानें मलयकेतूला त्याच्या बापाचेंच राज्य दिलें आहे तेव्हां तुह्मी त्याच्याबरोबर जा आणि त्याला राज्याभिषेक करून परत या.

पु०—आज्ञा.

चा०—अरे जरा थांब. विजयपाल आणि दुर्गपाल यांना माझा असा निरोप सांग, कीं अमात्य राक्षसांनीं शस्त्र धारण केलें आहे तेव्हां चंद्रगुप्ताची अशी आज्ञा आहे कीं, चंदनदासाला सर्व पृथ्वीवरील शहरांत नगरशेट नेमावा. (पुरुष 'आज्ञा' ह्मणून जातो)

चा०—चंद्रगुप्ता, आणखी कोणतें तुझें प्रिय करूं?

चंद्र०—आतां, या पेक्षांहि कांहीं उरलें आहे काय? राक्षसाशीं मैत्री केली, आह्माला राज्यावर बसविलें, नंदाचा नाश केला, याहून अधिक काय करावयाचें आहे?

चा०—शोणोत्तरे, दुर्गपाल आणि विजयपाल यांना माझा आणखी असा निरोप सांग कीं राक्षसांनीं अमात्य पद घेतल्यामुळें राजा चंद्रगुप्ताला फार आनंद झाला आहे. तर हत्ती आणि घोडे खेरीज करून सर्वांना बंधनांतून सोडावें. अथवा, अमात्य राक्षस मुख्य प्रधान असल्यावर हत्ती आणि घोडे यांची तरी काय गरज? तेव्हां त्यांनां सांग कीं हत्ती आणि घोडे यांच्यासुद्धां सर्वांना बंधनांतून सोडून द्या. माझी प्रतिज्ञा पूर्ण झाली ह्मणून मी मात्र आपली शेंडी बांधतों. (शेंडी बांधतो)

प्रति०—आज्ञा (जाते)

चा०—अमात्य राक्षसा, सांग, तुझें कोणतें प्रिय करूं?

रा०—यापेक्षां आतां काय प्रिय राहिलें आहे? तथापि—

श्लोक स्रग्धरा.

घेई वाराहरूपा जगदवनपर श्रीपती जेवि पूर्वी ॥
तद्दंष्ट्राग्रीं जशी ती प्रलयपरिगता आश्रया घेत ऊर्वी॥
तेवि श्रीचंद्रगुप्त-प्रभु-भुजशरण म्लेंच्छतापें सुतप्त॥
भू ही, तीचें प्रतापें चिर अवन करो भूप हा चंद्रगुप्त॥

चा०—तथास्तु. (पडदा पडतो)

(सर्व जातात).

अंक सातवा समाप्त.

समाप्त.

मंगलचरणाबद्दल पदें.

(पंचतुंडधर या चालीवर)

नमन असो हें सविनय माझें निर्मल ब्राह्म-ज्योतिला ॥
आत्मज्ञानें प्रकाश ज्याचा देई अत्यानंदाला ॥
जेवि चंडदिनकररश्मीनें सैकत-भूवरि जल भासें ॥
त्यापरि नसतां ज्ञान जयाचें मिथ्या जग हें सत्य दिसें ॥
पडतां चित्तीं प्रकाश त्याचा शुद्ध होउनी कांचनसें ॥
रज्जूवरिचा सर्पभास हा जाउनि सत्यज्ञान ठसें ॥

(साध्य नसे मुनिकन्या या चा०)

मंगल देवो तुह्माला ॥ होवो शिवहर सुखकर सकला ॥ ध्रु० ॥ "मस्तकिं बसली कोण हि नारी ॥ थोर इचें कीं भाग्य खरोखरी "॥ श्रीजगदंबावचना, उत्तर बोलें " ही चंद्रकला " ॥ १ ॥

आश्चर्यें सति बोले " इजसी ॥ नाम असें कां हें या स्त्रीसी " ॥ " नामचि हें निर्धारी ॥ विस्मर तुजसी कां हा झाला " ॥ २ ॥

सस्मित अंबा बोले यावरि । " इंदुसि नच मी

ह्मीस विचारी " ॥ बोले " मान्य न शशि जरि ॥ विजया निवटिल संदेहाला ॥ ३ ॥
यापरि प्रभु जो शाठ्यपणातें ॥ धरुनी शीर्षस्थित गंगेतें ॥ सति पासुनि छपवीतो ॥ तो हर निवटो विघ्नगणाला ॥ ४ ॥

(गंगानादि ती सागर मोडुनी या चा०)

स्वैरपणें प्रभु तांडव करितां कंप सुटे हा भूमीतें ॥
ह्मणुनी ठेवी मंदमंदशा नृत्यीं शंकर पदगतितें ॥
बाहु पसरिता त्वरितचि साऱ्या व्यापितील त्रैलोक्यातें ॥ संकोचानें यास्तव अभिनयिं दावी नर्तनपाटव तें ॥

उग्रदृष्टि नच ठेवी कारण भस्म करीलचि जगतीतें ॥
आधाराधेयातें जाणुनि सौम्य लक्षि जो सकलातें ॥
यापरि विश्वस्थिति हेतूनें स्वेच्छानर्तन प्रभुचें तें ॥
होइ न ह्मणुनी दुःखित अभिनय होवो शुभकर सकलातें ॥

शुद्धिपत्रक.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२	१४	कारण	कारण,
६	९	नंदाचें	नंदांचें
,,	१६	हा	ही
७	७	नंदानें	नंदांनीं
,,	१०	नंदाला	नंदांला
८	९	आहे	आहे,
,,	१२	मंत्रि बृहस्पते	मंत्रिबृहस्पते
,,	१३	आहे	आहे,
९	२	चंद्रगुप्ताची	चंद्रगुप्ताचीं
१०	१	स्नेहाच्या	स्नेहांच्या
,,	८	चौषष्ट	चौसष्ट
,,	११	नंदाशीं	नंदांशीं
,,	१३	त्याच्याकडून	त्यांच्याकडून
१४	३	वघा	बघा
१४	९	ऐकाव. झाराजानी	ऐकाव झाराजांनीं.
१६	१	झराजांनीं,	झाराजानी.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
६५	४	गोष्टीची	गोष्टींची
६६	६	फुलाच्या	फुलांच्या
६७	६	वैहीनरे	वैहीनरे,
,,	७	दाखव	दाखीव.
,,	१३	शरदऋतूंतील	शरदृऋतूंतील
,,	१५	दीर्घ	दीर्घ, व
,,	१६	पक्षांचा	पक्ष्यांचा
६८	२	आहे. पहा	आहे पहा !
,,	२	तोविषाप्रमाणें	तो विषाप्रमाणें
,,	६	शरदऋतु	शरदृतु
,,	८	सवतींमत्सरानें	सवतमत्सरानें
६९	१५	यापुढें महाराज	यापुढें, महाराज,
७०	४	सिंहासन	सिंहासन.
७२	१८	सहस्त्र किरण	सहस्त्रकिरण
७४	६	अरे चंद्रगुप्त,	अरे ! चंद्रगुप्त
७५	६	ह्मणून ?	ह्मणून.
७८	११	चद्रं०—	चंद्र०—
,,	१६	चद्रं०—	चंद्र०—

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
,,	१४	थांवथांव	थांवथांव.
७९	३	चद्रं०—	चंद्र०—
,,	५	चद्रं०—	चंद्र०—
,,	७	कौमदी	कौमुदी
,,	९	चद्रं०—	चंद्र०—
८०	६	स्वास्त	स्वास्ति.
,,	८	त्याच्या	त्यांच्या
,,	१४	भागुरापण	भागुरायण
८१	४	रंडी बाजी	रंडीबाजी
८१	८	अधिकावर	अधिकारावर
८३	८,९	पुन्हा:	पुनः
८५	७	चा०	चा०—
,,	१३	मिळावयाचें	मिळवावयाचें
८७	६	तुह्मी नाहीं	'तुह्मी नाहीं'
८८	११	स्मशानांत	श्मशानांत
,,	१५	स्मशानांत	श्मशानांत
८९	१२	रा०—	चंद्र०—
९१	११	तर	तरी

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
९५	१	भालहार	भालदार
९७	११	इर्षा	ईर्षा
१२३	६	आताच	आतांच
१२५	५	त्यांनाही	त्यांनाहि
१२७	१	(पाहून	(पाहून)
,,	२	इच्यावरही	इच्यावरहि
,,	६	पाठविलें होतें	पाठविले होते
१३४	४	मीं	मी
१३६	२	दोन्ही	दोन्हीं
,,	१२	असेलही	असेलाहि
१४०	८	भरवसा	भरंवसा
१४२	१८	पाचवा	पांचवा
१९९	२,३	द्यायचे	द्यायचें